नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २५० | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




मंगळवार, दि. २५ ऑगस्ट २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## सिंहस्थापूर्वी नाशिकमध्ये 'सांस्कृतिक कुंभ'

### महाराष्ट्रापासून पंजाब, मणिपूरपर्यंत भक्तीचा अनोखा संगम



**नाशिक : (स. गांवकरी)**

महासिंहस्थाच्या आधी नाशिकमध्ये भक्ती, संगीत आणि भारतीय संतपरंपरेचा अनोखा 'सांस्कृतिक कुंभ' अनुभवायला मिळणार आहे. महाराष्ट्राची कीर्तन परंपरा, पंजाबची गुरबाणी शबद कीर्तन परंपरा आणि मणिपूरचे वैशिष्ट्यपूर्ण नट संकीर्तन अशा देशाच्या विविध भागांतील भक्तिपरंपरांचा संगम 'सिंहस्थ महाकुंभ भक्ती संगम' या तीन दिवसीय महोत्सवातून साधला जाणार आहे. २८ ते ३० ऑगस्टदरम्यान ठक्कर डोम येथे होणाऱ्या या महोत्सवात विविध प्रदेश, परंपरा आणि कलाप्रकार एकाच व्यासपीठावर येणार आहेत. नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणातर्फे आयोजित या महोत्सवाचा उद्देश विविध भक्तिपरंपरांना एकत्र आणून त्यातील वैविध्य आणि त्यांना जोडणारा भक्तीचा समान धागा अधोरेखित करणे हा आहे. कुंभाच्या मूळ भावनेतील विविध परंपरांचा सांस्कृतिक संगम घडविण्याचा प्रयत्न यातून केला जाणार आहे.

महोत्सवाच्या पहिल्या दिवशी अमृताश्रम स्वामी महाराज यांच्या कीर्तनाने सुरुवात होणार असून, त्यानंतर राहुल देशपांडे यांच्या अभंगवारीचे सादरीकरण होईल. दुसऱ्या दिवशी ह.भ.प. डॉ. चारुदत्त गोविंदस्वामी आफळे यांच्या कीर्तनासोबत कु. मैथिली ठाकूर यांच्या भजनाचा कार्यक्रम होणार आहे. तिसऱ्या दिवशी भाई मनिंदर सिंहजी हजुरी रागी – श्री दरबार साहिब, अमृतसर यांच्याकडून गुरबाणी शबद कीर्तनाचे सादरीकरण होईल. त्यानंतर मणिपूरच्या नट संकीर्तन महाजेग्याचे पारंपरिक सादरीकरण होणार आहे. शैली, भाषा आणि सादरीकरण वेगळे असले तरी या सर्व परंपरा भक्तीच्या समान भावनेने जोडलेल्या आहेत.

'भक्ती संगम'मधील 'संगम' ही संकल्पना केवळ नद्यांच्या संगमापुरती मर्यादित नाही. विविध संतपरंपरा, भक्तिपरंपरा, कलाकार, प्रदेश आणि रसिक यांचा सांस्कृतिक संगम घडविण्याचा प्रयत्न यातून करण्यात आला आहे. महासिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर देशभरातून येणाऱ्या भाविकांना भारतीय भक्तिपरंपरेतील विविधता अनुभवता यावी, हा या उपक्रमाचा हेतू आहे.

### भक्तीसोबत विचारमंथनही

२९ ऑगस्ट रोजी 'भक्ती संमेलन'च्या माध्यमातून भारतीय संतपरंपरेवर विचारमंथन होणार आहे. दोन सत्रांमध्ये होणाऱ्या संमेलनात 'सिंहस्थ महाकुंभमेळा : भारतीय संत आणि समरसता' आणि 'सिंहस्थ महाकुंभमेळा : राष्ट्रीयदृष्ट्या संतपरंपरेचा सहभाग आणि समन्वय' या विषयांवर चर्चा होईल. अनुक्रमे ह.भ.प. पराग महाराज चातुर्मासे आणि डॉ. सदानंद मोरे हे सत्र समन्वयक असतील. सिंहस्थाच्या तयारीत पायाभूत सुविधा आणि भाविकांच्या सुविधांसोबतच नाशिकची आध्यात्मिक व सांस्कृतिक ओळख देशभर पोहोचविण्यावर भर दिला जात आहे. 'सिंहस्थ महाकुंभ भक्ती संगम' हा त्याचाच भाग आहे. हा महोत्सव महासिंहस्थाच्या सांस्कृतिक वातावरणाची झलक देणारा ठरणार आहे.

## लोटे एमआयडीसीतील प्रदूषणाविरोधात अ‍ॅड. असीम सरोदे लढणार कायदेशीर लढाई

### एमपीसीबीच्या भूमिकेवरही गंभीर सवाल

**रत्नागिरी : (स. गांवकरी)**

लोटे एमआयडीसी परिसरातील लक्ष्मी ऑरगॅनिक कंपनीमुळे होत असलेल्या कथित प्रदूषणाविरोधातील स्थानिक नागरिकांचा संघर्ष आता अधिक तीव्र होणार आहे. ज्येष्ठ विधिज्ञ अ‍ॅड. असीम सरोदे यांनी या लढ्यात प्रत्यक्ष सहभागी होत न्यायालयीन मार्गाने नागरिकांना न्याय मिळवून देण्याची ग्वाही दिली आहे. स्थानिक प्रशासन आणि शासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याच्या पार्श्वभूमीवर 'कोकण नागरी संघर्ष समिती'च्या शिष्टमंडळाने अ‍ॅड. सरोदे यांची भेट घेऊन कायदेशीर मदतीची मागणी केली. त्यानंतर अ‍ॅड. सरोदे यांनी आंदोलनाला पूर्ण पाठिंबा जाहीर केला. लक्ष्मी ऑरगॅनिक कंपनीच्या पाठीशी शासकीय यंत्रणा, राजकीय नेते आणि मोठे आर्थिक हितसंबंध असलेले घटक असल्याचा गंभीर आरोप अ‍ॅड. सरोदे यांनी केला. सर्वसामान्य नागरिकांचा आवाज दाबला जात असला तरी न्यायालयाच्या माध्यमातून या प्रकरणात निश्चितपणे न्याय मिळवून देऊ, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. "रत्नागिरीसह संपूर्ण कोकणातील उत्तम पर्यावरण नष्ट करण्याचा अधिकार कोणालाही नाही. आपण ऑक्सिजन निर्माण करू शकत नसू, तर त्याचे कार्बन डायऑक्साईडमध्ये रूपांतर करण्याचा अधिकारही आपल्याला नाही," असे सांगत त्यांनी पर्यावरण संवर्धनाबाबत संवेदनशीलता बाळगण्याचे आवाहन केले. दरम्यान, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (एमपीसीबी) कथित भूमिकेवरही अ‍ॅड. सरोदे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. कंपनीला केवळ दाखवण्यासाठी क्लोजर नोटीस बजावली जाते आणि काही दिवसांनी परिस्थिती शांत झाल्यानंतर पुन्हा उत्पादन सुरू करण्याची परवानगी दिली जाते, असा आरोप त्यांनी केला. अशीच कार्यपद्धती कायम राहिल्यास एमपीसीबीदेखील पर्यावरणाच्या विरोधात काम करत असल्याचे मानले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.



सांडपाण्यावर प्रक्रिया करणारी सीईटीपी यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यरत नसतानाही लक्ष्मी ऑरगॅनिकसह इतर कंपन्यांकडून उत्पादन सुरू ठेवले जात असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. हा लढा केवळ एका कंपनीविरोधात नसून मानवी जीवन आणि पर्यावरणाला धोका निर्माण करणाऱ्या प्रवृत्तीविरोधातील असल्याचे अ‍ॅड. सरोदे यांनी स्पष्ट केले.

## थोडक्यात...



### ओंकार हत्तीचा गोवा राज्यातील पेडणे परिसरात पुन्हा वावर

सावंतवाडी (स. गांवकरी) : ओंकार नावाचा हत्ती पुन्हा एकदा गोवा राज्यातील मोपा परिसरात दाखल झाला असून सध्या त्याचा पेडणे तालुक्यातील विविध गावांमध्ये वावर सुरू आहे. हत्तीच्या या वावरामुळे स्थानिक शेतकऱ्यांच्या शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, बाधित शेतकरी अद्याप शासकीय भरपाईच्या प्रतीक्षेत आहेत. प्रशासनाने नुकसानीचे तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी जोरदार मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे. दरम्यान, पत्रादेवी (महाराष्ट्र – गोवा राज्याच्या सीमा) येथे केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत नूतनीकरण केलेल्या हुतात्मा स्मारकाचा लोकार्पण सोहळा पार पडत आहे. या कार्यक्रमासाठी व्हीआयपी सुरक्षा, वाहतूक व इतर व्यवस्थेसाठी प्रशासकीय यंत्रणा पूर्णपणे व्यस्त आहे. मात्र, दुसरीकडे हत्तीमुळे झालेली शेतीची हानी आणि शेतकऱ्यांचे प्रश्न याकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याची नाराजी व्यक्त होत आहे.

### बजरंग दलाकडून प्रार्थनासभा उधळण्याचे प्रकार

मुंबई (स. गांवकरी) : बळजबरीने धर्मांतराच्या विरोधात कडक कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने मंजूर केलेला 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य कायदा, २०२६' हा कायदा २८ ऑगस्ट पासून लागू होत आहे. या कायद्याचे पडसाद मुंबईतील ख्रिश्चन धर्मीय सभांमधून उमटायला सुरुवात झाली आहे. वसई, विरार, मिरा-भाईंदर आणि इतर प्रार्थनासभामधून स्थानिक धर्मगुरू भाविकांकडून फॉर्म भरून घेत आहेत. यापूर्वी कधीही अशी वेळ त्यांच्यावर आली नव्हती. प्रार्थनासभांत उपस्थित राहण्यासाठी भाविकांकडून आता स्वयंघोषणा पत्र लिहून घेतले जात आहे. आपण स्वतःच्या इच्छेने आणि कोणताही दबाव, आमिष, मोह, प्रलोभन आणि धमकीला बळी न पडता हजर राहत आहोत, असे भाविकाला लिहून द्यावे लागणार आहे. या स्वयंघोषणा पत्रात पुढे असेही म्हटले की, चर्चमध्ये उपस्थित राहण्याचा त्यांचा निर्णय पूर्णपणे वैयक्तिक, ऐच्छिक आणि स्वतंत्र आहे. या अर्जावर भाविकाचा पासपोर्ट आकाराचा फोटो आणि आधार किंवा पॅन नंबर लिहावा लागणार आहे.

## 'चिरीमिरी' संस्कृतीला धक्का देणाऱ्या सेवा हक्काची व्याप्ती वाढणार

### सरकारी सेवा मुदतीत नाही मिळाली तर थेट वरिष्ठांकडे अपील

**मुंबई : (स. गांवकरी)**

जन्माचा दाखला असो वा मृत्यूचा, कोणतीही शासकीय सेवा सरकारने विहित केलेल्या कालावधीत मिळाली नाही, तर आता नागरिकांना अपील करण्यासाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागणार नाहीत. यासाठी 'स्वयंचलित ऑनलाईन अपील प्रणाली' (ऑटो अपील सिस्टीम) सुरू करण्याचा प्रस्ताव 'महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगा'ने राज्य सरकारकडे पाठविला आहे. या प्रस्तावाला मान्यता मिळाल्यास, मुदत संपताच कसूरदार अधिकाऱ्याविरोधात वरिष्ठ पातळीवर प्रथम अपील दाखल होईल. प्रशासकीय स्तरावरील 'चिरीमिरी' संस्कृतीला धक्का देणाऱ्या व सेवा हक्क कायद्याची व्याप्ती वाढवणाऱ्या या क्रांतिकारक निर्णयामुळे नागरिकांना सरकारी सेवा मिळवण्यासोबतच, वेळेत काम न झाल्यास घरबसल्या दाद मागणेही सोपे होणार आहे.




सध्या राज्यातील ४० हून अधिक विभागातील सुमारे १,२१२ इतक्या सेवा या कायद्याखाली अधिसूचित असून सुमारे एक हजार सेवा ऑनलाईन उपलब्ध करून दिल्या जात आहेत. आपले सरकार या पोर्टल किंवा अ‍ॅपवर या सेवा ऑनलाईन मिळविता येतात. गेल्या १० वर्षात सरासरी प्रतिवर्षी २.५ कोटी अर्ज या कायद्याखाली निकाली काढून सेवा देण्यात आली आहे.

नागरिकांना पारदर्शक, गतिमान आणि निश्चित कालमर्यादेत सरकारी सेवा मिळाव्यात, या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकाराने राज्यात २८ एप्रिल २०१५ पासून 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम' लागू करण्यात आला आहे. यानुसार, एखादी अधिसूचित सेवा मुदतीत मिळाली नाही किंवा ती विनाकारण नाकारली गेल्यास, नागरिकांना पहिल्या आणि दुसऱ्या अपीलासाठी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे धाव घ्यावी लागते. त्यानंतरही सेवा न मिळाल्यास, तिसरे अपील थेट 'महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगा'कडे करावे लागते. मात्र, आता आयोगाकडून प्रस्तावित स्वयंचलित अपील प्रणाली मान्य झाल्यास नागरिकांना पहिले अपील दाखल करण्यासाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागणार नाहीत.


## गणेशोत्सवाच्या तोंडावर मुंबई-गोवा महामार्गाला 'गळती'चे विघ्न!

### सावर्डेत पुन्हा रस्ता खचला, लाखो चाकरमान्यांच्या सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर

**चिपळूण रत्नागिरी : (स. गांवकरी)**

गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील समस्यांचे विघ्न कायम असल्याचे चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे. चिपळूण तालुक्यातील सावर्डे येथे महामार्गाचा भाग पुन्हा खचून मोठा खड्डा पडला असून, दोन चारचाकी वाहनांचे टायर त्यात अडकल्याने किरकोळ अपघात झाला. दुसरीकडे खेड तालुक्यातील कशेडी बोगद्यात पाण्याचा पाझर आणि गळती अद्यापही सुरूच असून, रस्त्यावर थेट पाण्याचे फवारे येत असल्याने मार्ग निसरडा झाला आहे.

गणेशोत्सवाच्या काळात मुंबई, पुणे तसेच अन्य शहरांतून मोठ्या संख्येने चाकरमानी कोकणात दाखल होणार असल्याने या दोन्ही ठिकाणच्या समस्यांमुळे महामार्गाच्या दर्जाबरोबरच प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. सावर्डे येथील आरती स्वीट्ससमोर यापूर्वी महामार्गावर मोठा खड्डा पडला होता. त्यात वाहने आदळून अनेकदा अपघात झाले होते. स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त करत समस्या तातडीने न सोडवल्यास आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर राष्ट्रीय महामार्ग विभागाने संबंधित ठिकाणी वाहतूक बंद करून दुरुस्तीचे काम केले होते. मात्र, दुरुस्ती झालेल्या ठिकाणापासून काही अंतरावरच पुन्हा महामार्गाचा भाग खचल्याने 'दुरुस्तीवर दुरुस्ती कशासाठी?' असा सवाल आता उपस्थित होत आहे.



रविवारी रात्री महामार्गाचा एक भाग अचानक खचून मोठा खड्डा पडला. रात्रीच्या अंधारात हा खड्डा वाहनचालकांच्या लक्षात न आल्याने दोन चारचाकी वाहनांचे टायर त्यात अडकले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. घटनेची माहिती मिळताच महामार्ग विभागाने त्या भागातील वाहतूक बंद करून संबंधित एजन्सीला तातडीने दुरुस्तीच्या सूचना दिल्या.

मुंबई-गोवा महामार्गावरील आणखी एक महत्त्वाचा प्रश्न कशेडी बोगद्यातील पाण्याच्या गळतीचा आहे. बोगद्याचे काम पूर्णत्वास गेले असले तरी पावसाळा सुरू होताच दोन्ही बोगद्यांच्या छतासह भिंतींमधून मोठ्या प्रमाणात पाणी झिरपत आहे. काही ठिकाणी पाण्याचे फवारे थेट रस्त्यावर येत असल्याने मार्ग ओला आणि निसरडा झाला आहे.






# थोडक्यात पण महत्वाचे



## वेदांत हॉटेलचे नानजीभाई ठक्कर यांच्या हस्ते उद्घाटन

■ स्वच्छता, सात्त्विकता आणि प्रामाणिकतेचा संदेश!

ठाणे (स. गांवकरी) : समाजसेवक श्री. नानजीभाई खीमजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांच्या शुभहस्ते २४ ऑगस्ट रोजी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या शेजारी असलेल्या वेदांत हॉटेलचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटनानंतर हॉटेल मध्ये मंदिरासारखे पवित्र, स्वच्छ आणि शांततामय वातावरण पाहायला मिळाले. या प्रसंगी जिल्हा परिषद सदस्य शिवाजीराव आढळराव पाटील, शंकर शेट (सिनोली), गणपत डिंगरे, पप्पूभाई शेट, राजेंद्र पुराणी, राजेंद्र पांडे यांच्यासह वेदांत हॉटेलचे मालक आणि सुमारे ४०० ते ५०० नागरिक उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी वेदांत लॉजिंगच्या संचालकांचे अभिनंदन करून व्यवसायाच्या यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. नानजीभाई ठक्कर यांनी हॉटेल मधील स्वच्छता व शांततामय वातावरणाचे कौतुक केले. “स्वच्छ, सुंदर आणि शांत वातावरण कायम राखल्यास व्यवसाय निश्चितच चांगला चालेल. ग्राहकांनाही अशा प्रसन्न वातावरणात राहणे आवडते,” असे त्यांनी सांगितले. “व्यवसाय चालवताना पती-पत्नीने सात्त्विकता, नैतिकता आणि प्रामाणिकतेची मूल्ये जपली, तर घरही मंदिरासारखे पवित्र राहते. व्यवसायात येणारा प्रत्येक ग्राहक हा देवाच्या रूपात असतो. त्यामुळे त्याच्याशी प्रेम, आदर, सन्मान आणि प्रामाणिकपणे व्यवहार केला पाहिजे. चांगले संस्कार आणि सात्त्विक वातावरण कायम राखल्यास व्यवसायासोबतच कुटुंबातील सुख-शांती व प्रतिष्ठेतही वाढ होते,” असा संदेश नानजीभाई ठक्कर यांनी यावेळी दिला.




## खेड तालुका कोकण रहिवाशी मंच ९ वा वर्धापनदिन सोहळा उत्साहात संपन्न

ठाणे (स. गांवकरी) : खेड तालुका कोकण रहिवाशी मंच, दिवा शहर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला ९ वा वर्धापनदिन सोहळा दिवा शहरात मोठ्या उत्साहात, आनंदात आणि थाटामाटात संपन्न झाला. सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक बांधिलकीचे दर्शन घडविणाऱ्या या सोहळ्यात विद्यार्थ्यांचा गुणगौरव, शैक्षणिक साहित्य वाटप तसेच ज्येष्ठ नागरिकांचा यथोचित सन्मान करण्यात आला. सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे केवळ वर्धापनदिनाचा उत्सव न साजरा करता सामाजिक बांधिलकी जपत मंचाच्या वतीने ज्युनिअर के.जी.पासून ते ग्रॅज्युएशन पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन मिळावे आणि त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रेरणा मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी समाजाचे आधारस्तंभ असलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा सन्मानपूर्वक गौरव करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते ज्येष्ठांचा सत्कार करून त्यांचे आशीर्वाद घेण्यात आले. या प्रसंगी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि ज्येष्ठ नागरिकांच्या चेहऱ्यावरील समाधान हे सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरले. सोहळ्याला दिवा शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी तसेच मोठ्या संख्येने कोकणातील समाजबांधव उत्स्फूर्तपणे उपस्थित होते. उपस्थितांनी मंचाच्या सामाजिक कार्याचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## ‘सांस्कृतिक कुंभ’; देशभरातील भक्तिपरंपरांचा अनोखा संगम

नाशिक (स. गांवकरी) : महासिंहस्थाच्या आधी नाशिकमध्ये भक्ती, संगीत आणि भारतीय संतपरंपरेचा अनोखा ‘सांस्कृतिक कुंभ’ अनुभवायला मिळणार आहे. महाराष्ट्राची कीर्तन परंपरा, पंजाबची गुरबाणी शबद कीर्तन परंपरा आणि मणिपूरचे वैशिष्ट्यपूर्ण नट संकीर्तन अशा देशाच्या विविध भागांतील भक्तिपरंपरांचा संगम ‘सिंहस्थ महाकुंभ भक्ती संगम’ या तीन दिवसीय महोत्सवातून साधला जाणार आहे. २८ ते ३० ऑगस्टदरम्यान ठक्कर डोम येथे होणाऱ्या या महोत्सवात विविध प्रदेश, परंपरा आणि कलाप्रकार एकाच व्यासपीठावर येणार आहेत. नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणातर्फे आयोजित या महोत्सवाची संकल्पना केवळ विविध कलाकारांना एकत्र आणण्यापुरती मर्यादित नाही. कुंभाच्या मूळ भावनेतील विविध भक्तिपरंपरांचा संगम सांस्कृतिक पातळीवर घडविणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. देशभरातील भक्ती, भजन आणि कीर्तनाच्या विविध परंपरांना एकाच व्यासपीठावर आणून त्यातील वैविध्य आणि त्यांना जोडणारा भक्तीचा समान धागा अधोरेखित केला जाणार आहे.

## इगतपुरीत कासा ब्लांका व्हिलावर पोलिसांचा छापा

इगतपुरी (स. गांवकरी) : इगतपुरी तालुक्यातील पिंप्री सदो येथील व्यंकटेश नगरमधील कासा ब्लांका इको स्टे व्हिला येथे इगतपुरी पोलिसांनी छापा टाकून मोठ्या प्रमाणात विदेशी दारूचा साठा जप्त केला आहे. या प्रकरणी चौघांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम 1949 चे कलम 65 (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, पोलीस शिपाई गौतम अर्जुन लहांगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गु.र.नं. 189/2026 दाखल करण्यात आला आहे. दि. २२ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास पिंप्री सदो येथील कासा ब्लांका व्हिलामध्ये ही कारवाई करण्यात आली. या घटनेत व्हिलाचा मॅनेजर आर्यन राज अनिल सिंग, केअरटेकर दीपेश कुमार मंडल, पवन कुमार राजेश मंडल, वय २० तिघे रा. कासा ब्लांका व्हिला, पिंप्री सदो, हुसेन बु-हान खाटुमडी, रा. मुंबई यांच्याकडे विनापरवाना बेकायदेशीररित्या विदेशी दारूचा साठा आपल्या ताब्यात बाळगल्याचे आढळून आले. या कारवाईत जॉनी वॉकर ब्लॅक व्हिस्की १ लिटरचे २ खंबे, जॉनी वॉकर ब्लॅक व्हिस्की 750 मि.ली.चे २ खंबे, जॅगर माईस्टर 750 मि.ली. चे ३ खंबे, बॉम्बे सफायर लंडन ड्राय जीन एक लिटरचे २ खंबे, ॲबसोल्युट वोडका एक लिटरचा १ खंबा, कोरोना एक्सट्रा बिअर ३३० मि.ली.च्या २४ बाटल्या अशा एकुण ४५ हजार ७९० रुपये किंमतीचा मद्यसाठ्याचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर गुन्हा पोलीस हवालदार पी. व्ही. घेगडमल यांनी दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक घनश्याम बळप यांच्या मार्गदर्शनाखाली गोपनिय पोलीस हवालदार निलेश देवराज करत आहे.

# कोट्यवधींचा खर्च करूनही मॉन्सून फेस्टिव्हल फिका

■ प्रेक्षकांसाठी शालेय विद्यार्थ्यांचा आधार?
■ कार्यक्रमांमध्ये वैविध्याचा अभाव असल्याची पर्यटकांमध्ये चर्चा
■ आदिवासी लोककला व लोकसंस्कृतीला अधिक प्राधान्य देण्याची मागणी






डांग, गुजरात : (स. गांवकरी)

डांग जिल्ह्यातील राज्यातील एकमेव गिरिमथक असलेल्या सापुतारा येथे पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी पर्यटन विभागाकडून कोट्यवधी रुपयांचा खर्च करून 20 दिवसांच्या मॉन्सून फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले आहे. मात्र, सोमवारी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाला प्रेक्षकांची अत्यल्प उपस्थिती दिसून आल्याने संपूर्ण नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. कार्यक्रम गर्दीचा दिसावा यासाठी सापुतारा तसेच आसपासच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना बोलावण्यात आल्याची चर्चा सुरू झाली आहे.पर्यटन विभागाचा मुख्य उद्देश सापुताऱ्यात पर्यटकांची संख्या वाढविणे तसेच गुजरातच्या सांस्कृतिक वारशाला प्रोत्साहन देणे हा आहे. मात्र, फेस्टिव्हलदरम्यान दररोज आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांमध्ये अपेक्षित वैविध्य दिसून येत नसल्याची चर्चा पर्यटकांमध्ये आहे. पर्यटकांच्या म्हणण्यानुसार सापुताऱ्याची आगळीवेगळी आदिवासी संस्कृती, लोककला, लोकसंगीत आणि पारंपरिक कला यांना कार्यक्रमांमध्ये पुरेसे स्थान मिळायला हवे. त्याऐवजी काही कार्यक्रमांमध्ये पाश्चिमात्य संगीत तसेच गरब्याच्या तालावर अधिक भर दिला जात असल्याची चर्चा आहे. काही कार्यक्रमांमध्ये कलाकारांकडून मनोरंजन करून घेण्याऐवजी उपस्थित प्रेक्षकांनाच गरबा आणि इतर उपक्रमांमध्ये सहभागी करून घेतले जात असल्याचेही बोलले जात आहे. सोमवारी आयोजित कार्यक्रमाला प्रेक्षकांची संख्या कमी असल्याने कार्यक्रम गर्दीचा दिसावा यासाठी शाळेतील विद्यार्थ्यांना आणण्यात आल्याची चर्चा आहे. त्यामुळे पर्यटन विभागाच्या नियोजनावर अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. जर मॉन्सून फेस्टिव्हल पर्यटकांना आकर्षित करण्यात खरोखरच यशस्वी ठरत असेल, तर कार्यक्रमस्थळी मोठ्या संख्येने शालेय विद्यार्थ्यांना बोलावून मैदान भरवण्याची गरज का पडली? असा सवाल स्थानिक नागरिक तसेच पर्यटकांकडून उपस्थित केला जात आहे.गतवर्षी नामांकित कलाकारांमुळे फेस्टिव्हल ठरला होता आकर्षणाचा केंद्रबिंदू. उल्लेखनीय म्हणजे, गतवर्षी अधिसूचित क्षेत्र कार्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दिवाळी फेस्टिव्हलमध्ये लोकप्रिय गायिका गीता रबारी यांच्यासह नामांकित कलाकारांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यामुळे स्थानिक नागरिकांसह मोठ्या संख्येने पर्यटक कार्यक्रमाला उपस्थित राहिले होते आणि फेस्टिव्हलला चांगला प्रतिसाद मिळाला होता. मात्र, यंदा पर्यटन विभागाकडून आयोजित करण्यात आलेल्या मॉन्सून फेस्टिव्हलमध्ये नामांकित कलाकार तसेच विविध प्रकारच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचा अभाव दिसून येत असल्याने पर्यटकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. सापुताऱ्याची आगळीवेगळी आदिवासी संस्कृती, लोककला, लोकसंगीत आणि पारंपरिक कलांना आगामी कार्यक्रमांमध्ये अधिक प्राधान्य देण्यात यावे, अशी मागणी पर्यटकांकडून होत आहे.

## ओतूरमध्ये चौथा राज्यस्तरीय श्रावणधारा काव्यमहोत्सव संपन्न

आळेफाटा, ता. जुन्नर : (स. गांवकरी)



रविवार दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय,ओतूर येथे चौथा राज्यस्तरीय श्रावणधारा काव्य महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमांची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली. संस्थेचे खजिनदार रणजीत पवार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. स्वागताध्यक्ष डॉ. खं.र.माळवे यांनी सर्वांचे स्वागत केले. सर्व प्रमुख पाहुण्यांचा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला. या महोत्सवात राजेश साबळे (ओतूरकर)लिखित यांचे लेख संग्रह 'मला काही सांगायचंय' तर डॉ. प्रवीण डुंबरे यांचा बालकवीसंग्रह 'आई, दे ना खाऊ!' तसेच डॉ. खं.र.माळवे यांचा 'सामाजिक पर्यावरण' हा लेख संग्रह आणि 'भागीरथाची गंगा' शोभा गवांदे-कानवडे यांचा 'भागीरथाची गंगा' आणि 'श्रावणधारा काव्य महोत्सव समितीचा प्रातिनिधिक काव्यसंग्रह भाग- ३,' या पाच पुस्तकांचे प्रकाशन, उपस्थित मान्यवरांच्या हस्ते झाले. समारंभाचे उद्घाटक म्हणून जिल्हा परिषद सदस्या डॉ. छायाताई तांबे व कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून शोभाताई गवांदे-कानवडे लाभल्या होत्या. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रमेश शिरसाट, मराठी विभाग प्रमुख डॉ.वसंत गावडे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मोहितशेठ ढमाले, पंचायत समिती सदस्य प्रशांत डुंबरे प्रमुख पाहुणे होते.

पाठ्यपुस्तकातील कवी इंजि. शिवाजीराव चाळक साहेब आणि उत्तम सदाकाळ सर या ज्येष्ठ साहित्यिकांचा विशेष सन्मान यावेळी करण्यात आला. सेवाभावी कर्मचारी आनंदा वळे, डॉ. ऋत्विक कोंडार आणि डॉ. पुष्पांजली वळे यांचाही सन्मान करण्यात आला. या महोत्सवासाठी राज्याच्या विविध भागातून ८३ कवींनी सहभाग घेऊन आपल्या कविता सादर केल्या. मा. संतोष गाढवे, अध्यक्ष म.सा.प राजगुरूनगर, प्रसिद्ध कवी निवेदक व्याख्याते मा. संदीप वाघोले आळेफाटा यांनी परीक्षक म्हणून उत्तम काम पाहिले. सदर राज्यस्तरीय काव्यस्पर्धेत अनुक्रमे प्रथम - क्रमांक अंकित आव्हाड पैठण, द्वितीय क्रमांक - शशिकला कुंभार ठाणे, तृतीय क्रमांक - अविनाश बाळासाहेब हांडे,उंब्रज(जुन्नर), चतुर्थ क्रमांक - आनंदा त्रिभुवन ब्राम्हणवाडा ता. अकोले, पाचवा क्रमांक - सौ. सविता जंगम ओतूर, यांची पारितोषिक प्राप्त म्हणून निवड करण्यात आली. सर्व विजेत्यांचे अभिनंदन! श्रावणधारा काव्य महोत्सव समितीचे, उपाध्यक्ष डॉ. खं. र माळवे, कार्याध्यक्ष प्रा. सुरेश गे. डुंबरे, सचिव डॉ. प्रवीण डुंबरे, सहसचिव संजय गवांदे, खजिनदार रणजीत पवार, सहखजिनदार प्रा. नागेश हूलवळे यांच्या अथक परिश्रमातून श्रावणधारा काव्य महोत्सव संपन्न झाला. कविवर्य संजय गवांदे यांनी कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन केले. संस्थेचे अध्यक्ष राजेश साबळे (ओतूरकर) यांनी सर्वांचे आभार मानले. या सोहळ्यासाठी पोपटराव नलावडे, प्रा. डॉ. नामदेव डोके, ॲड. भास्कर देशपांडे, इंजि. प्रकाश देशमुख, सौ. सुरेखा भोर, शैला साबळे, नंदा गवांदे, प्रतिभा डुंबरे, मीनाक्षी देशमुख, भाग्यश्री देशपांडे, सुदाम ढमाले गुरुजी आणि दावल ठिकेकर, प्रा. केशव बोरकर, सरिता कलढोणे, डॉ. रोहिणी मदने, डॉ. लता पाडेकर, डॉ. अनुपमा पाटील, सावित्री झांबरे, शशिकला कुंभार, सुनीता भालेराव, गुलचंद चंदने, ह.भ.प. निवृत्ती महाराज कानवडे इत्यादी राज्यभरातील अनेक नामांकित साहित्यिक उपस्थित होते.

## धर्मध्वजाचे ध्वजारोहण उत्साहात संपन्न विविध धार्मिक कार्यक्रमांना सुरुवात



रावेर : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्याचे माजी महसूल मंत्री तथा ज्येष्ठ नेते मा. आ. श्री. एकनाथरावजी खडसे यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित अमृतमहोत्सवी सोहळ्याची आणि अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात आज अत्यंत उत्साहात झाली. श्री संत मुक्ताई मंदिर, जुनी कोथळी येथे आज दिनांक २३ ऑगस्ट रोजी हा पावन सोहळा पार पडला.

श्री संत मुक्ताई मंदिर, जुनी कोथळी येथे आज सायंकाळी ४.०० वाजता सतपंथ आचार्य प.पू. महामंडलेश्वर जनार्दन हरीजी महाराज यांच्या शुभहस्ते धर्मध्वजाचे ध्वजारोहण अतिशय उत्साहात संपन्न झाले. या धार्मिक कार्यक्रमाच्या शुभारंभासोबतच विविध धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांना अधिकृत सुरुवात झाली आहे.

ध्वजारोहण सोहळ्यानंतर आज नियोजन बैठक संपन्न झाली. या पवित्र सोहळ्यासह पार पडलेल्या कार्यक्रमास ह.भ.प. रविंद्र हरणे महाराज, ह.भ.प. भरत महाराज बेळीकर, ह.भ.प. रमेश महाराज आडविहिरकर, संत मुक्ताई संस्थानचे अध्यक्ष ॲड. रविंद्र भैय्यासाहेब पाटील, ह.भ.प. श्री. विशाल महाराज खोले यांच्यासह परिसरातील विविध ह.भ.प. कीर्तनकार, वारकरी बांधव, पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते.

## ठाणे पोलिसांसाठी विशेष कॅन्सर तपासणी शिबिर




### ७०० पोलिस अधिकारी-कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी!

ठाणे : (स. गांवकरी)

ठाणे पोलिसांच्या आरोग्याची काळजी लक्षात घेऊन २४ ऑगस्ट रोजी ठाणे येथील रिद्धी-सिद्धी हॉल पोलीस सभागृहात विशेष कॅन्सर तपासणी व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला शेठ नानजीभाई खीमजीभाई ठाणावाला, कॅन्सर तज्ज्ञ डॉ. अमजदखान पठाण, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्यासह मोठ्या संख्येने पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. विनोदी कलाकार नितीन देसाई यांनीही शिबिराला उपस्थिती लावली.

कॅन्सरबाबत जनजागृती करणे, आजाराचे वेळेत निदान होणे तसेच योग्य उपचाराबाबत मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने शिबिराचे आयोजन करण्यात आले. मुंबईहून कॅन्सर तज्ज्ञांसह सुमारे ४० डॉक्टरांची वैद्यकीय पथक सहभागी झाले होते. शिबिरात पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विविध आवश्यक वैद्यकीय तपासण्या करण्यात आल्या. यावेळी सुमारे ५०० ते ७०० नागरिक व पोलीस कर्मचाऱ्यांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.

यावेळी शेठ नानजीभाई ठाणावाला यांनी पोलीस विभागात दर महिन्याला अशा आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्याची गरज व्यक्त केली. कामाच्या तणावामुळे अनेक पोलीस कर्मचारी विविध आजारांना सामोरे जात असल्याचे त्यांनी सांगितले. आजारांचे सुरुवातीच्या टप्प्यात निदान झाल्यास योग्य उपचार करून गंभीर परिणाम टाळता येऊ शकतात, असेही त्यांनी नमूद केले. या प्रसंगी पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच नानजीभाई ठाणावाला यांचाही सन्मान करण्यात आला. तपासणीदरम्यान काही जणांमध्ये आजारांची लक्षणे आढळून आली असून, पुढील तपासणीनंतर त्याबाबतची माहिती स्पष्ट होणार आहे.



## माळशेज-भोरांडे पीएसपी – स्थानिक विकासासोबत स्वच्छ ऊर्जेची साठवण

*प्रस्तावित माळशेज-भोरांडे पंप्ड स्टोरेज प्रकल्प (PSP) महाराष्ट्राच्या स्वच्छ ऊर्जा क्षेत्रातील उद्दिष्टांसोबतच परिसरातील सामाजिक आणि आर्थिक विकासासाठीही महत्त्वाचा पायाभूत सुविधा प्रकल्प ठरण्याची अपेक्षा आहे.*

(स. गांवकरी)

1,500 मेगावॅट क्षमतेचा हा नियोजित प्रकल्प सौर आणि पवन ऊर्जेतून निर्माण होणारी अतिरिक्त वीज साठवून ठेवण्यासाठी आणि विजेची मागणी वाढते त्या काळात ती उपलब्ध करून देण्यासाठी तयार करण्यात येत आहे. यामुळे वीज वितरण व्यवस्था अधिक स्थिर होण्यास, वीजपुरवठा अधिक विश्वासार्ह होण्यास आणि महाराष्ट्र तसेच देशाच्या वाढत्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यास मदत होईल.

वीज क्षेत्रातील योगदानासोबतच या प्रकल्पामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात आर्थिक हालचाली वाढण्याची अपेक्षा आहे. एवढ्या मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पामुळे रस्ते, वाहतूक व्यवस्था, लॉजिस्टिक्स आणि इतर सुविधा सुधारण्यास मदत होईल. तसेच स्थानिक व्यावसायिक आणि सेवा पुरवठादारांसाठी व्यवसायाच्या नवीन संधी निर्माण होतील.

प्रकल्पाच्या बांधकाम आणि कार्यान्वयनाच्या दोन्ही टप्प्यांत अप्रत्यआणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची शक्यता आहे. स्थानिक युवकांना कौशल्य विकास, तांत्रिक प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी मिळू शकतात. तसेच कंत्राटदार, साहित्य पुरवठादार, वाहतूक व्यावसायिक आणि छोटे व्यवसाय यांच्याही आर्थिक उलाढालीत वाढ होण्याची अपेक्षा आहे.

या प्रकल्पामुळे होणाऱ्या सामाजिक आणि आर्थिक विकासामुळे गावातील पायाभूत सुविधा, आरोग्यसेवा, शिक्षण, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा आणि सामुदायिक कल्याणाच्या उपक्रमांमध्ये सुधारणा होण्याची अपेक्षा आहे. अशा प्रकारच्या गुंतवणुकीमुळे आसपासच्या गावांमधील नागरिकांचे जीवनमान दीर्घकाळासाठी सुधारण्यास मदत होऊ शकते. या परिसरात माळशेज घाट, नाणेघाट, जीवधन किल्ला आणि काळू धबधबा यांसारखी लोकप्रिय पर्यटनस्थळे आहेत. रस्ते आणि इतर पायाभूत सुविधा सुधारल्यास पर्यटनाला आणखी चालना मिळू शकते. त्यामुळे पर्यटनावर आधारित व्यवसाय करणाऱ्या स्थानिकांना रोजगार आणि उत्पन्नाच्या अतिरिक्त संधी मिळू शकतात.

महाराष्ट्र स्वस्त, विश्वासार्ह आणि स्वच्छ ऊर्जेकडे वाटचाल करत असताना, माळशेज-भोरांडे पीएसपी सारखे प्रकल्प महत्त्वाच्या पायाभूत सुविधांपैकी एक म्हणून मानले जात आहेत. अशा प्रकल्पांमुळे स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढवणे, स्थानिक रोजगार निर्माण करणे आणि परिसराचा विकास करणे, हे तिन्ही उद्देश साध्य होण्यास मदत होऊ शकते. या प्रकल्पाचे नियोजन करताना पर्यावरण व्यवस्थापन आणि सरकारी नियमांचे पालन यावर विशेष भर देण्यात आला आहे. परिसरातील भौतिक, जैविक तसेच सामाजिक-आर्थिक परिस्थितीचा पर्यावरणीय अभ्यास करण्यात आला आहे. त्याचबरोबर भरपाईच्या स्वरूपातील वृक्षलागवड, जैवविविधतेचे संरक्षण, पाणलोट क्षेत्राचे व्यवस्थापन आणि स्थानिक क्षेत्राच्या विकासासाठी विविध उपाययोजनांचा प्रकल्पाच्या नियोजनात समावेश करण्यात आला आहे. माळशेज-भोरांडे पीएसपी मुळे महाराष्ट्राच्या स्वच्छ ऊर्जा व्यवस्थेला मोठी मदत होण्याची अपेक्षा आहे. त्याचबरोबर राज्याची दीर्घकालीन ऊर्जासुरक्षा मजबूत करण्यास आणि शाश्वत विकासाला चालना देण्यास हा प्रकल्प महत्त्वाची भूमिका बजावू शकतो.

# रोटरी क्लब नारायणगाव हायवेचा पदग्रहण सोहळा उत्साहात संपन्न

नारायणगाव : (स. गांवकरी)




रोटरी क्लब नारायणगाव हायवेच्या रोटरी वर्ष २०२६-२७ साठी अध्यक्ष व संचालक मंडळाचा पदग्रहण सोहळा २४ ऑगस्ट २०२६ रोजी नीलायम बँक्वेट हॉल येथे अत्यंत उत्साहपूर्ण आणि जल्लोषाच्या वातावरणात संपन्न झाला. क्लब क्रमांक ८८०८१ आणि रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ अंतर्गत आयोजित या कार्यक्रमात रोटेरियन सदस्यांचा उत्साह, आपलेपणा आणि सेवाभाव प्रकर्षाने जाणवत होता.

या कार्यक्रमास डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. नितीन ढमाले, असिस्टंट गव्हर्नर रो. डॉ. प्रज्ञा भावरी तसेच जयहिंद ग्रुपचे चेअरमन जितेंद्र गुंजाळ यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात मंगलमय गणेश वंदनेने झाली. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले.माजी अध्यक्ष रो. डॉ. उत्तम घोरपडे यांनी रोटरी वर्ष २०२५-२६ मध्ये क्लबने केलेल्या विविध उल्लेखनीय कार्यांचा आढावा सादर केला. उत्कृष्ट योगदान देणाऱ्या रोटेरियन सदस्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी रो. मंदाकिनी दांगट यांना 'रोटरीयन ऑफ द इयर' हा मानाचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पदग्रहण सोहळ्यादरम्यान रो. डॉ. उत्तम घोरपडे यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष रो. बाळासाहेब ढमाले यांना क्लबचा चार्टर प्रदान करून अध्यक्षपदाचा कार्यभार औपचारिकरीत्या सोपविला. तसेच सचिव रो. हनुमंत बंडारी यांनी नवनियुक्त मानद सचिव रो. योगेश यादव यांच्याकडे सचिवपदाचा कार्यभार सुपूर्द केला.माजी अध्यक्षांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांचे कौतुक करण्यात आले. त्यानंतर अध्यक्ष रो.बाळासाहेब ढमाले यांनी रोटरी वर्ष २०२६-२७ साठी क्लबचा रोडमॅप आणि आगामी वर्षातील कार्यदिशा मांडली. जुलै व ऑगस्ट महिन्यातच क्लबने जवळपास १० सामाजिक प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण केल्याचे त्यांनी सांगितले.यावर्षी क्लबचा विशेष भर पर्यावरण संवर्धन आणि शिक्षण या क्षेत्रांवर राहणार आहे. “प्लास्टिकमुक्त समाज” हे अध्यक्षांच्या कार्यकाळातील प्रमुख अभियान राहणार असून पर्यावरणपूरक समाजनिर्मितीसाठी विविध उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.तसेच जागतिक हृदय दिनानिमित्त वॉकॅथॉन हा क्लबचा महत्त्वाकांक्षी आणि स्वप्रवत प्रकल्प असल्याचे अध्यक्षांनी सांगितले. आरोग्याविषयी जनजागृती निर्माण करून समाजातील अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचण्याचा त्यांचा मानस आहे. आपल्या मनोगतात अध्यक्ष रो. बालासाहेब ढमाले यांनी एक अत्यंत महत्त्वपूर्ण विचार मांडला — “आपण किती प्रकल्प केले हे महत्त्वाचे नाही; त्या प्रकल्पांमधून आपण किती लोकांच्या जीवनाला स्पर्श केला, किती जीवनांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणला, हे अधिक महत्त्वाचे आहे.”

रो. डॉ. प्रज्ञा भावरी यांनी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. नितीन ढमाले यांचा परिचय करून दिला.

डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. नितीन ढमाले यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सदस्यसंख्या वाढ, Global Grant प्रकल्प, Fusion Meeting आणि क्लबच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग यावर विशेष भर दिला. त्यांनी रोटरी फाउंडेशनला योगदान देण्याचे आवाहनही केले.

रोटरीच्या माध्यमातून समाजात मोठ्या प्रमाणावर परिवर्तन घडत असल्याचे सांगताना त्यांनी रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ मधील विविध क्लब्सच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचे सामाजिक कार्य होत असल्याचा उल्लेख केला. “Create Lasting Impact” या रोटरीच्या २०२६-२७ च्या थीमचा खरा अर्थ आपल्या प्रत्येक प्रकल्पातून समाजावर दीर्घकालीन सकारात्मक प्रभाव निर्माण करणे हा आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी मा. माजी आमदार बाळासाहेब दांगट यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याची, समाजसेवेची आणि विविध क्षेत्रांतील मोलाच्या योगदानाची दखल घेत रोटरी क्लब नारायणगाव हायवेचे मानद सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले. त्यांच्या दीर्घकाळच्या सामाजिक कार्याचा गौरव करत रोटरी परिवारात त्यांचे मनःपूर्वक स्वागत करण्यात आले. त्यांच्या अनुभवाचा आणि समाजाशी असलेल्या दृढ संपर्काचा क्लबच्या आगामी सेवाकार्यास निश्चितच मोठा लाभ होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी नवीन रोटरी क्लब सदस्यांचे स्वागत करण्यात आले. डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. नितीन ढमाले यांच्या हस्ते या सर्व नवीन सदस्यांना रोटरी पिन प्रदान करण्यात आली. संपूर्ण कार्यक्रमात माजी अध्यक्ष, नवीन अध्यक्ष, सचिव, खजिनदार, संचालक मंडळ, क्लबने आमंत्रित केलेले डिस्ट्रिक्ट सदस्य आणि सर्व रोटेरियन सदस्यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. नव्या संचालक मंडळाने आगामी रोटरी वर्षासाठी सेवाकार्याची नवी दिशा, नवी ऊर्जा आणि नवे संकल्प स्वीकारले.

रोटरी क्लब नारायणगाव हायवेच्या रोटरी वर्ष २०२६-२७ साठी अध्यक्ष म्हणून रो. बाळासाहेब ढमाले, उपाध्यक्ष म्हणून रो. हनुमंत बंडारी, सचिव म्हणून रो. योगेश यादव आणि खजिनदार म्हणून रो.डॉ. अपेक्षा शिंदे यांनी पदभार स्वीकारला. नवीन संचालक मंडळामध्ये रो. डॉ. पंजाब कथे — क्लब प्रशासन, रो. डॉ. शिवाजी टाकळकर — क्लब ट्रेनर, रो.डॉ.अपेक्षा शिंदे - खजिनदार, रो. नारायण आरोटे - पब्लिक इमेज,रो. नंदकुमार चिंचकर — आय.टी. अधिकारी, रो. शामराव थोरात — रोटरी फाउंडेशन, रो. डॉ. श्रीकांत फुलसुंदर — न्यू जनरेशन, रो. धनाजी बोरकर,रो. मंदाकिनी दांगट — सदस्यत्व, रो. अंबादास वामन — सेवा प्रकल्प, रो. रविंद्र वाजगे — कम्युनिटी डेव्हलपमेंट आणि रो. सुकाजी मुळे यांचा समावेश आहे. तसेच रो. नितीन भुजबळ आणि रो. सुनील परदेशी यांच्यावर कार्यक्रम व फेलोशिप, रो. डॉ. ओंकार सहाणे आणि रो. डॉ. हेमलता गुळवे यांच्यावर वैद्यकीय सेवा, तर रो. सुभाष आंद्रे आणि रो. डॉ. शरद कापले यांच्यावर CSR व निधी संकलन या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. रो. डॉ. योगेश यादव यांनी आभार प्रदर्शन केले. त्यांनी उपस्थित मान्यवर, डिस्ट्रिक्ट सदस्य, रोटेरियन सदस्य आणि कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी योगदान देणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### श्री कपर्दिकेश्वर मंदिरात श्रावणी सोमवार भक्तिमय वातावरणात साजरा

ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील ओतूर येथे मांडवी नदीच्या तीरावर असलेल्या पुरातन व ऐतिहासिक श्री कपर्दिकेश्वर मंदिरात सोमवार, दि. २४ ऑगस्ट रोजी दुसरा श्रावणी सोमवार मोठ्या भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. पहाटेपासूनच शिवभक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. ‘हर हर महादेव’च्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला. दुसऱ्या श्रावणी सोमवारनिमित्त सकाळी सहा वाजता श्री. व सौ. स्वप्निल नलावडे, श्री. व सौ. संजय शेठ अनंता बुगडे, श्री. व सौ. गौरव नरेंद्र पाटील डुंबरे आणि श्री. व सौ. शंकरराव शेरकर यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी श्री कपर्दिकेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अनिलशेठ तांबे, सचिव महेंद्र (गांधी) पानसरे यांच्यासह देवस्थानचे पदाधिकारी व भाविक उपस्थित होते. महाआरतीनंतर मंदिर भाविकांसाठी दर्शनास खुले करण्यात आले. यावेळी पुजारी गोविंदराव डुंबरे, अक्षय तांबे, सागर दाते, सचिन तांबे, यतीन शेटे, रघुनाथ अण्णा तांबे, राजेंद्र डुंबरे, जितेंद्र डुंबरे, अमोल काका डुंबरे, विश्वास पाटील डुंबरे, श्रेयस डुंबरे, प्रसाद डुंबरे, योगेश डुंबरे, तन्मय इस्कांडे, अक्षय ढमाले, तात्या ताजणे, नितीन तांबे आदी उपस्थित होते.

### युवकांनी कायद्याचे भान ठेवून अमली पदार्थ व रॅगिंगपासून दूर राहावे



माढा तालुका (स. गांवकरी) : युवकांमध्ये कायदेविषयक जागरूकता निर्माण करण्याबरोबरच बालकांचे संरक्षण, अमली पदार्थांच्या दुष्परिणामांपासून बचाव आणि रॅगिंगसारख्या गंभीर सामाजिक व कायदेशीर समस्यांविषयी संवेदनशीलता निर्माण करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी कायद्याची माहिती आत्मसात करून जबाबदार नागरिक म्हणून समाजात सकारात्मक भूमिका बजावावी, असे प्रतिपादन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूरचे सचिव तथा न्यायाधीश अमोलकुमार देशपांडे यांनी केले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर यांच्या वतीने गांधी नाथा रंगजी होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, सोलापूर येथे पॉक्सो कायदा, अमली पदार्थ प्रतिबंध आणि रॅगिंगसंदर्भातील कायदे याबाबत विधी जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमात सोलापूर बार असोसिएशनचे उपाध्यक्ष ॲड. परमानंद जवळकोटे यांनी पॉक्सो कायद्याविषयी मार्गदर्शन केले. बालकांचे लैंगिक शोषण रोखण्यासाठी कायद्यातील तरतुदी, बालकांच्या संरक्षणाची जबाबदारी तसेच कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले.

### "आमदार मुक्कामी आपल्या गावी" अभियान संपन्न

माढा तालुका (स. गांवकरी) : सर्वसामान्य नागरिकांना शासकीय कामांसाठी कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत, त्यांच्या समस्या गावपातळीवरच ऐकून त्यावर मार्गदर्शन व कार्यवाही व्हावी, या उद्देशाने आमदार अभिजीत पाटील यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या ‘आमदार मुक्कामी आपल्या गावी’ या उपक्रमास आलेगाव खुर्द येथे उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. माढा तालुक्याच्या इतिहासात प्रथमच आमदारांनी गावात मुक्काम करून नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. या उपक्रमात तालुक्यातील विविध प्रशासकीय विभागांचे अधिकारी एकाच ठिकाणी उपस्थित राहिल्याने नागरिकांना आपल्या प्रश्नांची थेट मांडणी करता आली. त्यामुळे अनेकांचे प्रश्न मार्गी लागण्यास मदत झाली. कार्यक्रमात औपचारिक सत्काराला फाटा देत आमदार पाटील यांनी नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले. महसूल, भूमिअभिलेख, श्रावणबाळ योजना, संजय गांधी निराधार योजना, पंचायत समिती, अन्न व नागरी पुरवठा, कृषी, महावितरण, पशुसंवर्धन तसेच विविध शासकीय दाखले व योजनांशी संबंधित प्रश्न नागरिकांनी मांडले. संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित असल्याने अनेक प्रश्नांवर जागेवरच मार्गदर्शन करण्यात आले, तर प्रलंबित प्रकरणांवर पुढील कार्यवाहीबाबत सूचना देण्यात आल्या. या उपक्रमामुळे ‘प्रशासनाच्या दारी जनता’ऐवजी ‘जनतेच्या दारी प्रशासन’ असे चित्र आलेगाव खुर्दमध्ये पाहायला मिळाले. नागरिक, लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांच्यात थेट संवाद साधला गेल्याने विविध विभागांशी संबंधित प्रश्न एकाच ठिकाणी मांडण्याची सुविधा ग्रामस्थांना मिळाली. यावेळी तहसीलदार संजय भोसले, तालुका कृषी अधिकारी अविनाश चंदन, पोलिस निरीक्षक बाळासाहेब भरणे, महावितरणचे उपकार्यकारी अभियंता राजेंद्र पाटील, पुरवठा अधिकारी प्रीतम पवार, गटविकास अधिकारी महेश सुळे उपस्थित होते.

## इगतपुरी तालुका खो-खो स्पर्धेचे न्यू इंग्लिश स्कूल आहुर्ली येथे उत्साहात उद्‌घाटन

इगतपुरी : (स. गांवकरी)

> मोबाइलच्या युगात मैदानी खेळात सहभाग ही काळाची गरज - संदीप गुळवे

नाशिक जिल्हा क्रीडा अधिकारी व इगतपुरी तालुका क्रीडा विभाग यांच्या वतीने न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज, आहुर्ली येथे तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेचे उद्‌घाटन मोठ्या उत्साहात करण्यात आले. या स्पर्धेत इगतपुरी तालुक्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला आहे. या उद्‌घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले म.वि.प्र. चे संचालक संदीप गुळवे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्‌घाटन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपिठावर यावेळी आहुर्ली न्यू इंग्लिश स्कूलच्या खो-खो संघाला मनसे शेतकरी सेनेचे तालुकाध्यक्ष तथा शेतकरी कृती समितीचे अध्यक्ष नागेश गायकर यांच्याकडून स्पोर्ट्स ड्रेसचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर मविप्रचे संचालक संदीप गुळवे, मनसे शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष नागेश गायकर, विस्तार अधिकारी प्रमोद चिंचोले, सोसायटी चेअरमन महादू पा. गायकर, प्राचार्य अशोक उशीर, स्कुल कमेटी अध्यक्ष रघुनाथ खातळे, बाळासाहेब ढोबळे, परिवर्तन कामगार सेना अध्यक्ष किसन गायकर, केंद्रप्रमुख ज्ञानेश्वर नंदनवार, विजय सहाणे, दगडु तेलोरे, तालुका क्रीडा प्रमुख विजय सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते शरद खकाळे, गणेश मेढे, जनक कुटके यांच्यासह इगतपुरी तालुक्यातील शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आजच्या या मोबाईल युगामध्ये जर विद्यार्थी अशा स्पर्धांमध्ये भाग घेत असतील, तर निश्चितच येणारी पुढची पिढी सक्षम होईल.

## शिवसेना जिल्हाप्रमुख केदार दिघेंच्या उपस्थितीत मेळावा व पक्षप्रवेश

ठाणे : (स. गांवकरी)



शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे ठाणे जिल्हा प्रमुख केदार दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिवा शहरात युवा सेनेचा भव्य पक्षप्रवेश सोहळा पार पडला. दिवा शहर महिला संघटिका ज्योती पाटील उपशहर प्रमुख मारुती पडळकर, विभाग प्रमुख योगेश निकम यांच्या पुढाकाराने आयोजित या कार्यक्रमात परिसरातील अनेक तरुणांनी पक्षप्रवेश करत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. प्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना जिल्हा प्रमुख केदार दिघे यांनी पक्षाशी निष्ठा आणि तत्त्वांशी तडजोड न करण्याच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. "पक्षाचा आदेश हाच आपल्यासाठी अंतिम असतो. गेली चार वर्षे कोणत्याही प्रलोभनांना, आमिषांना वा दबावाला बळी न पडता, स्वाभिमानाने आणि निष्ठेने आपण सर्वजण पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलो आहोत," असे दिघे म्हणाले. धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांचा आणि संस्कारांचा दाखला देत केदार दिघे पुढे म्हणाले, ज्या संघटनेने आपल्याला ओळख दिली, तिथे १०० टक्के योगदान देणे हे आपले कर्तव्य आहे. धर्मवीर आनंद दिघे साहेब शेवटच्या श्वासापर्यंत भगव्याशी आणि शिवसेनेसोबत निष्ठावान राहिले. तोच विचार घेऊन आपल्याला पुढे जायचे आहे." दिवा परिसरातील पाणी, रस्ते आणि कचऱ्याच्या मूलभूत समस्यांवर बोट ठेवत त्यांनी स्थानिक प्रशासनाच्या कारभारावर टीका केली. तरुण पिढीच्या भविष्यासाठी आणि न्याय्य हक्कांसाठी गरज पडल्यास रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याचा इशाराही त्यांनी या वेळी दिला. या कार्यक्रमाचे आयोजन व नेतृत्व शहर संघटिका ज्योती पाटील, उपशहर प्रमुख मारुती पडळकर आणि विभाग प्रमुख योगेश निकम यांनी केले. या सोहळ्यास युवा जिल्हा अधिकारी स्वप्नील पावशे, विधानसभा संघटिका योगिता नाईक, विभाग प्रमुख संजय जाधव, रवी रसाळ, हेमंत नाईक, मंगेश शेलार, उपविभाग प्रमुख संजय निकम, अजित माने, अशोक अमोणकर तसेच शाखा प्रमुख समाधान कदम, अरुण लोकरे धनाजी पोवार शैलेश कदम यांसह पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## देशाच्या स्वातंत्र्यसाठी बलिदान देणारे थोर स्वतंत्र सेनानी हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांच्या ११८ व्या जयंती त्यांच्या जन्मगावी राजगुरुनगर येथे अभिवादन



> पुणे- नाशिक महामार्गावरील भुयारी मार्गाला हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांचे नाव : हुतात्मा राजगुरू यांच्या ११८व्या जयंतीचे औचित्य साधून पुणे- नाशिक महामार्गावरील भुयारी मार्गाला हुतात्मा शिवराम हरी राजगुरू भुयारी मार्ग असे नाव देण्यात आले असून,त्यांचे लोकार्पण वंशज सत्यशील राजगुरू यांच्या हस्ते करण्यात आले.

राजगुरुनगर : (स. गांवकरी)

थोर क्रांतिकारक हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांची ११८वी जयंती राजगुरुनगर येथे उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने हुतात्मा राजगुरू, भगतसिंग आणि सुखदेव यांना अभिवादन करण्यात आले. राजगुरुनगर एसटी बसस्थानकाजवळील हुतात्मा राजगुरू, भगतसिंग आणि सुखदेव स्मृतीस्मारक स्थळी हुतात्मा राजगुरू प्रतिष्ठान च्या वतीने आयोजित अभिवादन कार्यक्रमात उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे, तहसीलदार प्रशांत बेंडसे,नायब तहसीलदार अनिल मोरे पंचायत समिती सभापती विद्याताई मोहिते,उपसभापती मंगेश सावंत, हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील,प्राचार्य पिंगळे,सहकारी बोर्डाचे अध्यक्ष हिरामण सातकर, महात्मा गांधी विद्यालयाचे प्राचार्य रेखा जाधव,शिवसेना जिल्हा संघटक विजया ताई शिंदे,रेखा श्रोत्रीय,ॲड. मनिषा टाकळकर,आदर्श सरपंच कुंडलिक कोहिनकर, नारायण शिंदे,हुतात्मा राजगुरू प्रतिष्ठान चे पत्रकार कोंडिबा टाकळकर, ॲड.मुकुंद आवटे, हुतात्मा राजगुरू फाउंडेशनचे अध्यक्ष बाळासाहेब सांडभोर,अशोक दुगड तसेच शाळा,कॉलेज तसेच एन.सी.सी. च्या विद्यार्थी,तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

जयंती निमित्ताने राजगुरू यांचे वंशज सत्यशील राजगुरू,प्रशांत राजगुरू उपस्थितीत हुतात्मा राजगुरू यांच्या जन्मस्थळी असलेल्या राष्ट्रीय स्मारकात उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या दरम्यान तहसीलदार प्रशांत बेंडसे,नायब तहसीलदार रवींद्र मोरे,नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अंबादास गरकळ पंचायत समिती सभापती विद्याताई मोहिते,उपसभापती मंगेश सावंत ,भाजप तालुका अध्यक्ष शांताराम भोसले,विजयाताई शिंदे,ॲड.मनिषा टाकळकर, रेखा श्रोत्रीय, अमर टाटीया, कुंडलिक कोहिनकर, वैभव गुंडाळ, हुतात्मा स्मारक समितीचे अध्यक्ष अतुल देशमुख,सुशील मांजरे,शैलेश रावळ, आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपविभागीय अधिकारी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की हुतात्मा राजगुरू यांनी देशासाठी केलेले कार्य,त्यांचे त्याग, शौर्य आणि देशभक्तीची प्रेरणा नव्या पिढीने घेऊन आप आपल्या क्षेत्रात योगदान द्यावे, या कार्यक्रमास मोठ्या संख्येने देशप्रेमी नागरिक तसेच विविध ठिकाणांहून आलेले राजगुरूभक्त उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नरेंद्र गायकवाड यांनी केले.

## ठाणे जिल्ह्यातील HFR व HPR नोंदणी करण्याचे आवाहन


ठाणे : (स. गांवकरी)

> डिजिटल आरोग्य व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी आरोग्य संस्था व वैद्यकीय व्यावसायिकांची राष्ट्रीय स्तरावरील नोंदणी आवश्यक

आयुष्मान भारत डिजिटल मिशन (ABDM) अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील सर्व आरोग्य संस्था, रुग्णालये, क्लिनिक, प्रयोगशाळा, डायग्नोस्टिक सेंटर, इमेजिंग सेंटर, दंत चिकित्सालय तसेच विविध मान्यताप्राप्त वैद्यकीय पद्धतीने आरोग्य सेवा देणाऱ्या संस्थांनी Health Facility Registry (HFR) मध्ये नोंदणी करावी. तसेच सर्व वैद्यकीय व्यावसायिक व संबंधित आरोग्य सेवा देणाऱ्या व्यावसायिकांनी Health Professional Registry (HPR) मध्ये नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे. आयुष्मान भारत डिजिटल मिशन (ABDM) हे भारत सरकारच्या National Health Authority (NHA) मार्फत सुरू करण्यात आलेले डिजिटल आरोग्य क्षेत्रातील महत्त्वपूर्ण अभियान आहे. Unified Health Interface (UHI) या डिजिटल आरोग्य परिसंस्थेच्या माध्यमातून देशातील आरोग्य सेवा अधिक सुसूत्र, विश्वासार्ह आणि तंत्रज्ञानाधारित करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या डिजिटल आरोग्य परिसंस्थेमध्ये आरोग्य संस्था व वैद्यकीय व्यावसायिकांची अधिकृत नोंदणी करण्यासाठी HFR आणि HPR विकसित करण्यात आले आहेत. Health Facility Registry (HFR) मध्ये आरोग्य संस्थांची नोंदणी झाल्यामुळे देशभरातील प्रमाणित आरोग्य संस्थांची डिजिटल स्वरूपात माहिती उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

## सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तींना सर्वतोपरी मदत करण्यासाठी आपण सदैव तत्पर राहू : आमदार बाबाजी काळे

### माणुसकी जिवंत आहे पुस्तकाचे प्रकाशन व कृतज्ञता पुरस्कार सोहळा कार्यक्रम




राजगुरुनगर : (स. गांवकरी)

प्रतिष्ठानच्या माध्यमातून तळागाळातील गरजू घटकांपर्यंत मदत पोहोचविण्याचे कार्य कैलास दुधाळे सातत्याने करत आहेत. त्यांच्या या सामाजिक कार्याचे कौतुक करून, गरीब व गरजू घटकांसाठीच्या सामाजिक उपक्रमांना सहकार्य करून मदत करू, असे आश्वासन आमदार बाबाजी काळे यांनी दिले. हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांच्या ११८ व्या जयंतीचे औचित्य साधून, माऊली प्रतिष्ठान चे संस्थापक कैलास दुधाळे लिखित "माणुसकी जिवंत आहे" पुस्तकाचे प्रकाशन व कृतज्ञता पुरस्कार सोहळा येथील चंद्रमा मंगल गार्डन कार्यालयात पार पडला. कार्यक्रमास सामाजिक, राजकीय,साहित्यिक, शैक्षणिक,चित्रकार तसेच पत्रकार व विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.नामवंत कीर्तनकार व जगतगुरु फाउंडेशनचे डॉ.चेतानानंद महाराज,पुणेकर, व सातारा येथील यशोधन अनाथ आश्रम चे रवी बोडके,यांच्या शुभहस्ते झालेल्या या पुस्तक प्रकाशन सोहळा दरम्यान व्यासपीठावर आमदार बाबाजी काळे,नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ,अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस,गिरीश प्रभुणे, पंचायत समिती सभापती विद्याताई मोहिते,उपसभापती मंगेश सावंत,चैतन्य संस्थेचे सुधाताई कोठारी,माजी जि.परिषद सदस्य शरद बुट्टे,कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती अशोक राक्षे,शिवसेना जिल्हा उपप्रमुख रामदास आबा धनवटे ,जिल्हा परिषद सदस्य विजय शिंदे, आणि माऊली प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष कैलास दुधाळे उपस्थित होते. पुढे बोलताना आमदार म्हणाले माऊली सेवा प्रतिष्ठान तालुक्यातील अनेक गोर गरीब गरजू घटकासाठी सातत्याने मदत करत आहे. पक्षाच्या पाठीमागे न उभे न राहता, चांगल्या माणसाच्या पाठीमागे उभे राहण्याची भूमिका प्रतिष्ठानचे अध्यक्ष कैलास दुधाळे यांनी घेतली. पैशाची श्रीमंती न पाहता माणुसकीची श्रीमंती या माध्यमातून जपली असल्याने तालुक्यातील विविध क्षेत्राशी संबंधित नागरिकांशी नाळ जुडली आहे. कार्यक्रमांतर्गत विविध क्षेत्रात सामाजिक कार्य करणारे दिलीप गुंजाळ,प्रीती वैद्य,अनिल कुडिया,डॉ.अभिजीत सोनवणे,गौरी धुमाळ,अक्षय बोऱ्हाडे,माऊली सावंत,दादाराव गायकवाड,कांचन कदम,डॉ.नंदकुमार पालवे, एम.ए.हुसेन समाजसेवकांना कृतज्ञता पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी यशोधन अनाथ आश्रम चे रवी बोडके,डॉ.चेतानानंद महाराज माजी जिल्हा परिषद सदस्य शरद बुट्टे,डॉ. श्रीपाल सबनीस,गिरीश प्रभुणे,यांनी मनोगत व्यक्त केले. माऊली प्रतिष्ठानच्या माध्यमातून कैलास दुधाळे यांनी सामाजिक बांधिलकी जपत अनेक गरजू कुटुंबांना मदतीचा हात दिला आहे. गरीब कुटुंबांना मोफत कपडे, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, तसेच निराधार व दिव्यांग व्यक्तींना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करून त्यांनी माणुसकीची जपणूक केली आहे. याशिवाय वैफल्यग्रस्त व बेवारस व्यक्तींवर उपचार करून त्यांच्यासाठी निवारा उपलब्ध करून देण्याचेही कार्य त्यांनी केले आहे. रिक्षाचालक तसेच निवेदक म्हणून कार्यरत असलेल्या कैलास दुधाळे यांनी आपले बंधू स्वर्गीय तानाजी दुधाळे यांच्या प्रेरणेतून सामाजिक कार्याला वाहून घेतले. प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता गरजूंच्या मदतीसाठी ते सातत्याने पुढाकार घेत आहेत. तालुक्यातील त्यांच्या या सामाजिक कार्याची प्रेरणादायी कहाणी ‘माणुसकी जिवंत आहे’ या पुस्तकातून उलगडण्यात आली आहे. कैलास दुधाळे यांच्या कार्यातून समाजातील दुर्बल घटकांसाठी मदतीचा हात पुढे करण्याची आणि माणुसकी जपण्याची प्रेरणा मिळत आहे.

# रिपाईचे प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या वाढदिवसानिमित्त अक्कलकोटमध्ये महाआरोग्य शिबिर संपन्न

**अक्कलकोट तालुका: (स. गांवकरी)**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या ६९ व्या वाढदिवसानिमित्त सोमवारी अक्कलकोट येथील ग्रामीण रुग्णालय येथे महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिराचे उद्घाटन अक्कलकोट नगरपरिषदेचे नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी व श्री स्वामी समर्थ वटवृक्ष मंदिर समितीचे अध्यक्ष तथा नगरसेवक महेश इंगळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. सदर शिबिरात विविध आजाराचे तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी व उपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात



आले. यावेळी दंतचिकित्सक, कर्करोग तपासणी, स्त्रीरोग व प्रसूती, नेत्र तपासणी, हृदयरोग, मधुमेह, मानसोपचार, अस्थिरोग, बालरोग तसेच सर्वसाधारण बाह्यरुग्ण विभागातील सेवा नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या. याशिवाय ABHA कार्ड तसेच आयुष्मान भारत कार्ड काढून देण्यात आले. सदर शिबीरात रक्ततपासणी - १८२,नेत्रतपासणी ७०, आयुष्यमान १००,आभा ७०,बालरोगतपासणी ८०, हृदयरोगतपासणी १२०,बाह्यरुग्ण तपासणी रुग्ण मिळून एकूण ५४४ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

या महाआरोग्य शिबीरास अक्कलकोट नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष बंटी राठोड, अक्कलकोट पोलिस उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र टाकणे, ग्रामीण रुग्णालयाचे आरोग्य अधिकारी डॉ. रवींद्र बनसोडे, माळी महासंघाचे तालुकाध्यक्ष पराणे, नगरसेवक नन्नू कोरबू, नगरसेवक नागराज कुंभार, रिपाईचे जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, तुळजाराम यारोळे, बबलू कामनूरकर, डॉ. सतीश बिराजदार,डॉ. निरज जाधव, डॉ. शिवा हताळे,डॉ. योगेश बागल, डॉ. सुशांत आलाट,डॉ. श्रीकांत खांडेकर, डॉ.योगेश वेळापुरकर, ग्रामीण रुग्णालयाच्या प्रभारी शितल जाधव आदी उपस्थित होते.

सदर शिबिराचे आयोजन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) अक्कलकोट तालुकाध्यक्ष तथा अक्कलकोट नगरपरिषदेचे आरोग्य सभापती व नगरसेवक अविनाश मडिखांबे यांच्या पुढाकारातून घेण्यात आला.

शिबिर यशस्वी करण्यासाठी अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयाचे सर्व कर्मचारी व मदतनीस यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच रिपाईचे अक्कलकोट तालुका उपाध्यक्ष आंबदास गायकवाड, तालुका , तालुका उपाध्यक्ष प्रकाश गडगडे, यमनाप्पा शिंदे, राजेभाई बोरगावकर, शहराध्यक्ष अजय मुकणार, तम्मा दसाडे, शुभम मडिखांबे,नागेश मडिखांबे, गौतम मडिखांबे, राजूअण्णा भगळे, रमेश दोडमनी, इब्राहिमपूर शाखाध्यक्ष दत्ता बनसोडे, बाबुराव निरगुडी, कृष्णा दोडमनी, बसवराज अचगोंड, निंगप्पा निंबाळ, भीमा मडिखांबे, नितेश मडिखांबे, अजय मडिखांबे, दत्ता कांबळे,सैपन शेख, ईस्माईल शेख,बंटी मडिखांबे, सुरेश गायकवाड,मुकेश सक्सेना, संतोष फुलारे,बाबू बनसोडे, अजय मडिखांबे,दिनेश रुही, विजयकुमार बाळशंकर आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून अक्कलकोट तालुक्यातील सर्व सामान्य नागरिकांना विविध वैद्यकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात आले. यावेळी बोलताना नगरसेवक महेश इंगळे बोलताना म्हणाले की राजाभाऊ सरवदे हे अनेक वर्षांपासून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट यांच्या बरोबर जिल्हा सरचिटणीस पासून ते प्रदेश अध्यक्ष पदापर्यंत आम्ही त्यांचे समाजकार्य चळवळीच्या माध्यमातून पाहिले आहे.

एक नेता, एक झेंडा, एक पक्ष म्हणून सबंध महाराष्ट्रात एक अनोखी ओळख आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली रिपाईचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष पदी अविनाश मडिखांबे यांना जबाबदारी दिल्याने त्यानी त्या पदाचा वापर सर्व सामान्य नागरीकांसाठी योग्य वापर करुन सर्व सामान्य जनतेला न्याय देण्यासाठी प्रयत्न केल्याने त्यांना अक्कलकोट शहरांतील जनता नगरसेवक या पदावर संधी दिली आहे.

## थोडक्यात बातम्या...



### आचार्य तुषार भोसले यांनी घेतले स्वामी समर्थांचे दर्शन

अक्कलकोट (स. गांवकरी) : भारतीय जनता पक्ष (भाजपा) अध्यात्मिक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष आचार्य तुषार भोसले यांनी त्यांच्या पत्नी सौ. प्रिया भोसले आणि समीर पाटील यांच्यासह श्री क्षेत्र अक्कलकोट येथे भेट देऊन श्री वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिरात श्री स्वामी समर्थ महाराजांचे दर्शन घेतले. दर्शनानंतर वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या वतीने मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष श्री. महेश इंगळे यांच्या हस्ते आचार्य तुषार भोसले, सौ. प्रिया भोसले व समीर पाटील यांचा स्वामी महाराजांची प्रतिमा, स्वामींचे कृपावस्त्र आणि श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलताना आचार्य तुषार भोसले म्हणाले, "श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या अक्कलकोट नगरीत येऊन दर्शन घेण्याचे भाग्य लाभले. स्वामींच्या चरणी नतमस्तक होऊन देश, राज्य आणि संपूर्ण समाजाच्या समृद्धी आणि शांततेसाठी प्रार्थना केली." या सत्कार प्रसंगी भाजप युवा मोर्चाचे शिवशंकर स्वामी यांच्यासह देवस्थानचे विश्वस्त आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

### सुयश ट्रस्टने ग्रामीण महिलांना दिली स्वावलंबनाची नवी दिशा




पुणे (स. गांवकरी) : देशातील दुर्गम व वनवासी भागातील कुटुंबांना स्वावलंबनाची दिशा देणाऱ्या 'सुयश चॅरिटेबल ट्रस्ट'कडून महिलांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणावर विशेष भर दिला जात आहे. सेवाकार्याच्या ४६ वर्षांच्या वाटचालीत संस्थेचे कार्य सात राज्यांतील पाच हजारांहून अधिक गावांपर्यंत पोहोचले असून, स्थानिक साधनसंपत्तीचा वापर करून रोजगारनिर्मितीला प्रोत्साहन दिले जात असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष यशवंत घैसास यांनी दिली. या वेळी कार्याध्यक्ष स्मिता घैसास, शलाका घैसास आदी उपस्थित होते. संस्थेच्या दहा सूत्रीय कार्यपद्धतीच्या माध्यमातून ग्रामीण व वनवासी भागातील नागरिकांना विविध कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. कृषी प्रक्रिया, कुटीर उद्योग आणि शेतीपूरक व्यवसायांना प्रोत्साहन देत सुमारे पाच हजार कुटुंबांना रोजगाराच्या माध्यमातून स्वावलंबी करण्यात आले आहे. त्यामुळे रोजगारासाठी होणारे स्थलांतर रोखण्यासही मदत झाली आहे. महिलांना घरगुती उद्योगाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी झाडू तयार करणे, मसाले निर्मिती, कागदी पिशव्या तयार करणे, आमचूर निर्मिती, शेतीपूरक व्यवसाय तसेच विविध कृषी प्रक्रिया उद्योग सुरू करण्यात आले आहेत. नंदुरबारमधील आंबा प्रक्रिया उपक्रमातून वार्षिक सुमारे १० कोटी रुपयांची उलाढाल होत असून, ओडिशातील झाडू निर्मिती उपक्रमातून सुमारे १ कोटी ७५ लाख रुपयांची उलाढाल होत आहे. या उपक्रमांमध्ये महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग असून, त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन कुटुंबांच्या आर्थिक स्थैर्याला हातभार लागत आहे. घैसास यांनी सांगितले की, केवळ मदत करण्यापेक्षा ग्रामीण व वनवासी समाजाला स्वतःच्या पायावर उभे करणे हा संस्थेच्या कार्याचा मुख्य उद्देश आहे. स्थानिक कौशल्य, उपलब्ध साधनसंपत्ती आणि बाजारपेठेची सांगड घालून महिलांसह संपूर्ण कुटुंबाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न भविष्यातही सुरू राहणार आहे.

### एस्कॉर्ट्स कुबोटाचे एमयू ४५०२ आणि एमयू ५००२ ट्रॅक्टर लाँच




पुणे (स. गांवकरी) : एस्कॉर्ट्स कुबोटा लिमिटेडने दोन नवीन ट्रॅक्टर मॉडेल्स सादर केले आहेत – 45 हॉर्सपॉवर कुबोटा एमयू 4502 आणि 50 हॉर्सपॉवर कुबोटा एमयू 5002. या मॉडेल्समुळे कंपनीच्या 41–50 हॉर्सपॉवर श्रेणीतील प्रीमियम युटिलिटी ट्रॅक्टर पोर्टफोलिओ अधिक मजबूत होतो; जो भारतीय ट्रॅक्टर बाजारातील सर्वात मोठ्या आणि वेगाने वाढणाऱ्या विभागांपैकी एक आहे. या दोन्ही मॉडेल्सना उद्योगातील पहिली 8 वर्षांची हस्तांतरणीय वॉरंटी देण्यात आली आहे, जी या उत्पादनांची उच्च दर्जाची बांधणी-गुणवत्ता आणि दीर्घ कार्यक्षम आयुष्य याबाबत कंपनीचा असलेला दृढ विश्वास दर्शवते. दोन्ही ट्रॅक्टरमध्ये विश्वासार्ह कुबोटा केक्यूपी४ जपानी इंजिन देण्यात आले आहे. यामध्ये प्रगत १२एफ + ४आरमल्टी-स्पीड सिंक्रोमेश गिअरबॉक्स आहे, ज्यामुळे जड मशागतीपासून ते वाहतुकीपर्यंत प्रत्येक कामासाठी शेतकऱ्यांना योग्य वेग निवडता येतो. त्यामुळे काम अधिक वेगाने करता येते, अधिक क्षेत्र कमी वेळेत कव्हर करता येते आणि कामे लवकर पूर्ण करता येतात.

## सोलापूरच्या दोन्ही आमदार देशमुखविरुद्ध पालकमंत्री जयकुमार गोरे संघर्षाची शक्यता?

**सोलापूर : (स. गांवकरी)**

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बहुप्रतीक्षित निवडणुकीची प्रक्रिया आता वेगाने पुढे सरकत असून, या निवडणुकीत जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातील जुने-नवे राजकीय संघर्ष पुन्हा उफाळून येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सध्या मतदार यादीची प्रक्रिया सुरू असून ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये प्रत्यक्ष निवडणूक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी सहकारमंत्री आमदार सुभाष देशमुख आणि माजी आमदार विजयकुमार देशमुख यांच्या गटाची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. 2025 च्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत या दोन्ही देशमुखांनी एकत्र येत स्वतंत्र पॅनेल उभे केले होते. त्यांच्यासमोर आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी आमदार दिलीप माने आणि सुरेश हसापुरे यांच्या पॅनेलने आव्हान दिले होते. अखेर कल्याणशेट्टी-माने-हसापुरे गटाने 18 पैकी 13 जागा जिंकत बाजार समितीवर वर्चस्व मिळवले. त्यामुळे बाजार समितीनंतर आता DCC बँकेच्या निवडणुकीतही देशमुख विरुद्ध सत्ताधारी भाजपमधील प्रमुख नेते असा सामना रंगतो का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

DCC बँकेच्या निवडणुकीत पालकमंत्री जयकुमार गोरे यांची भूमिका सध्या विशेष चर्चेत आहे. ऑगस्टमध्ये बोलताना गोरे यांनी बँकेतील गैरव्यवहाराच्या चौकशीचा संदर्भ देत दोषींवर कारवाई होईल आणि दोषी व्यक्तींना सोबत घेऊन निवडणूक लढवली जाणार नाही, अशी भूमिका मांडली आहे. बँकेच्या हिताच्या विरोधात असलेल्या उमेदवारांनाही सोबत घेतले जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

यामुळे आगामी निवडणुकीत केवळ पक्षीय राजकारण नव्हे, तर 'बँकेच्या कारभाराचा मुद्दा' आणि 'सहकार क्षेत्रातील नेतृत्व' हेही प्रमुख मुद्दे ठरण्याची शक्यता आहे.

DCC बँकेची निवडणूक सोलापूरच्या व्यापक राजकारणात महत्त्वाची मानली जात आहे. विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वाखालील भाजप गट आणि मोहिते पाटील गट यांच्यात राजकीय संघर्ष पाहायला मिळाला होता. त्यानंतर DCC बँकेच्या निवडणुकीतही दोन्ही गटांमध्ये पुन्हा सामना होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. या समीकरणात आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि आमदार राजेंद्र राऊत यांची भूमिकाही महत्त्वाची ठरू शकते.

विधान परिषद निवडणुकीनंतर राजेंद्र राऊत यांनी DCC बँकेशी संबंधित काही कर्जवसुलीच्या मुद्द्यांवर आक्रमक भूमिका घेतली होती. त्यामुळे बँकेची निवडणूक ही आगामी काळातील जिल्ह्याच्या राजकीय समीकरणांसाठी महत्त्वाचा टप्पा ठरण्याची चिन्हे आहेत.

## बजाज ऑटोने लाँच केल्या नव्या पल्सर १५० आणि पल्सर १२५

**पुणे : (स. गांवकरी)**



पल्सर ब्रँडच्या 25 वर्षांच्या प्रवासाच्या निमित्ताने बजाज ऑटो लिमिटेडने नव्या पल्सर 150 आणि पल्सर 125 मोटरसायकलींचे अनावरण केले. परफॉर्मन्स, आक्रमक डिझाइन आणि रायडिंगचा खास अनुभव ही पल्सरची ओळख कायम ठेवत दोन्ही मॉडेल्समध्ये नवे इंजिन, गिअरबॉक्स, मोनोशॉक सस्पेन्शन, 5-इंच TFT कन्सोल, राइड मोड्स, Crawl Tech आणि Google Maps नॅव्हिगेशन यांसारख्या आधुनिक सुविधा देण्यात आल्या आहेत. 2001 मध्ये लाँच झाल्यापासून पल्सरने भारतीय मोटरसायकल बाजारपेठेत स्पोर्ट्स बाइकिंगची नवी ओळख निर्माण केली. दैनंदिन प्रवासाच्या साधनापलीकडे जाऊन परफॉर्मन्स, आधुनिक तंत्रज्ञान आणि दमदार व्यक्तिमत्त्व असलेल्या मोटरसायकलचा अनुभव भारतीय रायडर्सना देण्यात पल्सरची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. गेल्या 25 वर्षांत पल्सरच्या 20 दशलक्षांहून अधिक मोटरसायकलींची विक्री झाली असून, हा ब्रँड 40 हून अधिक देशांमध्ये पोहोचला आहे. नव्या पल्सर 150 आणि पल्सर 125 मध्ये मस्क्युलर टँक, आक्रमक डिझाइन, इंजिनचा खास आवाज आणि दमदार पिकअप यांसारखी पल्सरची वैशिष्ट्यपूर्ण ओळख कायम ठेवण्यात आली आहे. मात्र, नव्या पिढीच्या रायडर्सच्या गरजा लक्षात घेऊन इंजिनिअरिंग, तंत्रज्ञान आणि फीचर्समध्ये मोठे बदल करण्यात आले आहेत.

## ग्रामसेवकांच्या मनमानीला राज्य सरकारचा लगाम, आता बायोमेट्रिक + GPS हजेरी सक्तीची!

**कनाशी : (स. गांवकरी)**

> ■ कळवण तालुक्यातील गावागावात खळबळ, पळून जाणाऱ्या ग्रामसेवकांचे दिवस भरले

राज्य सरकारने अखेर ग्रामीण जनतेच्या सर्वात मोठ्या डोकेदुखीवर बोट ठेवले आहे. कधी ग्रामपंचायतीला कुलूप, कधी ग्रामसेवक गैरहजर, तर कधी दुपारीच पळून जाणारे कर्मचारी, यामुळे सर्वसामान्यांचे जन्म दाखले, घरकुल, शौचालय, सातबारा उतारे आणि इतर कामे महिनोनमहिने रखडत होती. आता याला कायमचा ब्रेक लागणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील ग्रामविकास विभागाने राज्यातील सर्व ग्रामसेवक / ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना बायोमेट्रिक आणि GPS प्रणालीद्वारे हजेरी नोंदवणे बंधनकारक केले आहे. शासनाच्या आदेशानुसार आता प्रत्येक ग्रामसेवकाला ग्रामपंचायत कार्यालयातच बोट ठेवून हजेरी लावावी लागणार असून, त्याचे लोकेशन GPS ने थेट जिल्हा परिषदेत ट्रॅक होणार आहे. घरबसल्या किंवा ब्लॉक मुख्यालयातून काम करण्याचे दिवस संपले आहेत. या संदर्भात राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना लेखी आदेश देण्यात आले आहेत. नाशिक जिल्हा परिषदेचे CEO ओमकार पवार यांनीही तातडीने परिपत्रक काढून अंमलबजावणीचे आदेश दिले आहेत. ग्रामसेवक वेळेवर येत नाहीत, भेटत नाहीत अशा नागरिकांच्या आणि लोकप्रतिनिधींच्या सातत्याने तक्रारी येत होत्या, याची गंभीर दखल घेऊन सरकारने हा निर्णय घेतला आहे.

### या नव्या निर्णयामुळे

१) चकरा मारणे बंद : दाखल्यासाठी ४-५ चकरा माराव्या लागत होत्या, आता ग्रामसेवक कार्यालयात सापडणार.
२) पारदर्शकता : बायोमेट्रिकमुळे खोटी हजेरी लावता येणार नाही.
३) पगारावर गदा : अनेक राज्यात हजेरी नसेल तर पगार रोखण्याचे आदेश आहेत, त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही कारवाई होणार.

## महाराष्ट्र होणार "आशियातील सर्वात मोठे डेटा सेंटर”

### विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर : युवा पिढी विकसित भारताचा पाया : नार्वेकर

**(स. गांवकरी)**

आजचा युवक तंत्रज्ञानाच्या बळावर पुढे जात आहे. युवा पिढी हाच विकसित भारताचा पाया आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण घेऊन त्याचा योग्य वापर केला, तर केवळ आपले राज्यच नाही तर देशाचीही प्रगती होणार आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात डेटा सेंटर उभारण्यात येणार असून, येत्या काळात महाराष्ट्र "आशियातील सर्वात मोठे डेटा सेंटर" बनणार आहे. जगातील अनेक देशांचा डेटा सुरक्षित ठेवण्याचे काम महाराष्ट्र करेल, असे प्रतिपादन विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी केले. पंढरपूर तालुक्यातील गोपाळपूर येथील स्वेरी महाविद्यालयात "ज्ञान, तंत्रज्ञान आणि युवाशक्तीच्या माध्यमातून विकसित महाराष्ट्राची निर्मिती" या विषयावर आयोजित कार्यक्रमात ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते. यावेळी आमदार समाधान आवताडे, विधानसभा सल्लागार ॲड. संदीप केकाणे, महाविद्यालयाचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी



बोलताना विधानसभा अध्यक्ष नार्वेकर म्हणाले, "पंढरपूर ही श्रद्धेची, ज्ञानाची आणि शेतीची भूमी आहे. याच पंढरपुरात आता तंत्रज्ञानाची नवी पिढी घडत आहे. तंत्रज्ञानाच्या बळावरच भारताने चंद्रावर झेप घेतली आहे. देशात महाराष्ट्र हे औद्योगिक क्षेत्रात अग्रेसर राज्य आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात 30 लाख कोटींची गुंतवणूक आणली आहे. एआयमुळे जीवन जितके सोपे झाले आहे, तितकेच पुढील काळात टिकून राहण्यासाठी एआय आत्मसात करणे गरजेचे आहे. एआयचा वापर प्रत्येक क्षेत्रात होत आहे. नव-नवीन तंत्रज्ञान येत आहे. भारताच्या अपेक्षा गगनाला भिडल्या आहेत आणि त्या तंत्रज्ञानाशिवाय पूर्ण करणे अशक्य आहे. कोणताही देश यशस्वी करायचा असेल तर सरकारसोबत लोकांचा सहभागही महत्वाचा आहे. लोकशाहीत संविधानिक पद्धतीने विचार व्यक्त करणे महत्त्वाचे आहे. विरोध करा, पण तो संविधानाने दिलेल्या तरतुदीनुसार असावा."कार्यक्रमात त्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या शिक्षणाबाबत माहिती जाणून घेतली. यावेळी आमदार समाधान आवताडे म्हणाले, "ज्ञान, तंत्रज्ञान आणि युवाशक्तीचा योग्य ताळमेळ झाला तर जगाच्या इतिहासात महाराष्ट्र प्रथम क्रमांकाचे राज्य बनेल. तंत्रज्ञानाच्या जोरावर राज्याची प्रगती झाली आहे. युवा शक्ती हा देशाचा आधारस्तंभ आहे. विद्यार्थी हा देशाचा आणि राज्याच्या विकासाचा पाया आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेतले पाहिजे. नालंदा विद्यापीठ आज जिवंत असते तर भारत जगात प्रथम क्रमांकावर राहिला असता. ज्ञान, तंत्रज्ञान आणि युवाशक्तीच्या जोरावर महाराष्ट्र जगात अग्रेसर बनेल. याप्रसंगी स्वेरी महाविद्यालयाचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे यांनी महाविद्यालयाची पार्श्वभूमी सांगून महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीची आणि महाविद्यालयात संशोधनासाठी राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

# शिवाजी जय भवानीच्या जयघोषाने अक्कलनोट दुमदुमले

## सकल मराठा समाजाने केला मान्यवरांचा जंगी सत्कार

**अक्कलकोट : (स. गांवकरी)**

राजा छत्रपती शिवाजी महाराज चौक बसस्थानक येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याचा ठराव आमदार- सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली व नगराध्यक्ष- मिलन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली मंजूर करण्यात आला. या बद्दल अक्कलकोट शहर व तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने सत्कार सोहळा जुने तहसील कार्यालय, नेहरू गल्ली येथील आमदार कार्यालयात संपन्न झाला. जय भवानी...! जय शिवराय...! च्या जय घोषात आमदार कार्यालयाचा परिसर दुमदुमून गेला होता. दरम्यान नगराध्यक्ष- मिलन कल्याणशेट्टी, उपनगराध्यक्ष- ऋतुराज तथा बंटी राठोड, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा राजा छत्रपती शिवाजी महाराज चौक बसस्थानक येथे उभा राहवा या करिता गेल्या कांही वर्षापासून प्रयत्न करत असलेले समाज बांधव व नगरसेवक- तम्मा शेळके यांचा सत्कार सकल मराठा समाजाच्या वतीने मनाचा फेटा, शाल, पुष्प गुच्छ देऊन संपन्न झाला. या प्रसंगी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले, श्री वटवृक्ष स्वामी महराज देवस्थान चे अध्यक्ष महेश इंगळे, अमर पाटील, बाळासाहेब घाटगे, प्रथमेश इंगळे, संजय मोरे, मनोज निकम, नगरसेवक अशोक जाधव, नन्नु कोरबू, नागराज कुंभार, सिद्धाराम टाके, अभिषेक लोकापुरे, नितीन मोरे, सौरभ मोरे, प्रवीण देशमुख, रोहित निंबाळकर, सुमित घाटगे, शीतल फुटाणे, अतिश पवार, प्रवीण घाटगे, निखील पाटील, वैभव मोरे, वरुण शेळके, सुहास सुरवसे, रवी पोळ, मंगेश सूर्यवंशी, आकाश सूर्यवंशी, प्रसाद मोरे, समर्थ घाटगे, प्रथमेश पवार, प्रदीप सलबत्ते, शिवबा जाधव, अण्णासाहेब सुरवसे, प्रदीप सुरवसे, विराज माणिकशेट्टी,



भरत राजेगावकर, ज्ञानेश्वर भोसले, स्वामिनाथ बाबर, रोहन शिर्के, ॲड. फहीम पिरजादे, राजाराम पवार, अमित घाटगे, शुभम सावंत, शुभम चव्हाण, मुन्ना फडतरे, योगेश पवार, दिनेश बंडगर, तानाजी सूर्यवंशी, नितीन चव्हाण, विनोद पवार, राहुल काळे, गणेश मोरे, समर्थ जाधव, सुनिल मोरे, बालाजी पाटील, चंद्रकांत कुंभार, विशाल कलबुर्गी, राहुल शेळके, अनिल मोरे, पिंटू गायकवाड, बंडू इंगळे, रवी कोरे, बाळा पाटोळे, भिमा कोळी, तम्मा परीट, अनिल लोणारी, प्रशांत भगरे, राजू पवार, तानाजी पाटील, अनिल बिराजदार, धनंजय निंबाळकर, समर्थ घाटगे, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी, रमेश शिंदे, गोविंदराव शिंदे, खंडेराया शिंदे, किरण साठे, राजेश इंगळे, स्वामिनाथ बेंद्रे, स्वामिनाथ चव्हाण, कुमार भिसे यांच्या सह अक्कलकोट शहर व तालुका सकल मराठा समाज आदिजण बहुसंख्येने उपस्थित होते.

गेल्या अनेक वर्षापासूनची मागणी पूर्ण होत आहे, या बाबत समाज बांधवातून समाधान व्यक्त होत असून, शिवरायांचा जय घोष अक्कलकोटचा अभिमान, आयरलाड मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती उभी राहणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पवित्र स्मृतीस वंदन करत अक्कलकोटच्या भूमीवर स्वाभिमानाचा इतिहास पुन्हा उज्वल होणार, छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि स्वाभिमानाची ज्योत कायम पेटती राहो, छत्रपतींची प्रेरणा स्वाभिमानाची राजधानी श्री क्षेत्र अक्कलकोट मध्ये विकासाचा संकल्प हाती घेण्यात आला आहे.


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# पन्नास लाख रुपये जिंकणाऱ्या रुचिताच्या उत्तराने महानायक अमिताभ बच्चन भावूक !

## लांडेवाडीच्या कन्येची 'कौन बनेगा करोडपती'मध्ये दमदार कामगिरी; संघर्षावर मात करत बुद्धिमत्तेच्या जोरावर गाठली यशाची उंची

मंचर, ता. आंबेगाव : (स. गांवकरी)

पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. आंबेगाव तालुक्यातील लांडेवाडी गावची सुकन्या आणि सध्या मुंबईतील धारावी परिसरात वास्तव्यास असलेली कु. रुचिता आढळराव हिने सोनी टीव्हीवरील देशातील अत्यंत लोकप्रिय आणि बहुचर्चित 'कौन बनेगा करोडपती' या कार्यक्रमात आपल्या ज्ञानाच्या, बुद्धिमत्तेच्या आणि आत्मविश्वासाच्या जोरावर तब्बल ५० लाख रुपये जिंकून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिच्या या यशामुळे लांडेवाडी, आंबेगाव तालुका तसेच पुणे जिल्ह्याच्या शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात अभिमानाची भावना निर्माण झाली आहे. 'कौन बनेगा करोडपती' या कार्यक्रमाच्या हॉट सीटवर पोहोचणे हेच अनेकांसाठी मोठे स्वप्न असते. देशभरातून असंख्य स्पर्धक या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी प्रयत्न करतात. मात्र, अत्यंत कठीण निवड प्रक्रियेतून पुढे जात हॉट सीटपर्यंत पोहोचणे आणि त्यानंतर कठीण प्रश्नांना आत्मविश्वासाने सामोरे जाणे ही मोठी कसोटी असते. रुचिताने ही कसोटी समर्थपणे पार पाडत आपल्या ज्ञानाची चुणूक दाखवून दिली.





कु. रुचिताचा आजवरचा प्रवास संघर्षमय राहिला आहे. मुंबईतील धारावी परिसरासारख्या प्रतिकूल परिस्थितीत वास्तव्यास असूनही तिने आपल्या परिस्थितीला कधीही आपल्या प्रगतीच्या आड येऊ दिले नाही. ज्ञान मिळवण्याची जिद्द, अभ्यासाची आवड, सतत काहीतरी नवीन शिकण्याची वृत्ती आणि आत्मविश्वास या गुणांच्या बळावर तिने 'कौन बनेगा करोडपती'च्या मंचावर आपली वेगळी ओळख निर्माण केली.

कार्यक्रमादरम्यान रुचिताने अनेक कठीण प्रश्नांना अत्यंत शांतपणे आणि विचारपूर्वक उत्तरे दिली. तिच्या उत्तरांमधील आत्मविश्वास आणि ज्ञान पाहून स्वतः महानायक अमिताभ बच्चन हेही प्रभावित झाल्याचे दिसून आले. प्रत्येक टप्प्यावर परिस्थितीचे भान राखत निर्णय घेणाऱ्या रुचिताने अखेर ५० लाख रुपयांची रक्कम आपल्या नावे केली. रुचिताच्या या यशापेक्षा तिचे एक उत्तर अधिक चर्चेत आले. रुचिताचा जीवनप्रवास आणि तिची परिस्थिती जाणून घेतल्यानंतर अमिताभ बच्चन यांनी आपल्या खास शैलीत तिला विचारले, "रुचिता... क्या करोगी इन पैसों का?"

या प्रश्नाला रुचिताने दिलेले उत्तर अत्यंत साधे, पण मन हेलावून टाकणारे होते. तिने सांगितले, "आई-वडिलांना चांगले घर घेऊन देणार आणि आजपर्यंत मी कधीच बेडवर झोपले नाही, म्हणून स्वतःसाठी एक बेड घेणार." रुचिताच्या या उत्तरातील साधेपणा, तिच्या आई-वडिलांविषयीची कृतज्ञता आणि स्वतःच्या गरजेपेक्षा कुटुंबाला प्राधान्य देण्याची भावना पाहून अमिताभ बच्चनही क्षणभर भावूक झाले. त्यांनी रुचिताकडे एकटक पाहत तिच्या संघर्षाला आणि जिद्दीला मनापासून दाद दिली.

रुचिताच्या संघर्षमय प्रवासाचे कौतुक करताना अमिताभ बच्चन यांनी तिच्यासाठी काही प्रेरणादायी काव्यपंक्तीही सादर केल्या—

"तुम हालातों की भट्टी में,
जब-जब भी मुझको झोकोगे,
तब-तब तप कर सोना बनूँगी मैं,
तुम कब तक मुझको रोकोगे..."

या काव्यपंक्ती रुचिताच्या संघर्षमय जीवनप्रवासाला आणि तिच्या जिद्दीला अगदी समर्पक ठरल्या. परिस्थिती कितीही कठीण असली तरी जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर यश मिळवता येते, याचे ज्वलंत उदाहरण रुचिताने आपल्या कामगिरीतून दाखवून दिले आहे.

लांडेवाडी या आंबेगाव तालुक्यातील गावातून पुढे आलेल्या रुचिताने मुंबईसारख्या महानगरात आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर मिळवलेले हे यश विशेष कौतुकास्पद मानले जात आहे. तिच्या यशामुळे गावातील नागरिक, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच आंबेगाव तालुक्यातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

रुचिताचे यश केवळ ५० लाख रुपये जिंकण्यापुरते मर्यादित नसून, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही स्वप्ने पाहण्याची, त्यासाठी संघर्ष करण्याची आणि ती स्वप्ने प्रत्यक्षात उतरवण्याची प्रेरणा देणारे आहे. आर्थिक परिस्थिती ही माणसाच्या स्वप्नांना मर्यादा घालू शकत नाही, हे रुचिताने आपल्या कर्तृत्वातून सिद्ध केले आहे. 'कौन बनेगा करोडपती'सारख्या देशभरात लोकप्रिय असलेल्या कार्यक्रमाच्या मंचावर आंबेगाव तालुक्याच्या कन्येने आपल्या ज्ञानाचा ठसा उमटवत ५० लाख रुपयांची कमाई केली, ही बाब तालुक्यासाठी निश्चितच अभिमानाची आहे. रुचिताच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, तिच्या पुढील शैक्षणिक आणि वैयक्तिक वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा व्यक्त होत आहेत.

"परिस्थिती कितीही कठीण असो, जिद्द आणि ज्ञानाच्या बळावर यश मिळवता येते," हा संदेश रुचिताच्या यशातून अनेक विद्यार्थ्यांना आणि तरुणांना मिळाला आहे. त्यामुळे लांडेवाडीची ही कन्या आज केवळ ५० लाखांची विजेती नसून, संघर्षावर मात करून स्वप्नांना गवसणी घालणाऱ्या जिद्दीची प्रेरणादायी ओळख बनली आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे

## बीएनसीएमध्ये 'अल्ट्राटेक'च्या सहकार्याने 'काँक्रिट दिन' उत्साहात साजरा



पुणे (स. गांवकरी) : 'काँक्रिट दिना'चे औचित्य साधून अल्ट्राटेक सिमेंटच्या सहयोगाने महर्षी कर्वे स्त्रीशिक्षण संस्थेच्या डॉ. भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वूमेन तर्फे (बीएनसीए) १३ व १४ ऑगस्ट रोजी दोन दिवसांचा भरगच्च कार्यक्रम आखण्यात आला. त्यामध्ये काँकिटची प्रात्यक्षिके,कार्यशाळा, तज्ज्ञांचे मार्गदर्शन तसेच प्रश्नमंजुषा आणि रील्स स्पर्धा इत्यादी आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी अल्ट्राटेक सिमेंटच्या विभागीय प्रमुख अभियंता शीतलराज सिंदखेडे यांचे व्याख्यान पहिल्या दिवशी आयोजित केले होते. बीएनसीएच्या द्वितीय वर्षाच्या दीडशे विद्यार्थिनी या व्याख्यानास उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे आयोजन स्ट्रक्चर सेल विभागप्रमूख डॉ. सुजाता मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. कांचन अतनूरकर, प्रा.श्वेता अलबाळ, प्रा. स्वप्निल शिंदे आणि प्रा. प्रीती नामजोशी यांनी १३ विद्यार्थिनींसोबत केले. बीएनसीएच्या प्रभारी प्राचार्या डॉ. शुभदा कमलापूरकर आणि उपप्राचार्य डॉ. शार्वेय धोंगडे, तसेच प्रा. महेश बांगड, आर्किनियरिंग विभागप्रमूख डॉ. पूर्वा कुलकर्णी यांच्या प्रोत्साहनातून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. काँक्रिट दिनाच्या दोन दिवसांच्या कार्यक्रमात प्रभारी प्राचार्या डॉ. कमलापूरकर आणि उपप्राचार्य डॉ. धोंगडे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. सुजाता मेहतांनी काँक्रिट दिनाच्या कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली.

## 'हाय राईज रिटेनिंग वॉल'च्या नव्या पद्धतीला पेटंट





पुणे (स. गांवकरी) : उंच इमारतींच्या बांधकामामध्ये जमिनीचा दाब नियंत्रित करण्यासाठी आणि बांधकामाची सुरक्षितता वाढविण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या 'हाय राईज रिटेनिंग वॉल अँड अ मेथड ऑफ कन्स्ट्रक्शन ऑफ द सेम' या अभिनव संकल्पनेला भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून पेटंट मंजूर झाले आहे. या संशोधनाचे पेटंटधारक म्हणून मल्हार विकास पाटील आणि वैशाली विकास पाटील यांची नोंद करण्यात आली आहे. भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाने जारी केलेल्या प्रमाणपत्रानुसार या शोधासाठी पेटंट क्रमांक 600147 देण्यात आला असून, पेटंट कायद्यातील तरतुदींनुसार प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर 21 ऑगस्ट 2026 रोजी या पेटंटला मंजुरी देण्यात आली. 'Retaining Wall' म्हणजे माती, भराव अथवा जमिनीच्या दाबाला नियंत्रित ठेवण्यासाठी उभारण्यात येणारी संरचना. उंच इमारती, उताराची जमीन, खोल पाया, बेसमेंट तसेच विविध प्रकारच्या बांधकाम प्रकल्पांमध्ये अशा संरचनांना विशेष महत्त्व असते. विशेषतः वाढत्या शहरीकरणामुळे मर्यादित जागेत उंच बांधकामे करण्याचे प्रमाण वाढत असताना जमिनीची स्थिरता आणि बांधकामाची सुरक्षितता हा अत्यंत महत्त्वाचा विषय बनला आहे. या पार्श्वभूमीवर 'High Rise Retaining Wall' आणि त्याच्या बांधकामाची पद्धत यासंदर्भातील या शोधाला मिळालेले पेटंट बांधकाम क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण मानले जात आहे. पेटंटमुळे या विशिष्ट संकल्पनेला आणि तिच्या बांधकाम पद्धतीला बौद्धिक संपदा संरक्षण प्राप्त झाले आहे.

## ६३ वर्षीय महिलेच्या अवयवदानातून तिघांना मिळाले नवजीवन

- नोबल हॉस्पिटल्स अँड रिसर्च सेंटरमध्ये अवयवदान

पुणे (स. गांवकरी) : मानवतेचा आणि सामाजिक बांधिलकीचा प्रेरणादायी आदर्श घालून देत पुण्यातील ६३ वर्षीय मेंदूमृत महिलेच्या कुटुंबीयांनी अवयवदानास संमती दिली. त्यांच्या या निर्णयामुळे तीन रुग्णांना नवजीवन मिळाले . दीर्घकाळ नियंत्रणाबाहेर असलेल्या उच्च रक्तदाबामुळे झालेल्या मेंदूतील रक्तस्रावानंतर (आयसी ब्लीड) १७ ऑगस्ट रोजी नोबल हॉस्पिटल्स अँड रिसर्च सेंटरमध्ये दाखल करण्यात आल्या होत्या . त्यांना २१ ऑगस्ट २०२६ रोजी त्यांना मेंदूमृत घोषित करण्यात आले. कुटुंबीयांनी अवयवदानास संमती दिल्यानंतर त्यांच्या दोन्ही मूत्रपिंडांसह यकृत काढण्याची शस्त्रक्रिया (ऑर्गन रिट्रिव्हल) करण्यात आली . नोबल हॉस्पिटल्स अँड रिसर्च सेंटरचे समूह कार्यकारी अधिकारी डॉ. संजय पठारे यांनी सांगितले की, यकृताचे प्रत्यारोपण पुण्यातील ५५ वर्षीय पुरुष रुग्णावर करण्यात आले. ते यकृताच्या अंतिम टप्प्यातील आजाराने त्रस्त होते. एका मूत्रपिंडाचे प्रत्यारोपण बंगळुरू येथील ४९ वर्षीय दुकानदारावर करण्यात आले असून, ते दीर्घकालीन मूत्रपिंडाच्या आजाराने त्रस्त होते. नोबल हॉस्पिटलमध्ये दोन्ही प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रिया २२ ऑगस्ट रोजी यशस्वीरीत्या करण्यात आल्या, तर दुसरे मूत्रपिंड पुण्यातील अन्य एका रुग्णालयात प्रत्यारोपणासाठी पाठविण्यात आले. मूत्रपिंड प्रत्यारोपणाच्या टीम मध्ये मूत्रपिंड प्रत्यारोपण शल्यचिकित्सक डॉ. विक्रम सातव, डॉ. शशिकांत भनगे आणि भूलतज्ज्ञ डॉ. संगीता चंद्रशेखर यांचा समावेश होता. यकृत प्रत्यारोपण टीम मध्ये यकृत प्रत्यारोपण शल्यचिकित्सक डॉ. स्मिता पारख, डॉ. मनोज श्रीवास्तव आणि भूलतज्ज्ञ डॉ. श्रीकांत कोटे यांचा समावेश होता . तसेच प्रत्यारोपण समन्वयक महेश तुपे यांचा समावेश होता. नोबल हॉस्पिटल्स अँड रिसर्च सेंटरचे उपव्यवस्थापकीय संचालक डॉ. दिविज माने म्हणाले, "अवयवदान हे मानवतेचे अत्यंत उदात्त आणि प्रेरणादायी रूप आहे. एखाद्या कुटुंबाच्या दुःखाचे रूपांतर इतरांसाठी आशा आणि नवजीवनात करण्याचे सामर्थ्य अवयवदानात आहे.

# रक्षाबंधनानिमित्त 'रक्षा का धागा' जनजागृती मोहीम सुरू केली

पुणे : (स. गांवकरी)

रक्षाबंधन हा सण भाऊ-बहिणींमधील नाते, विश्वास आणि एकमेकांचे रक्षण करण्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. या भावनेला सामाजिक जागृतीशी जोडून, पीआर 24x7 ने 'रक्षा का धागा' नावाची एक विशेष जनजागृती मोहीम सुरू केली आहे. ही मोहीम तरुणांना अमली पदार्थ आणि वाईट संगतीपासून दूर राहण्याचे, तसेच आपली स्वप्ने आणि कुटुंबाच्या विश्वासाला प्राधान्य देण्याचे आवाहन करते. या मोहिमेअंतर्गत प्रसिद्ध करण्यात आलेल्या एका व्हिडिओ संदेशात एका तरुणाची व्यथा दर्शवली आहे, जो शिक्षणासाठी घरापासून दूर असताना वाईट संगत आणि अमली पदार्थांच्या आहारी जातो. जेव्हा त्याला पैशांची गरज भासते, तेव्हा तो आपल्या आईशी खोटे बोलून पैसे मागतो. त्याच वेळी, त्याला त्याच्या बहिणीच्या डॉक्टर बनण्याच्या यशाची बातमी मिळते. जेव्हा बहीण फोनवर स्वतःची डॉक्टर म्हणून ओळख करून देते आणि भावाला सांगते की तिला त्याचा अभिमान वाटायला हवा, तेव्हा त्याच्या हृदयाला खोलवर धक्का बसतो. आपल्या बहिणीची स्वप्ने आणि कुटुंबाचा विश्वास लक्षात आल्यावर, तो तरुण अमली पदार्थांपासून दूर राहण्याचा निर्णय घेतो. तो आपले अमली पदार्थ फेकून देतो, अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याचा निर्धार करतो आणि आपली वाईट संगत बदलण्याचाही निश्चय करतो. या मोहिमेची कथा त्याच्या आयुष्यातील सकारात्मक बदल अधिक स्पष्टपणे दर्शवते. या मोहिमेबद्दल बोलताना, पीआर 24x7 च्या सीईओ नेहा गौर म्हणाल्या, "रक्षाबंधन हा केवळ राखी बांधण्याचा आणि भेटवस्तू देण्याचा सण नाही. ही एकमेकांच्या आयुष्याला मार्गदर्शन करण्याची आणि एकजुटीने उभे राहण्याची एक संधी आहे. 'धागा ऑफ प्रोटेक्शन'च्या माध्यमातून, व्यसन आणि वाईट संगत त्यांच्या भविष्यावर आणि त्यांच्या कुटुंबाच्या स्वप्नांवर परिणाम करू शकते, हे तरुणांना सांगण्याचा आमचा उद्देश आहे.

# 'प्रोजेक्ट ओपन रिव्ह्यू २.०'द्वारे एआय प्लस स्मार्टफोनचा 'नोव्हा २ पॉवर' सादर

पुणे : (स. गांवकरी)




एआय प्लस स्मार्टफोनने आपल्या 'नोव्हा २' मालिकेतील नवीन 'नोव्हा २ पॉवर' हा स्मार्टफोन 'प्रोजेक्ट ओपन रिव्ह्यू २.०' या उपक्रमाद्वारे सादर केला आहे. ग्राहकांसाठी बाजारात उपलब्ध होण्यापूर्वीच या स्मार्टफोनची रचना, रंगसंगती आणि कार्यक्षमतेची माहिती जाहीर करण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत परीक्षक, आशय निर्माते, पत्रकार, तंत्रज्ञानप्रेमी तसेच संगणक सुरक्षा क्षेत्रातील नैतिक परीक्षकांना स्मार्टफोनची स्वतंत्रपणे चाचणी घेण्याची संधी मिळणार आहे. 'प्रोजेक्ट ओपन रिव्ह्यू'च्या पहिल्या पर्वाला ७०० हून अधिक नोंदणी मिळाल्यानंतर आता दुसऱ्या पर्वात नैतिक संगणक सुरक्षा परीक्षकांचाही प्रथमच समावेश करण्यात आला आहे. उत्पादन ग्राहकांपर्यंत पोहोचण्यापूर्वी त्याची स्वतंत्र चाचणी आणि पारदर्शक परीक्षण व्हावे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. प्रेरणादायी रचना आणि दीर्घकाळ टिकणारी कार्यक्षमता या संकल्पनेवर 'नोव्हा २ पॉवर'ची निर्मिती करण्यात आली आहे. हा स्मार्टफोन गोल्डन ब्लू फ्युजन आणि ब्लू फ्युजन या दोन आकर्षक रंगसंगतींमध्ये सादर करण्यात आला आहे. दोन्ही रंगांमध्ये परस्परविरोधी छटांचा प्रवाही संगम असून, स्मार्टफोनला वैशिष्ट्यपूर्ण आणि उठावदार ओळख देण्यात आली आहे.

कार्यक्षमतेच्या दृष्टीने 'नोव्हा २ पॉवर'मध्ये मीडियाटेक डायमेन्सिटी ७१०० हा ६ नॅनोमीटर तंत्रज्ञानावर आधारित प्रक्रियक देण्यात आला आहे. सातत्यपूर्ण कार्यक्षमता आणि ऊर्जेचा कार्यक्षम वापर यांचा समतोल साधण्याच्या उद्देशाने या प्रक्रियकाची रचना करण्यात आली आहे. या स्मार्टफोनमध्ये एआय प्लस स्मार्टफोनची निक्स्टक्वांटम ओएस ही कार्यप्रणाली देण्यात आली आहे.

एआय प्लस स्मार्टफोनचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि नेक्स्टक्वांटम शिफ्ट टेक्नॉलॉजीजचे संस्थापक माधव शेठ म्हणाले, "नोव्हा २ पॉवरच्या माध्यमातून नोव्हा मालिकेला कार्यक्षमता आणि वैशिष्ट्यपूर्ण रचनेची नवी दिशा देण्यात आली आहे. ग्राहकांचा विश्वास मिळवण्यापूर्वी उत्पादनाची स्वतंत्र चाचणी व्हावी, या उद्देशाने 'प्रोजेक्ट ओपन रिव्ह्यू २.०' अंतर्गत हा स्मार्टफोन परीक्षणासाठी खुला करण्यात आला आहे."

या उपक्रमांतर्गत सहभागी व्यक्तींना स्मार्टफोनची वैशिष्ट्ये, कार्यक्षमता आणि एकूण वापराचा अनुभव स्वतंत्रपणे तपासता येणार आहे. परीक्षणाची प्रक्रिया कोणत्याही पूर्वनिर्धारित निष्कर्षाशिवाय केली जाणार आहे. 'नोव्हा २ पॉवर'ची किंमत, बाजारातील उपलब्धता आणि इतर तांत्रिक वैशिष्ट्यांची सविस्तर माहिती स्मार्टफोन बाजारात दाखल होण्याच्या जवळ जाहीर करण्यात येणार आहे.

# आवडत्या पात्रातून संस्कारांची गोष्ट; पुण्यात बोनोबोनोचा अनोखा प्रयोग

पुणे : (स. गांवकरी)

डोरेमॉन, शिनचान, मोटू-पतलू यांसारखी कार्टून पात्रे मुलांच्या जगाचा अविभाज्य भाग झाली आहेत. आता जपानमधील 'बोनोबोनो' हे निरागस आणि आपुलकीचे पात्र भारतीय मुलांच्या भेटीला आले आहे. मात्र, त्याची ओळख केवळ मनोरंजनापुरती मर्यादित न ठेवता, स्वच्छता, संवेदनशीलता, मैत्री, शिस्त, इतरांचा विचार आणि सार्वजनिक जबाबदारी यांसारखी मूल्ये मुलांपर्यंत सहज पोहोचवण्याचा अनोखा प्रयोग पुण्यात करण्यात आला. शिवाजीनगर येथील भालेराव टॉवर येथे आयोजित विशेष कौटुंबिक कार्यक्रमाला १०० हून अधिक पालक, मुले तसेच भारत-जपान क्षेत्राशी जोडलेले नागरिक सहभागी झाले. विविध खेळ, संवादात्मक उपक्रम, जपानी संस्कृतीची ओळख आणि छायाचित्रण उपक्रमांमुळे कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एफटीबी कम्युनिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेडच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या



उपक्रमामागे जपानमधील उत्तम कथा, पात्रे आणि सकारात्मक सांस्कृतिक मूल्ये भारतीय मुलांपर्यंत त्यांच्या परिचित भाषेत पोहोचवण्याचा व्यापक विचार आहे. या कार्यक्रमाची संकल्पना आणि नियोजन शर्वरी शिराळकर यांनी केले. त्या म्हणाल्या, "मुलांना उपदेश करण्याऐवजी त्यांच्या आवडत्या पात्राच्या कृतीतून चांगल्या सवयी, संवेदनशीलता आणि जबाबदारी समजली, तर ती मूल्ये त्यांच्या मनात अधिक सहज रुजू शकतात. आज मुलांना आवडणारी पात्रे उद्या ते कसे नागरिक बनतील, यावर सकारात्मक प्रभाव टाकू शकतात का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे."

कार्यक्रमाला जपानी भाषेच्या शिक्षिका अंजनी पंचभाई, जपानी भाषा तज्ज्ञ विद्या आढाव आणि रूपाली काळे, तसेच अनेक वर्षांपासून जपानबरोबर काम करणारे वरिष्ठ व्यावसायिक रवी रासाळ आणि सैजश अशोकन यांची उपस्थिती लाभली. बोनोबोनो हे जपानी मांगा आणि ॲनिमेशनमधील लोकप्रिय समुद्री ऊद पात्र असून, त्याचा निरागसपणा, कुतूहल, मैत्री आणि संवेदनशीलता मुलांना सहज आपलासा वाटतो. जपानमध्ये मुलांसाठी अनेक दर्जेदार ॲनिमे, कथा आणि अर्थपूर्ण पात्रांची समृद्ध परंपरा आहे. मात्र, त्यातील मोजकीच पात्रे आजवर भारतीय मुलांपर्यंत पोहोचली आहेत. हीच दरी भरून काढण्याच्या उद्देशाने जपानमधील दर्जेदार ॲनिमे, दूरचित्रवाणी कार्यक्रम आणि दृक्-श्राव्य सामग्री भारतीय प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे. रिआन व्यासपीठ वेगवेगळ्या भाषेतील कथा भारतीय भाषांमध्ये उच्च दर्जाच्या आवाज रूपांतर आणि स्थानिकीकरणाच्या माध्यमातून मुलांपर्यंत पोहोचवण्यासाठी काम करत आहे. त्यामुळे मनोरंजनासोबत त्या कथांमधील सकारात्मक मूल्येही मुलांच्या परिचित भाषेत पोहोचू शकतील. केवळ भाषांतर न करता मूळ पात्रांचा स्वभाव, भावना, विनोद आणि सांस्कृतिक संदर्भ जपत भारतीय प्रेक्षकांसाठी नैसर्गिक अनुभव निर्माण करण्यावर भर दिला जात आहे. बोनोबोनो हा या प्रवासाचा पहिला टप्पा असून, भविष्यात आणखी दर्जेदार जपानी पात्रे आणि कथा भारतीय भाषांमध्ये मुलांपर्यंत पोहोचवणे, कौटुंबिक कार्यक्रम आयोजित करणे आणि शाळांशी संवाद साधणे, अशी व्यापक संकल्पना आहे.

# कॉम्प्युटर सायन्स आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्समध्ये ई-पदव्युत्तर पदविका सुरू

मुंबई : (स. गांवकरी)


आधुनिक कॉम्प्युटिंगमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्सची वाढती भूमिका आणि एआयचा प्रभावी वापर करण्यासाठी कॉम्प्युटर सायन्सच्या मजबूत पायाची गरज लक्षात घेऊन, आयआयटी मुंबई एज्युकेशनल आउटरीचने कॉम्प्युटर सायन्स आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्समध्ये ई-पदव्युत्तर पदविका सुरू केली आहे. या कार्यक्रमाच्या कॉम्प्युटर सायन्स पायावर आधारित असलेल्या विस्तारित अभ्यासक्रमात आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि मशीन लर्निंगवर लक्षणीयरीत्या अधिक भर देण्यात आला आहे. आयआयटी मुंबईच्या फॅकल्टीने रचना करून शिकवला जाणारा हा कार्यक्रम ग्रेट लर्निंग या एडटेक पार्टनरसह राबवला जात आहे आणि तो कॉम्प्युटर सायन्सचा भक्कम पाया आर्टिफिशियल इंटेलिजन्स व मशीन लर्निंगमधील समकालीन घडामोडींसोबत जोडतो. यामध्ये सिंक्रोनस आणि असिंक्रोनस ऑनलाइन लर्निंगसह आयआयटी मुंबई कॅम्पसमध्ये प्रत्यक्ष कॅम्पस इमर्शनचाही समावेश आहे. कॉम्प्युटिंग आणि एआयची संकल्पनात्मक समज अधिक खोलवर विकसित करू इच्छिणाऱ्या, प्रेरित आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम व्यक्तींसाठी हा ePG डिप्लोमा इन CS & AI तयार करण्यात आला आहे. अभ्यासक्रम कॉम्प्युटर सायन्स आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग अशा दोन बास्केटमध्ये विभागण्यात आला आहे. जनरेटिव्ह एआय, लार्ज लँग्वेज मॉडेल्स, एआय एजंट्स, RAG, MCP, रिइन्फोर्समेंट लर्निंग, कॉम्प्युटर व्हिजन, NLP आणि डीप लर्निंग हे एआय विषय असून, अल्गोरिदम्स अँड कॉम्प्लेक्सिटी, ब्लॉकचेन, वेब अँड सॉफ्टवेअर सिक्युरिटी, क्रिप्टोग्राफी अँड नेटवर्क सिक्युरिटी आणि बिग डेटा सिस्टम इंटर्नल्स हे कॉम्प्युटर सायन्स विषय आहेत.

# हार्वर्डमध्ये 'मानस गुरुप्रसाद' रामकथा; भक्ती, ज्ञान आणि साधेपणाचा संदेश

पुणे : (स. गांवकरी)

अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठाच्या सँडर्स थिएटर मेमोरियल हॉलमध्ये सुरू असलेल्या 'मानस गुरुप्रसाद' रामकथेच्या आठव्या दिवशी भक्ती, गुरु-परंपरा, ज्ञान आणि साधेपणाचा संदेश देण्यात आला. यावेळी यंदाचा तुळशी जन्मोत्सवही भक्तिभावाने साजरा करण्यात आला.

कथेच्या आठव्या दिवशी सकाळच्या सत्रातील अंतिम भाषणात महंत पूज्य राम हृदयदासजी महाराज यांनी बापूंच्या कार्याचे कौतुक केले. "बापूंसारखा पुत्र लाभल्याने भारतमातेला अभिमान वाटेल," असे गौरवोद्गार त्यांनी काढले. बापूंच्या दरबारातील प्रेम, माया आणि स्नेहाचा उल्लेख करताना त्यांच्या दरबाराचे दरवाजे प्रत्येकासाठी खुले असल्याचे त्यांनी सांगितले. चित्रकूट आणि बापूंच्या दरबारातील साम्य स्पष्ट करताना ते म्हणाले, "चित्रकूट हे असे ठिकाण आहे, जिथे चोहीकडे दरवाजे आहेत. बापूंच्या दरबारात कोणालाही प्रवेश मिळतो. बापू प्रेम, माया आणि स्नेह देतात." बापूंच्या उपस्थितीमुळे हार्वर्डमधील सभागृहही राजमहाल आणि रामाच्या निवासस्थानासारखे भासत असल्याची भावनाही त्यांनी व्यक्त केली.



रामकथेच्या प्रारंभी बापूंनी साकेतचे रहिवासी पंडित रामकिंकरजी महाराज यांच्या विचारांचा संदर्भ देत "गीतेत योग आहे, रामचरितमानसात साधना आहे आणि हार्वर्डमध्ये ज्ञानाची पूजा केली जाते," असे सांगितले. हार्वर्डमधील या रामकथेच्या निमित्ताने ज्ञान आणि मनाच्या विज्ञानाचा संवाद घडत असल्याचे स्पष्ट करताना त्यांनी "हार्वर्डचे ज्ञान मानसशास्त्राला भेटायला आले आहे," असे म्हटले. ज्ञान केवळ सिद्धांतापुरते मर्यादित न राहता त्याचा व्यवहाराशी संबंध असणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. एआयच्या वाढत्या प्रभावाचाही त्यांनी उल्लेख केला. तंत्रज्ञानामुळे मानवी हृदय आणि मनाला हानी होत नसेल, तर एआयचा स्वीकार करता येईल, असे त्यांनी नमूद केले. प्रत्येकाचे मनमोकळेपणाने ऐकले, तर प्रत्येक व्यक्तीकडून काहीतरी नवीन शिकता येते, असा संदेशही त्यांनी दिला.

रामकथा मांडताना ताजेपणा आणि साधेपणा महत्त्वाचा असल्याचे बापूंनी सांगितले. "तुम्ही ताजेपणा आणि साधेपणा आणल्यास, हनुमानजी परवानगी देतील," असे ते म्हणाले. कथेत अलंकाराला विरोध नसला तरी त्यामागील भाव आणि साधेपणा अधिक महत्त्वाचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

संतांच्या स्वभावाचे वर्णन करताना "साधूचे एक वैशिष्ट्य म्हणजे तो लाजाळू असतो," असे त्यांनी सांगितले. तसेच, "जय श्री राम ही एक आंदोलनात्मक हाक आहे, तर जय सियाराम ही आनंदाची हाक आहे," असे सांगत दोन्ही घोषणांमागील भावार्थही त्यांनी स्पष्ट केला. गुरु-परंपरेचे महत्त्व अधोरेखित करताना बापूंनी "माझे गुरु हेच माझे अर्पण," असे सांगितले. गुरु हा सर्वात मोठा प्रसाद असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### वेदांचे ज्ञान सर्वांपर्यंत पोहोचण्याची गरज

धर्मग्रंथ आणि ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्याचे महत्त्व अधोरेखित करताना वेदांचे ज्ञान अधिक व्यापक पद्धतीने समाजापर्यंत पोहोचण्याची गरज बापूंनी व्यक्त केली. वेदांची भाषा आणि त्यातील गुंतागुंत यामुळे ते प्रत्येक घरापर्यंत पोहोचू शकले नाहीत, तर इतर विचारधारांचे ग्रंथ तुलनेने अधिक सहजतेने लोकांपर्यंत पोहोचले, असे त्यांनी सांगितले. गुरु उपनिषदांचे ज्ञान प्रदान करतात आणि संत आपल्या शिष्याला जीवनातील गूढ सार समजावून सांगतात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २५२ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




मंगळवार दि. २५ ऑगस्ट २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ६,३६,०३६ पात्र शेतकऱ्यांना ₹५,०८६ कोटी वितरीत

- शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा दुसरा हप्ता जारी
- आतापर्यंत १२,५८,२४३ शेतकऱ्यांना ₹१०,११५ कोटींच्या कर्जमुक्तीचा लाभ



मुंबई (समर्थ गांवकरी)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील ६,३६,०३६ पात्र शेतकऱ्यांना ₹५,०८६ कोटींच्या कर्जमुक्तीचा लाभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते थेट ऑनलाइन पद्धतीने वितरित करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, या योजनेच्या अंमलबजावणीअंतर्गत आतापर्यंत १२,५८,२४३ शेतकऱ्यांना एकूण ₹१०,११५ कोटींच्या कर्जमुक्तीचा लाभ देण्यात आला आहे. पात्र शेतकऱ्यांना लाभ वितरणाची प्रक्रिया सुरू असून, लाभार्थींची संख्या सातत्याने अद्ययावत होत आहे.आतापर्यंत १३.७० लाख कर्जखात्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले आहे. सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील लाभ वितरण ऑनलाइन करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, मंत्रिमंडळातील सदस्य, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी आणि सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे उपस्थित होते.

दुसऱ्या टप्प्यात विभागनिहाय लाभ

अमरावती विभाग : १ लाख ४५ हजार ८०८ शेतकऱ्यांना ₹१,२०८ कोटींचा लाभ.

नाशिक विभाग : ८४ हजार ८१३ शेतकऱ्यांना ₹७५६ कोटींचा लाभ.

छत्रपती संभाजीनगर विभाग : ३ लाख २ हजार २७३ शेतकऱ्यांना ₹२,२८४ कोटींचा लाभ.

पुणे विभाग : ४९ हजार २२४ शेतकऱ्यांना ₹४१७ कोटींचा लाभ.

नागपूर विभाग : ४४ हजार ८६४ शेतकऱ्यांना ₹३६६ कोटींचा लाभ.

कोकण विभाग : ९ हजार ५४ शेतकऱ्यांना ₹५४ कोटींचा लाभ.

योजनेची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येत असून, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या नियंत्रणाखाली या प्रक्रियेचे व्यवस्थापन केले जात आहे.

## जिल्हा परिषद शाळांमधील मूलभूत सुविधांचा आढावा; कमतरता तातडीने दूर करण्याच्या सूचना

मुंबई (समर्थ गांवकरी)



राज्यातील जिल्हा परिषद, शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या शैक्षणिक व भौतिक सुविधांची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी आज मंत्रालयात ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे याच्या कार्यालयात त्याच्या व शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. या बैठकीत राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील शाळांच्या पायाभूत सुविधांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

सर्व जिल्ह्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून शाळांमधील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे, वीज, इमारत व वर्गखोल्यांची स्थिती, शाळेची स्वच्छता, देखभाल-दुरुस्ती तसेच विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेल्या इतर मूलभूत सुविधांची माहिती घेण्यात आली. ज्या शाळांमध्ये आवश्यक सुविधांची कमतरता असल्याचे निदर्शनास आले आहे, त्या बाबींची नोंद घेऊन त्या तातडीने दूर करण्याच्या दृष्टीने संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

शाळांच्या मूलभूत सुविधांमध्ये कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही

शाळा हा ग्रामपंचायतीपासून वेगळा घटक नसून गावाच्या विकासव्यवस्थेचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे शाळांमधील मूलभूत सुविधा, स्वच्छता, सुरक्षितता, देखभाल आणि आवश्यक कामांकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या हिताशी संबंधित सुविधांमध्ये कोणतीही कमतरता राहणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या.

शाळांमधील आवश्यक कामांकडे दुर्लक्ष अथवा हलगर्जीपणा आढळल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई करण्यात येईल, असेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

यावेळी प्रधान सचिव (शिक्षण विभाग), सचिव (ग्राम विकास विभाग) तसेच शिक्षण व ग्रामविकास विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्यातील सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठकीत सहभागी झाले.

## यशोधनच्या पाठपुराव्यामधून बांधकाम कामगारांच्या खात्यावर १० कोटी : इंद्रजीत भाऊ थोरात

### यशोधन जनसंपर्क कार्यालयातून असंघटित कामगारांच्या फॉर्मसह सर्व सुविधा दिल्याने नागरिकांना दिलासा

संगमनेर (समर्थ गांवकरी)

राज्याचे माजी महसूल व कृषिमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली यशोधन जनसंपर्क कार्यालयातून मागील सहा वर्षापासून तालुक्यातील असंघटित व घरेलू कामगार यांच्यासाठी शासकीय योजनांचा लाभ मिळावा याकरता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. या विभागामार्फत मागील वर्षात ८६०० कामगारांच्या खात्यावर विविध प्रस्तावांमधून १० कोटी १६ लाख रुपये निधी वर्ग झाले असल्याची माहिती इंद्रजीत भाऊ थोरात यांनी दिली आहे.याबाबत अधिक माहिती देताना इंद्रजीत भाऊ थोरात म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी तालुक्याच्या विकासाबरोबर गोरगरीब माणसांना शासकीय योजनांचा लाभ मिळावा याकरता सातत्याने काम केले आहे. वाडी वस्तीवरील वृद्ध नागरिक, निराधार, विधवा महिला यांच्याकरता शासन योजनांचा लाभ मिळवून दिला याचबरोबर तालुक्यामध्ये असलेल्या असंघटित व घरेलू कामगारांकरता शासकीय योजनांचा लाभ मिळावा याकरता स्वतंत्र विभाग कार्यान्वित केला.

या विभागामध्ये अद्यावत सुविधा असून चार कर्मचारी पूर्णवेळ काम करत आहे मागील सहा वर्षांमध्ये सुमारे १६ हजार ५२७ नागरिकांना या योजनेचा लाभ मिळवून देण्यात आला आहे.

मागील आर्थिक वर्षात ८६०० कामगारांचे विविध फॉर्म भरण्याबरोबर त्यांच्या मुलांना शिष्यवृत्ती काही मयत कामगारांचे विमा, अपघाती विमा, मुलींच्या लग्नाचा खर्च, दवाखाना खर्च अशा विविध प्रस्तावांमधून ८६०० कामगारांच्या खात्यावर सुमारे दहा कोटी १६ लाख रुपये वर्ग करण्यात आले आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी समाजातील उपेक्षित घटकाला न्याय देण्यासाठी ही योजना सर्वात प्रभावीपणे राबवली आहे किंबहुना राज्यांमध्ये सर्वाधिक या योजनेचा लाभ संगमनेर तालुक्यामध्ये मिळाला आहे. याचे सर्व श्रेय ही यशोधन कार्यालयाला आहे.

हे सर्वश्रुत आहे. आलेल्या प्रत्येक माणसाला विचारले तर तो सांगेल की आमचा फॉर्म भरणे कामी आणि मदत मिळून देणे कामी सर्व मदती यशोधन कार्यालयाने केली आहे.





### मंजूर झालेला निधी हा यशोधन कार्यालयात भरलेल्या फॉर्म मुळे : संजय कोल्हे

संगमनेर तालुक्यामधून असंघटित व घरेलू कामगारांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याकरता यशोधन कार्यालयाने सातत्याने काम केले आहे. ज्यांना मदत मिळाली शासकीय योजनांचा लाभ मिळाला तो प्रत्येक माणूस सांगेल की ही सर्व मदत ही यशोधन कार्यालयाने केली आहे. ज्यांनी मदत केली नाही ज्यांनी फॉर्म भरलेला आहे ती मंडळी श्रेय घेण्याचा प्रयत्न करत आहे. कामगारांना मिळणारी भांडी त्यांना मिळणाऱ्या सर्व सुविधा या यशोधन कार्यालयातून भरलेल्या फोर्मुळे फॉर्म मुळेच आहे किंबहुना आलेला निधी हा यशोधन मुळेच आला असून इतरांनी कोणीही श्रेय घेऊ नये असे आवाहन असंघटित

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर धनगरवाडी दिघी परिसर तात्पुरता रेड तसेच नो फ्लाय झोन म्हणून घोषित

### २५ ऑगस्ट रोजी सकाळी ५ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत नो फ्लाय झोन लागू

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मंगळवार, दि. २५ ऑगस्ट २०२६ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील धनगरवाडी दिघी, ता. राहाता येथे योगीराज सदगुरू श्री. गंगागिरी महाराज ७९ वा अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. मुख्यमंत्री तसेच संरक्षित व्यक्तींच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर सुरक्षिततेच्या दृष्टीने धनगरवाडी दिघी परिसरात तात्पुरता रेड झोन व नो फ्लाय झोन घोषित करण्यात आला आहे.

अपर जिल्हादंडाधिकारी अहिल्यानगर यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम १६३ अन्वये हा आदेश जारी केला आहे. हा आदेश २५ ऑगस्ट २०२६ रोजी पहाटे ५ वाजेपासून सायंकाळी ४ वाजेपर्यंत लागू राहणार आहे. संरक्षित व्यक्तींच्या दौऱ्यादरम्यान सुरक्षिततेला धोका निर्माण होऊन कोणत्याही अनुचित प्रकारामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी त्यांच्या दौरा कालावधीत नो फ्लाय झोन आदेश जारी करणे आवश्यक असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे धनगरवाडी दिघी, ता. राहाता, जि. अहिल्यानगर येथे २५ ऑगस्ट रोजी पहाटे ५ ते सायंकाळी ४ या कालावधीत परिसर तात्पुरता रेड झोन व नो फ्लाय झोन म्हणून घोषित करण्यात आला आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच इतर लागू कायद्यांनुसार कारवाई करण्यात येईल, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

## राज्य महोत्सवांतर्गत महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेचे आयोजन

ठाणे (समर्थ गांवकरी)

शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६' आयोजित करण्यात आली आहे. यावर्षी या स्पर्धेचा विस्तार राज्यस्तरासोबत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर करण्यात आलेला असून सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना विविध स्तरांवर पारितोषिके जिंकण्याची संधी उपलब्ध आहे. स्पर्धेचे अर्ज अकादमीच्या संकेतस्थळावर https://ganeshotsav.pldmka.co.in या ऑनलाईन पोर्टलद्वारे स्वीकारण्यात येणार असून अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख सोमवार, ७ सप्टेंबर २०२६ निश्चित करण्यात आली आहे. या स्पर्धेत जिल्ह्यातील अधिकाधिक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी यांनी केले आहे.

महोत्सवांतर्गत महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा राज्य, जिल्हा, तालुका या तीनही स्तरावर होणार आहे. या स्पर्धेचे अर्ज https://ganeshotsav.pldmka.co.in या पोर्टलद्वारे ऑनलाईन स्वरूपात स्वीकारले जाणार आहेत.

स्पर्धेचे अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख ७ सप्टेंबर २०२६ असून ही स्पर्धा विनामूल्य आहे. नोंदणीकृत व परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात.

## ब्राम्हणवाड्यात विविध मागण्यांसाठी रास्ता रोकोनंतर आमरण उपोषण सुरू!

### दारूबंदीची प्रभावी अंमलबजावणी, रस्त्यांची दुरुस्ती, जलजीवन मिशनच्या निकृष्ट कामांची चौकशी करण्याची मागणी!

ब्राम्हणवाडा (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा येथे अवैध दारू विक्रीला आळा घालावा, गावातील तसेच परिसरातील रस्त्यांची दुरुस्ती व नवीन कामे तातडीने करावीत, जलजीवन मिशनच्या कामांचा दर्जा सुधारावा आणि संबंधित दोषी ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, या विविध मागण्यांसाठी ग्रामस्थांनी सोमवारी रास्ता रोको आंदोलन केले. त्यानंतर ग्रामस्थांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. आंदोलनस्थळी पोलीस प्रशासन तसेच संबंधित विभागाचे अधिकारी दाखल झाले; मात्र मागण्यांबाबत समाधानकारक व ठोस लेखी आश्वासन न मिळाल्याने उपोषण सुरूच ठेवण्याचा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला.

उपसरपंच सुभाष गायकर यांनी सांगितले की, ब्राम्हणवाडा गावात दारूबंदी कायम असतानाही तिची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने अवैध दारू विक्री सुरू आहे. गावातील अपूर्ण रस्त्यांची कामे दोन-तीन वर्षांपासून रखडलेली आहेत. तसेच राज्य मार्ग क्रमांक २३ व ओतूर-ब्राम्हणवाडा मार्गाची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, अनेक वर्षांपासून या रस्त्यांची योग्य दुरुस्ती झालेली नाही. कळसूबाई, भंडारदरा यांसारख्या पर्यटनस्थळांकडे जाणारे हे महत्त्वाचे मार्ग असल्याने रस्त्यांची दुरवस्था पर्यटनावरही परिणाम करणारी आहे. यापूर्वी २०२४ मध्ये बोटा, बेलापूर, ब्राम्हणवाडा, कोतूळ परिसरातील ग्रामस्थांनी पायी आंदोलन करून तहसील कार्यालयापर्यंत मोर्चा काढला होता. त्यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आश्वासने देण्यात आली; मात्र अद्याप ठोस कार्यवाही झालेली नाही, असा आरोप त्यांनी केला.

जलजीवन मिशनअंतर्गत ब्राम्हणवाडा प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे सुरू असल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला. ग्रामपंचायतीने वेळोवेळी संबंधित विभागाकडे पाठपुरावा करूनही समस्या सोडविण्यात आलेली नसल्याचे उपसरपंच गायकर यांनी सांगितले. पाणीपुरवठा योजनेच्या समन्वय समितीच्या अध्यक्षांनाच संबंधित ठेकेदार भेटत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले. दोषी ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली.

शिवाजी आरोटे यांनी सांगितले की, ब्राम्हणवाडा गावात दारूबंदी असतानाही अवैध दारूविक्री सुरू असल्याने ग्रामस्थांच्या आंदोलनाला वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. दारूबंदीचा केवळ कागदोपत्री निर्णय न घेता त्याची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर वारंवार कारवाई करण्याऐवजी कायमस्वरूपी आळा घालण्यासाठी प्रशासनाने कठोर भूमिका घ्यावी. दारूमुळे अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होत असून तरुण पिढीही या व्यसनाच्या विळख्यात सापडत असल्याने हा केवळ कायदा-सुव्यवस्थेचा नव्हे तर सामाजिक आरोग्याचा प्रश्न आहे.

त्याचबरोबर जलजीवन मिशनअंतर्गत ब्राम्हणवाडा प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या कामाच्या दर्जाबाबतही ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे. योजनेचे काम निकृष्ट पद्धतीने सुरू असून ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी वारंवार संबंधित विभागाकडे तक्रारी करूनही ठोस कार्यवाही झालेली नाही. पाणीपुरवठा योजनेच्या समन्वय समितीच्या पदाधिकाऱ्यांनाही संबंधित ठेकेदार योग्य प्रतिसाद देत नसल्याचा आरोप आहे. त्यामुळे या संपूर्ण कामाची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत तातडीने चौकशी करून निकृष्ट कामे पुन्हा दर्जेदार पद्धतीने करून घ्यावीत आणि दोषी ठेकेदारासह संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. अवैध दारूविक्रीला कायमचा आळा आणि जनतेच्या पैशातून होणाऱ्या विकासकामांना दर्जा मिळेपर्यंत ग्रामस्थांचा लढा सुरूच राहील, अशी भूमिका शिवाजी आरोटे यांनी व्यक्त केली.




पत्रकार संजय गायकर यांनी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पत्रकारांना येणाऱ्या अडचणींचाही मुद्दा उपस्थित केला. अवैध दारूविक्रीविरोधात बातम्या प्रसिद्ध करत असताना दारू जप्त करण्यात आलेल्या ठिकाणी गेल्यानंतर संबंधित कुटुंबाकडून आपल्याला धमक्या देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. पत्रकार पैसे घेऊन बातम्या करतात, असे आरोप करून पत्रकारांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला. रस्ते, दारूबंदी तसेच जनतेच्या विविध प्रश्नांवरील आंदोलनांना पत्रकार सातत्याने प्रसिद्धी देत असून, पत्रकारांना धमकावण्याचे प्रकार गंभीर असल्याचे त्यांनी नमूद केले.

# गावापासून जिल्हा रुग्णालयापर्यंत 'मानकांनुसार आरोग्यसेवा'; रुग्णालयनिहाय सेवा निश्चित

## आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर : सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण निर्णय

**ठाणे (समर्थ गांवकरी)**

राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या रुग्णालयांमध्ये नागरिकांना त्यांच्या गरजेनुसार दर्जेदार, सुलभ आणि वेळेत आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, यासाठी शासनाने रुग्णालयनिहाय आरोग्यसेवांचे सर्वसमावेशक मानक निश्चित केले आहेत. ग्रामीण रुग्णालयापासून ३०, ५०, १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय, सामान्य रुग्णालय आणि जिल्हा रुग्णालयापर्यंत कोणत्या स्तरावर कोणते तज्ज्ञ डॉक्टर, सुश्रुषा सेवा, कुशल मनुष्यबळ, प्रयोगशाळा व रेडिओलॉजी सेवा, औषधे आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध असाव्यात, याची स्पष्टता शासन निर्णयातून करण्यात आली आहे.

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील सेवा अधिक सुसूत्र होण्याबरोबरच नागरिकांना कोणत्या रुग्णालयात कोणत्या सुविधा उपलब्ध आहेत, याची माहिती सहज मिळण्यास मदत होणार आहे. त्यामुळे शासकीय आरोग्यसेवेतील पारदर्शकता आणि नागरिकांचा विश्वास वाढण्यास हातभार लागणार आहे.

रुग्णालयाच्या क्षमतेनुसार सेवांचे स्पष्ट मानक

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध स्तरावरील रुग्णालयांमध्ये उपलब्ध असलेल्या आरोग्य सुविधांची विविध मानके एकत्रित करून रुग्णालयनिहाय सेवा निश्चित करण्यात आल्या आहेत. रुग्णालयाची खाट क्षमता आणि सेवा स्तर यानुसार तज्ज्ञ वैद्यकीय सेवा, नर्सिंग, अलाइड हेल्थ व पॅरामेडिकल मनुष्यबळ, प्रयोगशाळा सेवा तसेच इतर रुग्णसेवांचे निकष स्पष्ट करण्यात आले आहेत.

फिजिशियन, सर्जन, स्त्रीरोग व प्रसूती तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ, अस्थिव्यंग तज्ज्ञ, नेत्रशल्यचिकित्सक, भूलतज्ज्ञ, रेडिओलॉजिस्ट, दंतशल्यचिकित्सक आदी तज्ज्ञ डॉक्टरांची उपलब्धता रुग्णालयाच्या स्तरानुसार निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे शक्य तितक्या उपचारांसाठी रुग्णांना दूरच्या शहरांकडे जाण्याची गरज कमी होण्यास मदत होणार आहे.

३०८ प्रकारच्या निदानात्मक चाचण्यांची स्पष्टता

निदानात्मक सेवांबाबतही शासन निर्णयात स्पष्ट मानके निश्चित करण्यात आली आहेत. ग्रामीण रुग्णालयांमध्ये ७६, १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयांमध्ये ११० आणि जिल्हा रुग्णालयांमध्ये १२२ प्रकारच्या निदानात्मक चाचण्यांची उपलब्धता निश्चित करण्यात आली आहे. अशा प्रकारे या तीन स्तरांवर मिळून ३०८ प्रकारच्या निदानात्मक चाचण्यांबाबत स्पष्टता करण्यात आली आहे.

यामध्ये रक्तातील साखर, हिमोग्लोबिन, विविध रक्त तपासण्या, यकृत व मूत्रपिंड कार्याच्या तपासण्या, लिपिड प्रोफाइल, Hb1C, थायरॉईड, पॅप स्मिअर, काही कर्करोगविषयक तपासण्या तसेच विविध संसर्गजन्य आजारांच्या तपासण्यांचा समावेश आहे.

एक्स–रेपासून एमआरआयपर्यंत रेडिओलॉजी सेवा

रुग्णालयाच्या स्तरानुसार एक्स–रे आणि सोनोग्राफीसारख्या रेडिओलॉजी सुविधा उपलब्ध असणे अपेक्षित करण्यात आले आहे. १०० खाटांपेक्षा अधिक क्षमतेच्या रुग्णालयांमध्ये सीटी स्कॅनची सुविधा, तर जिल्हा रुग्णालय स्तरावर एमआरआय सुविधेचे निकष निश्चित करण्यात आले आहेत.

कुशल मनुष्यबळावर विशेष भर

आरोग्यसेवेची गुणवत्ता केवळ डॉक्टरांच्या उपलब्धतेवर अवलंबून नसून प्रशिक्षित नर्सिंग आणि पॅरामेडिकल मनुष्यबळही तितकेच महत्त्वाचे असल्याने त्यांचेही रुग्णालयनिहाय निकष निश्चित करण्यात आले आहेत.

प्रयोगशाळा तंत्रज्ञ, प्रयोगशाळा सहाय्यक, ईसीजी तंत्रज्ञ, क्ष–किरण तंत्रज्ञ, रक्तपेढीतील मनुष्यबळ, आहारतज्ज्ञ, भौतिकोपचार तज्ज्ञ, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते आणि मनोरुग्ण सामाजिक कार्यकर्ते अशा विविध अलाइड हेल्थ व पॅरामेडिकल मनुष्यबळाची उपलब्धता स्पष्ट करण्यात आली आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या माध्यमातूनही सार्वजनिक आरोग्य संस्थांसाठी अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. यामध्ये १११ सुपर स्पेशालिस्ट, १,५१९ स्पेशालिस्ट, २,९१९ वैद्यकीय अधिकारी, ३,००५ आयुष वैद्यकीय अधिकारी आणि ११,५७१ स्टाफ नर्स यांसह विविध संवर्गांचा समावेश आहे.

अत्यावश्यक औषधांची उपलब्धता निश्चित

रुग्णालयांमध्ये उपचारासाठी आवश्यक औषधे उपलब्ध राहावीत, यासाठी रुग्णालयाच्या स्तरानुसार अत्यावश्यक औषधांची यादी आणि आवश्यक औषधसाठ्याबाबतचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. त्यामुळे औषधांची उपलब्धता अधिक नियोजनबद्ध पद्धतीने सुनिश्चित करण्यास मदत होणार आहे.

रक्तपेढी, डायलिसिसपासून माता–बाल आरोग्य सेवांपर्यंत सुविधा

या मार्गदर्शक सूचनांमध्ये केवळ डॉक्टर, तपासण्या आणि औषधांपुरतेच मर्यादित न राहता विविध पूरक आरोग्यसेवांचाही समावेश करण्यात आला आहे. रक्तपेढी व रक्त संक्रमण केंद्र, आयुष सेवा, डायलिसिस सुविधा, लसीकरण कक्ष, माता–बाल आरोग्य सेवा, प्रसूती कक्ष आदी सुविधांबाबतही रुग्णालयाच्या स्तरानुसार स्पष्टता करण्यात आली आहे.

याशिवाय रुग्णवाहिका, दिव्यांग प्रमाणपत्र, वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र, डिस्चार्ज प्रमाणपत्र, जन्म–मृत्यू नोंदणी, जननी सुरक्षा योजनेचा लाभ, आहार सुविधा आणि तक्रार निवारण व्यवस्था यांसारख्या रुग्णाभिमुख सेवांनाही महत्त्व देण्यात आले आहे.

'मानकांनुसार आरोग्यसेवा' हा केंद्रबिंदू

गावातील ग्रामीण रुग्णालयापासून जिल्हा रुग्णालयापर्यंत उपलब्ध होणाऱ्या आरोग्यसेवांचे स्पष्ट मानक निश्चित झाल्यामुळे सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत अधिक सुसूत्रता आणि उत्तरदायित्व निर्माण होण्यास मदत होणार आहे. प्रत्येक रुग्णालयात उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाचा आणि पायाभूत सुविधांचा प्रभावी वापर करून नागरिकांना गुणवत्तापूर्ण सेवा देण्यावर भर देण्यात आला आहे.

नागरिकाला कोणत्या रुग्णालयात कोणती सेवा मिळणार, कोणते तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध असतील, कोणत्या तपासण्या होतील आणि कोणत्या सुविधा उपलब्ध असतील, याची स्पष्ट माहिती असणे आवश्यक आहे. या निर्णयामुळे सार्वजनिक आरोग्य सेवेत पारदर्शकता वाढून नागरिकांचा शासकीय आरोग्य व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होईल, असा विश्वास आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केला.

गावापासून जिल्हा रुग्णालयापर्यंत 'मानकांनुसार आरोग्यसेवा' उपलब्ध करून देण्याच्या दिशेने हा निर्णय महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार असून, सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, नागरिकाभिमुख, पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्यास त्याचा मोठा फायदा होणार आहे.

# आंबेगावात पत्रकाराला मारहाण; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल, जीवे मारण्याची धमकी

## आरोपींवर तातडीने कारवाई करण्याची राज्याचे मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

**आंबेगाव (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील नागापूर गावच्या हद्दीत अष्टविनायक रस्त्यालगत जमिनीच्या ताब्याचे व्हिडिओ चित्रीकरण आणि वार्तांकन करण्यासाठी गेलेल्या पत्रकाराला मारहाण, शिवीगाळ तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना १९ ऑगस्ट रोजी घडली. याप्रकरणी पारगाव पोलिस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी विश्वजित अनंथा गवारी (वय ३५, रा. मंचर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीनुसार दिपाली राजेंद्र बगाटे, मुकुंद सावळेराम पोहकर, शिवाजी किसन बगाटे आणि कुंडलिक मोतीराम बगाटे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी हे संपादक ज्ञानेश्वर सुरेश खिरड यांच्या सांगण्यावरून बाळू शिवहरी पोहकर यांच्या जमिनीच्या ताब्याचे व्हिडिओ चित्रीकरण करण्यासाठी नागापूर येथे गेले होते. त्यावेळी दिपाली बगाटे यांनी हाताने मारहाण केली, तर इतर तिघांनीही मारहाण करून शिवीगाळ केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

तसेच मोजणी आणि ताब्याच्या ठिकाणी व्हिडिओ चित्रीकरण किंवा वार्तांकन करू नये, यासाठी अडवणूक करण्यात आली. चित्रीकरण किंवा वार्तांकन केल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे. तरी तातडीने या आरोपींना अटक करून त्यांच्यावर पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमानी राज्य संघटक संजय भोकरे राज्य सरचिटणीस डॉक्टर विश्वास आरोटे इलेक्ट्रॉनिक मीडिया अध्यक्ष अतुल परदेशी डिजिटल मीडिया प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे.प्रदेश प्रसिद्धीप्रमुख नवनाथ जाधव प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे लक्ष्मण डोळस महेश पानसे किशोर राईसाकडा. शैलेश पालकर . विदर्भ प्रमुख नयन मोंढे.विभागीय अध्यक्ष राकेश खराडे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अनिल सावंत पश्चिम महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष राजेंद्र कोर्टे .यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे

या प्रकरणी पारगाव पोलिस ठाण्यात गु.र.नं. ८६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २० ऑगस्ट रोजी सायंकाळी ७.३६ वाजता स्टे.डा. नं. १२/२०२६ नुसार गुन्ह्याची नोंद करण्यात आली. प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलिस निरीक्षक सचिन कांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

# मोफत महाआरोग्य तपासणी व उपचार शिबिराचा ३५०रुग्णांनी लाभ

**अकोले (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुका मेडिकल असोसिएशन व डॉक्टर किरण लहामटे वैद्यकीय कक्ष तसेच राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम यांच्या संयुक्त विद्यमाने वसंत पुष्प हॉस्पिटल अकोले येथे भव्य शिबिराचे आयोजन करण्यात आले शिबीराचे उदघाटन अकोले विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय कार्यसम्राट आमदार डॉ किरण लहामटे यांनी केले तर प्रमुख पाहुणे अकोले शहराच्या नगराध्यक्ष सोनाली ताई नाईकवाडी,सचिन शेटे, दीपक पथवे, हरिभाऊ फापाळे हे उपस्थित होते ...... या शिबिरात जवळपास साडेतीनशे रुग्णांनी लाभ घेतला शिबिराचे वैशिष्ट्य रक्तातील साखर,रक्तदाब,ब्लड ऑक्सिजन तपासणी, ई सी जी यांची मोफत तपासणी करून रुग्णांना मोफत औषध उपचार करण्यात आला ० ते १६ वयोगटातील रुग्णांना एसएमबीटी हॉस्पिटल येथे सर्व तपासण्या व ऑपरेशन्स मोफत करण्यात येणार आहेत आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत रुग्णांसाठी मोफत उपचार व शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत या



शिबिरासाठी हृदयरोग तज्ज्ञ डॉ वैशाली इंगळे, सर्जन डॉ प्रशांत गायकवाड, नेत्ररोग तज्ञ डॉ वैष्णवी पराड, कान नाक घसा तज्ञ डॉक्टर अजिंक्य पिंगळे, अकोले तालुका मेडिकल अससोसिएशन चे अध्यक्ष डॉ संदीप कडलग सेक्रेटरी डॉ प्रतीक घोडके,डॉ नवले मधुकर,डॉ मोहसीन शेख, डॉ असिफ तांबोळी, डॉ नूतन कडलग, डॉ सागर कोल्हाल,डॉ अनुप्रिता शिंदे,,डॉ दशरथ धांडे, डॉ पूनम कोटकर, डॉ मंजुश्री रहाणे,, डॉ मंडलिक सुचित्रा ,डॉ शीतल खताळ, यांनी सेवा दिली , शिबिर यशस्वीतेसाठी सोनाली पापळ, कौस्तुभ पवार,पल्लवी गायकवाड, पूजा जेडगुले लक्ष्मीकांत वारुगशे, गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

# उपविभागीय अभियंता मधुकर बिन्नर यांचा सेवापूर्ती समारंभ ३१ ऑगस्टला!

**अकोले (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, अकोले कार्यालयात उपविभागीय अभियंता म्हणून कार्यरत असलेले मा. श्री. मधुकर पुंजाजी बिन्नर यांच्या सेवापूर्ती निमित्त सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता सेवापूर्ती समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम अकोले येथील बाजार समितीजवळ, देवठाण रोडवरील विठ्ठल लॉन्स व मंगल कार्यालयात होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नाशिकचे मुख्य अभियंता एस. एस. गव्हाणकर राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून अधीक्षक अभियंता सौ. सुनंदा बी. नरवडे उपस्थित राहणार आहेत. तसेच शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, नाशिक लोकसभा मतदारसंघाचे खासदार राजाभाऊ वाजे, अकोले विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. किरण लहामटे, माजी आमदार वैभवराव पिचड, अगस्ति साखर कारखान्याचे चेअरमन सिताराम पा. गायकर, विविध अधिकारी, पदाधिकारी, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.



मधुकर बिन्नर यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवेत विविध जबाबदाऱ्या सांभाळत केलेल्या कार्याबद्दल त्यांचा सेवापूर्ती समारंभात गौरव करण्यात येणार आहे. कार्यक्रमानंतर सायंकाळी ७.३० वाजल्यापासून स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, संगमनेर तसेच अकोले, संगमनेर व कोपरगाव उपविभागातील अधिकारी व कर्मचारी वर्गाने नागरिक, हितचिंतक व सहकाऱ्यांना सहकुटुंब उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते निझरनेश्वर व खांडेश्वर महादेवाची पूजा

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

- तालुक्यातील महादेव देवस्थान सर्व देवस्थानांना आदर्श बनवले
- राज्यात पावसाची ओढ निमाण झाल्याने शेतकरी चिंतेत
- सर्वत्र पाऊस होऊन नागरिक सुखी समाधानी होऊ दे – मा.मंत्री बाळासाहेब थोरात यांची प्रार्थना

यावर्षी सुरुवातीला चांगला पाऊस झाला मात्र अल निनोचा प्रभाव आता जाणवतो की काय अशी शंका निर्माण झाली असून अनेक ठिकाणी पावसाने ओढ दिली आहे. त्यामुळे राज्यभरातील नागरिक व शेतकरी चिंतेत असून यावर्षी सुद्धा सर्वत्र चांगला पाऊस होऊन राज्यातील नागरिक सुखी समाधानी व आनंदी होऊ दे अशी प्रार्थना महाराष्ट्राचे माजी कृषी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी खांडेश्वर व निझरनेश्वर चरणी केली असून तालुक्यातील सर्व देवस्थानांना सातत्याने निधी देऊन आदर्श बनवले असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले आहे.

दुसऱ्या श्रावणी सोमवार निमित्त कोकणगाव,निझरनेश्वर व खांडगाव येथे महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते माजी महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला. यावेळी समवेत खांडगाव येथे खांडेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष लहान भाऊ गुंजाळ, ड मधुकर गुंजाळ, दूध संघाचे संचालक रमेश गुंजाळ, सचिव अशोक गुंजाळ, सरपंच विकास गुंजाळ, चेअरमन संजय गुंजाळ, अर्चनाताई बालोडे, सौ.कमल अरगडे, कैलास गोसावी, भागवत अरगडे,शिवाजी वरपे, शुभम शिंदे, कपिल गुंजाळ,संदीप गुंजाळ, महेश गुंजाळ,दशरथ बालोडे,विठ्ठल गुंजाळ,रवी खरे,आप्पा गुंजाळ आदि उपस्थित होते तर निझरनेश्वर येथे मा.उपसभापती बाळासाहेब गायकवाड, देवस्थानचे अध्यक्ष बबन पवार, शिवाजी जोंधळे, सुखदेव जोंधळे, भाऊसाहेब जोंधळे, सरपंच आशाताई जोंधळे, हनुमंत जोंधळे, हौशीराम पारधी, सोमनाथ जोंधळे, भीमाशंकर जोंधळे,विलास जोंधळे,योगेश भोसले,दिलीप जोंधळे,गंगाधर वायकर,बाळासाहेब जोंधळे,दगडू जोंधळे,गोपीनाथ पानसरे,निलेश जोंधळे,सुनील गडगे,अनिल गायकवाड,रावसाहेब जम्बुकर आदींसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी खांडेश्वर देवस्थान ट्रस्ट व निझरनेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना लोकनेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, संगमनेर तालुका हा विस्ताराने मोठा आहे.तालुक्यामधील नागरिकांचे निझरनेश्वर, खांडेश्वर, रामेश्वर, बाळेश्वर, दुधेश्वर, अमृतेश्वर याचबरोबर गावागावांमधील शंकराची मंदिरेही मोठी देवस्थाने आहेत. श्रावण महिन्यामध्ये या सर्व ठिकाणी भाविकांची मोठी गर्दी असते. संगमनेर तालुक्यामधील प्रत्येक गावामध्ये आणि मोठ्या देवस्थानं करता आपण सातत्याने निधी दिला असून ही सर्व देवस्थाने चांगली बनवली आहेत. नागरिकांना व भाविकांना चांगल्या सुविधा मिळतील यासाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. त्यामुळे संगमनेर तालुक्यामध्ये धार्मिकतेचे आणि अध्यात्मिक असे वातावरण आहे. आपल्याला वारकरी संप्रदायाची परंपरा असून मानवतेचा धर्म पुढे नेताना सर्वांना समान संधी दिली आहे. तालुक्याचा विस्तार मोठा असून १७१ गावांमधून प्रत्येक गावांमध्ये विकास कामे राबवली आहेत. श्रावण महिना हा आनंदाचा महिना असतो. उपवास हा परमेश्वराच्या जवळ जाण्याचा मार्ग असून या पवित्र महिन्यामध्ये सर्व



बांधव भक्तिभावाने उपवास करतात याचबरोबर विविध महादेवांच्या देवस्थान असलेल्या ठिकाणी दर्शनासाठी येतात. संगमनेर तालुक्यात हे सर्व धार्मिक स्थळे या काळात गजबजलेली असतात येथील व्यवस्थापनाने ही अत्यंत चांगल्या पद्धतीने भाविकांची काळजी घेतली असल्याचे ते म्हणाले. याचबरोबर यावर्षी अल निनो चा धोका वर्तवला गेला होता.

# दिल्लीगेट पटांगण येथे 'खेळ पैठणीचा' कार्यक्रम रंगला

## अस्मिता टपळे, पूजा धोत्रे, श्रद्धा भंडारी पैठणीच्या मानकरी
## होम मिनिस्टर स्पर्धेच्या माध्यमातून महिलांना हक्काचे व्यासपीठ - शितलताई जगताप

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

भगवान श्री जिव्हेश्वर उत्सवानिमित्त महिलांसाठी 'होम मिनिस्टर – खेळ पैठणीचा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामुळे महिलांना त्यांचे कलागुण व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ निर्माण झाले आहे. तसेच महिलांना या कार्यक्रमातून विचार मांडण्याची संधी मिळत आहे. या कार्यक्रमातून महिलांना मोठ्या प्रमाणात पैठणीचे बक्षीस देऊन गौरविण्यात येते, ही कौतुकास्पद बाब आहे.

महिलांसाठी उत्कृष्ट कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे कौतुक होणे महत्त्वाचे वाटते. या कार्यक्रमात महिलांनी मोठ्या प्रमाणात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला आहे. 'होम मिनिस्टर – खेळ पैठणीचा' हा कार्यक्रम महिलांसाठी पर्वणीच आहे, असे प्रतिपादन माजी नगरसेविका शितलताई जगताप यांनी केले.

भगवान श्री जिव्हेश्वर मंदिर, दिल्लीगेट पटांगण, अहिल्यानगर आणि स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळ, बागडपट्टी यांच्या संयुक्त विद्यमाने होम मिनिस्टर खेळ पैठणीचा स्पर्धा संपन्न झाली. विजेत्या स्पर्धकांना

माजी नगरसेविका शितलताई जगताप यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

याप्रसंगी श्री विशाल गणपती देवस्थानचे विश्वस्त प्रा.माणिक विधाते,स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक,भगवान जिव्हेश्वर मंदिराचे संस्थापक अध्यक्ष संजय सांगावकर,खजिनदार गजेंद्र सोनवणे, सचिव विजय मानकर,उत्सव समितीचे प्रमुख नीरज चांगटे, सचिन मडके,योगेश भागवत, संजय दळवी,चंद्रकांत मानकर,महेश कांबळे, सोमनाथ खाडे,उमेश कोदे,योगेश पांढरपोटे,सचिन पावले,मुकुंद सावेकर,सागर सावेकर,नितीन पावले, सचिन क्षीरसागर,सागर सावेकर, रोहन सांगोळे,राम काळे,महेश सागावकर, ओंकार सावेकर, राजेंद्र गर्जे, सुशीलकुमार आंधळे,निरज सांगावकर, ओम सांगावकर, कैलास कुलकर्णी,रविंद्र बागडे,प्रदीप हावरे,वनिता मानकर,शितल सांगावकर, कल्याणी पावले, शैला मानकर,अनिता मानकर,लता सांगावकर, अनिता सवई, पूजा सवई, विशाखा मानकर,स्वकुळ साळी महिला मंचच्या अध्यक्षा छाया साळी,वनिता पाटेकर, सुरेखा शेकटकर,अनुराधा मिसाळ,श्रीमती मृणाल कनोरे,कल्पना भामरे,स्नेहल कौशल्ये,आदींसह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक म्हणाले, भगवान श्री जिव्हेश्वर उत्सवानिमित्त म




हिलांसाठी होम मिनिस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला महिलांनी मोठ्या प्रमाणात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. महिलांचे सक्षमीकरण व्हावे व महिलांना प्रोत्साहन मिळावे तसेच या धावपळीच्या जीवनात मनोरंजनाच्या कार्यक्रमातून आनंद मिळावा यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

विजेत्या पैठणीच्या मानकरी होम मिनिस्टर स्पर्धेतील पैठणीच्या मानकरी ठरल्या –प्रथम क्रमांक – अस्मिता टपळे –(रु. ५,००१/– ची पैठणी),द्वितीय क्रमांक –पूजा धोत्रे (रु. ३,००१/– ची पैठणी),तृतीय क्रमांक– श्रद्धा भंडारी (रु. २,००१/– ची पैठणी) मान्यवरांच्या हस्ते त्यांना बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चेतन गायकवाड यांनी केले तर आभार विक्रम पाठक यांनी मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे

### उत्तर पुणे जिल्हा संपर्क प्रमुख पदावर राजेश डोके यांची निवड



जुन्नर (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे संस्थापक,संघटक संजयजी भोकरे,प्रदेश अध्यक्ष निलेश सोमाणी यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रराज्य सरचिटणीस डॉ.विश्वासराव आरोटे यांच्या प्रमुखउपस्थिती त कार्यकारिणीची सभा संपन्न झाली.यामध्ये उत्तर पुणे जिल्हा संपर्क प्रमुख पदी राजेश डोके निवड बिनविरोध करण्यात आली असून संघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष रविंद्र भोर यांच्या शुभहस्ते अधिकृत पत्र राजेश डोके यांना प्रदान करण्यात आले.महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई या राज्यातील अग्र– गण्य पत्रकार संघटनेच्या पुणे उत्तर जिल्हा संपर्कप्रमुख या पदावर राजेश नागुजी डोके यांची निवड करण्यात आली आहे संघटनेच्या ध्येय धोरणा नुसार आपल्या कार्य क्षेत्रात संघटना मजबूत करा अशी माहिती राज्य सरचिटणीस विश्वास आरोटे यांनी पत्रका द्वारे सांगितली. संघटनेचे प्रदेशअध्यक्ष निलेश सोमाणी व राज्य संघटक संजय भोकरे यांच्या सूचने नुसार निवड करण्यातआलेली आहे.राजेश नागुजी डोके यांनी अधिकृत दैनिक विक्रेता,महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ सभासद,जुन्नर तालुका सचिव माजी तालुका अध्यक्ष या पदावर काम करताना रूग्णना फळ वाटप पत्रकार संघटनेतील सभासदांना हेल्मेट वाटप,वारकऱ्यांची सेवा,ऑनलाइन भाषण स्पर्धा संघटनेत बैठक व संघटनेतील सर्व सामाजिक व धार्मिक कार्यक्रम सहभाग घेतला.

प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की पत्रकार संघात काम करत असताना सर्वांनी आनंदात व खेळीमेळी च्या वातावरणात काम करणे अपेक्षित आहे.पत्रकाराच्या हिताचे निर्णय संघाकडून घेतले गेलेले आहेत यापुढेही घेतले जातील.एक चांगला पत्रकार म्हणून आपले व आपल्या संघाचे नाव उज्वल कसे होईल यासाठी सर्वांनी चांगले काम करण्याचा प्रयत्न करा असे आवाहन करून सर्वांना शुभेच्छा दिल्या.

### राजेंद्र बलदोटा यांना नेत्रगौरव पुरस्कार प्रदान




अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

साईसूर्य नेत्रसेवा यांच्यावतीने नेत्रदान चळवळीत उल्लेखनीय कार्य करणारे राजेंद्र बलदोटा यांना नेत्रदानसूचक म्हणून नेत्रगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

संजीवनी एजन्सीजचे संचालक असलेले राजेंद्र बलदोटा हे ऑल इंडिया जैन कॉन्फरन्सचे डायरेक्टर आहेत.मृत व्यक्तीच्या नातेवाईकांचे समुपदेशन करून त्यांना नेत्रदानासाठी तयार करणे.आणि नेत्रदान घडवून आणणे.नेत्रसेवेच्या कार्यात बलदोटा यांनी अनेक वर्षापासून योगदान दिले आहे.नेत्रदान चळवळीतील त्यांचे मोलाचे योगदानाबद्दल ची दखल घेऊन त्यांना नेत्रगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी डॉ.प्रकाश कांकरिया, सौ.डॉ.सुधा कांकरिया, ऑप्थॅल्मोलॉजी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. बोरुडे, डॉ.चिटगोपीकर,रोटरी क्लबचे शिरीष रायते, सामाजिक कार्यकर्ते जालिंदर बोरुडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी ज्या नातेवाईकांनी आपल्या आप्तांचे नेत्रदान केले,अशा नेत्रदात्यांच्या कुटुंबीयांचाही यावेळी सत्कार करून त्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

### अहिल्यानगर एमआयडीसीत बॉयलरचा स्फोट होऊन कामगाराचा मृत्यू

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

एमआयडीसी परिसरातील एका कंपनीत झालेल्या बॉयलर स्फोटात जखमी झालेल्या कामगाराचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. मोतीलाल दौलत वाघ (वय ६९, रा. चेतना कॉलनी, श्रीरंगनगर, नवनागापूर, अहिल्यानगर) असे मृत कामगाराचे नाव आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोतीलाल वाघ हे २० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.२१ वाजता एमआयडीसी परिसरातील एका कंपनीत काम करीत होते. त्यावेळी कंपनीतील बॉयलरचा अचानक स्फोट झाला. या स्फोटामुळे त्यांच्या शरीरावर जखमा झाल्या होत्या. त्यानंतर जखमांमध्ये संसर्ग झाल्याने त्यांची प्रकृती गंभीर झाली. नातेवाईकांनी त्यांना उपचारासाठी अहिल्यानगर येथील खासगी हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते. रूग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. मात्र, उपचारादरम्यान २२ ऑगस्ट रोजी पहाटे १.३७ वाजता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

# ‘हम हैं ना’ फाउंडेशन तर्फे ‘एक राखी सैनिकासाठी’ उपक्रम आणि ‘कृतज्ञता निधी प्रदान’ सोहळा संपन्न

जुन्नर (समर्थ गांवकरी)

देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या सीमेवरील सैनिकांची राष्ट्रनिष्ठा,व त्यांच्या कुटुंबाचा त्याग यांची जणीव ठेवत 'हम है ना' फाउंडेशनतर्फे 'आर्ट ऑफ लिविंग सेंटर,भोरवाडी' येथे रक्षाबंधन सणाचे औचित्य साधत 'एक राखी सैनिका साठी'व शहीद सैनिकाच्या वीर माता आणि वीर पत्नीस 'कृतज्ञता निधी प्रदान' सोहळा संपन्न झाला.सतरा मराठा लाईट इनफन्ट्री मध्ये सेवा देताना देशासाठी सर्वोच्च बलिदान दिलेले अहिल्या नगरचे सुपुत्र शहीद भाऊ साहेब मारुती तळेकर यांच्या वीरमाता श्रीमती सीताबाई मारुती तळेकर,वीरभगिनी मीनाताई आल्हाट आणि चोवीस मराठा लाईट इनफन्ट्री मध्ये सेवा देताना देशासाठी सर्वोच्च बलिदान देणारे अहिल्यानगरचे सुपुत्र शहीद सुनिल रावसाहेब वलटे यांच्या वीरपत्नी श्रीमती मंगला वलटे यांना रक्षाबंधन सणानिमित्त 'हम है ना' फाउंडेशनतर्फे प्रत्येकी ११,१११₹रुपयांचा कृतज्ञता निधी प्रदान करण्यात आला.

शहीद सैनिक आणि माजी सैनिक परिवारांसाठी विशेष कार्य करणाऱ्या 'रुईवापरिवार माजी सैनिक मेमोरेबल ट्रस्ट' चे अध्यक्ष माननीय विलास दगडे साहेब यांना फाउंडेशनचे उपाध्यक्ष डॉ. केशव देशमुख आणि सचिव अनिकेत डुकरे यांच्या हस्ते ५,५५५₹ रुपयांचा मदत निधी सुपूर्द केला.अनेक वर्षे मातृभूमीची सेवा करुन सेवानिवृत्त झालेल्या माजी सैनिकांना फाउंडेशनच्या कोअर कमिटी उपाध्यक्षा चेतना कड,सदस्या विद्या घोलप,दिपाली शिंदे,सुवर्णा घोलप,मंगल खत्री,दिपाली शेलार,नंदेश्वरी गव्हाणे, दिपाली सोलापुरे,शुभांगी शेटे या भगिनींनी राख्या बांधून औक्षण केले. फाउंडेशनतर्फे उपस्थित सर्व जवानांना स्नेहभेट देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमासाठी सभागृह आणि सर्व सैनिकांसाठी भोजन व्यवस्थेचे आयोजन करणाऱ्या 'आर्ट ऑफ लिविंग सेंटर, भोरवाडी'चे संचालक भरत भोर आणि सुरेखाताई भोर यांना फाउंडेशनच्या अध्यक्षा स्नेहल भोर,सदस्य सुभाष हांडे आणि राजेंद्र खत्री यांच्या हस्ते आजीव सभासदत्व आणि कृतज्ञता सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.'हम है ना' फाउंडेशनचे कार्य अवघ्या तरुणाईला दिशा देणारं व सैनिकांचे बलिदान आणि त्यांच्या कुटुंबियांचा त्याग याविषयी समाजात जाणीव जागृती करणारे आहे' असे गौरवोद्गार कार्यक्रमाचे अध्यक्ष निवृत्त सुभेदार मेजर जगन्नाथ खामकर यांनी काढले. कार्यक्रमासाठी रुईवा परिवार अहिल्यानगर,स्वराज्य सैनिक कल्याण संस्था संगमनेरचे संस्थापक सुभेदार भानुदास पोखकरकर आणि सर्व सदस्य,आर्ट ऑफ लिविंग सेंटर, भोरवाडीचे सदस्य यांची सन्माननीय उपस्थिती लाभली.हम है ना फाउंडेशनचे ज्येष्ठ मार्गदर्शक रि. कॅप्टन भिकाजी भागवत आणि कोअर कमिटी अध्यक्षा नेत्रा कुडचीमठ यांनी सर्वांचे स्वागत केले.पुणे जिल्हा समन्वयक गणेश दरवडे सर यांनी प्रास्ताविक केले. प्रसंगोचित रांगोळी रेखाटन पुजाताई काळे यांनी केले. देशभक्तीपर गीतगायन पुनम पानसरे यांनी केलं. बहारदार सूत्रसंचालन खजिनदार प्रोफेसर दीपिका जंगम यांनी केलं. फाउंडेशनचे संस्थापक कमांडो राम शिंदे सर आणि सहखजिनदार सत्यवान शिंदे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. 'हम है ना' फाउंडेशनचे पुणे जिल्हा संपर्क प्रमुख दत्तात्रय शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले.



# बीडीटी फाउंडेशनकडून २४८ विद्यार्थ्यांना ‘छत्रपती शिवाजी महाराज जीवन-चरित्र’ पुस्तकांचे वाटप

जुन्नर (समर्थ गांवकरी)

दि: २२ ऑगस्ट २०२६ पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अण्णासाहेब वाघेरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,ओतूर येथे बीडीटी फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थ्यां ना नरहर कुरुंदकर लिखित ‘छत्रपती शिवाजी महाराज जीवन–चरित्र’ या पुस्तकाचे वाटप करण्यात आले. या उपक्रम ंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेनेतील २४८ विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वितरण करण्यात आले.याबाबतची माहिती महाविद्यालयाचे ग्रंथपाल व राष्ट्रीय छात्र सेना प्रमुख लेफ्टनंट डॉ.निलेश हांडे यांनी दिली.



विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि आदर्श नव्या पिढीपर्यंत पोहोचावेत तसेच विद्यार्थ्यांना इतिहासाची प्रेरणा मिळावी, या उद्देशाने बीडीटी फाउंडेशन च्या वतीने हा विधायक उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकांचे वाचन न करता त्यामधून छत्रपती शिवाजीमहाराजांच्या व्यक्तिमत्वातील गुण आत्म सात करावेत,असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. यावेळी बीडीटी फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अक्षय तांबे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य,त्यांचे नेतृत्वगुण,दूरदृष्टी धाडस, स्वराज्यनिष्ठा आणि सर्वसमावेशक विचार हे आजच्या तरुण पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी आहेत. विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातून आदर्श घेऊन समाजासाठी विधायक कार्य करण्याची प्रेरणा मिळवावी,हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना राष्ट्रीय छात्र सेना प्रमुख लेफ्टनंट डॉ.निलेश हांडे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये वाचनाचे महत्त्व स्पष्ट केले.पुस्तके ही ज्ञानाची संपत्ती असून उत्तम साहित्य वाचनातून विद्यार्थ्यांच्या विचारांना योग्य दिशा मिळते, असे त्यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्याचा आदर्श विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात अंगीकार करावा,असे आवाहन त्यांनी केले.

# विद्यार्थ्यांनी आपले ध्येय व पालकांच्या अपेक्षा पूर्ण कराव्यात : डॉ.अनिल रहाणे

## इंजीनिअरिंग व नर्सिंग कॉलेज सुरू करण्याचे सूतोवाच



अकोले (समर्थ गांवकरी)

आपण जे ध्येय ठेवून कॉलेज ला प्रवेश घेतला ते ध्येय व पालकांनी ज्या अपेक्षेने तुम्हाला कॉलेजला पाठविले ते ध्येय व अपेक्षा पुर्ण कराव्यात असे प्रतिपादन आनंदगड शैक्षणिक संकुलाचे सचिव डॉ.अनिल रहाणे यांनी केले.

आंतरभारती रुरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट संचलित आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज च्या शैक्षणिक वर्ष २०२६–२७ नवीन प्रवेशित विद्यार्थी स्वागत समारंभात ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे होते.यावेळी व्यासपीठावर कॅम्पस डायरेक्टर शिवराज वाकचौरे, मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसी च्या प्राचार्या डॉ.पल्लवी फलके,धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश।मिडीयमचे प्राचार्य किरण चौधरी,कैम्पस डायरेक्टर संदीप थोरात,कार्यालय अधीक्षक सीमा दिघे,आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज चे को– ऑर्डीनेटर विद्याचंद्र सातपुते,प्राचार्य विनोद गिरी, कार्यक्रमाचे समन्वयक प्रा.प्रिया वाघ,प्रा.अजित येलमामे हे उपस्थित होते.

यावेळी डॉ.अनिल रहाणे पुढे म्हणाले की, पालकांनी संस्थेवर विश्वास ठेवून आपल्या पाल्याचा प्रवेश घेतला असून संस्था ही शिक्षणाच्या बाबतीत गुणवत्तेशी तडजोड करणार नाही,सर्व सुविधा उपलब्ध करून देणार आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणा व्यतिरिक्त त्यांच्यातील कलागुणांना वाव देण्यासाठी, त्यांच्यातील कल्पकतेला विकसित करण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविते.,मागील वर्षी अनेक कंपन्याशी करार केले आहे,विद्यार्थ्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी संस्थेने काम चालू केले असून विद्यार्थ्यांनी बदलत्या काळानुसार स्वतः मध्ये कौशल्य विकसित करावे.

विद्यार्थ्यांनी आपले शिक्षण चांगल्या रीतीने पूर्ण करून आपले ध्येय व पालकांची अपेक्षा पूर्ण कराव्यात असे मत व्यक्त केले.

लवकरच इंजिनीरिंग चे डिग्री कॉलेज सुरू करण्याचा मानस असून त्याच बरोबर नर्सिंग कॉलेज सुरु करणार असल्याचे सांगितले.

यावेळी प्राचार्या डॉ.पल्लवी फलके यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षण घेताना आपले ध्येय डोळ्यासमोर ठेवून पूर्ण करावे,मोबाईलचा वापर फक्त शैक्षणिक कामकाजासाठी करावा,प्राध्यापक आपल्या भल्यासाठी सूचना देत असतात, त्यांच्या सुचनेचे पालन करावे,प्रत्येकाने आपल्या जीवनाला एक शिस्त लावली पाहिजे असे सांगून नवीन कौशल्ये शिकावी असे मत व्यक्त केले.

प्रा.संदीप थोरात यांनी संस्थेच्या वाटचालीचा व प्रगतीचा आढावा घेत संस्थेत सुरू असलेल्या विविध महाविद्यालयांची ओळख करून देत आनंदगड शैक्षणिक संकुलाचे नाव राज्यात अग्रक्रमाने घेतले जाते असे मत व्यक्त केले.

# जय जिव्हेश्वर प्रतिष्ठानचा उपक्रम : दंतरोग तपासणी शिबिरात २७५ विद्यार्थ्यांची तपासणी

## शालेय जीवनापासूनच दातांची निगा राखणे आवश्यक : डॉ.अंजली गोरे

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

बालवयापासूनच विद्यार्थ्यांवर स्वच्छतेचे संस्कार होणे आवश्यक आहे.दररोज दोन वेळा दात स्वच्छ करणे आणि दातांची निगा राखणे महत्त्वाचे आहे.चॉकलेट,कॅडबरी व गोड पदार्थांसारख्या गोष्टींमुळे दात किडण्याची शक्यता असते. दंत हे मानवी शरीरातील अविभाज्य भाग असून ते निरोगी राखण्यासाठी सर्वांनी काळजी घेणे आवश्यक आहे.शालेय जीवनापासूनच दातांची निगा राखणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन दंतरोगतज्ज्ञ डॉ. अंजली गोरे यांनी केले.




भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त जय जिव्हेश्वर प्रतिष्ठान व गोरे डेंटल क्लिनिक,तोफखाना यांच्या संयुक्त विद्यमाने कल्याण रोड येथील संस्कृती श्रीनिवास कनोरे प्रशालेतील सर्व विद्यार्थ्यांसाठी दंत व मौखिक आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिराच्या प्रारंभी डॉ.अंजली गोरे यांनी सर्व विद्यार्थ्यांना दंत व मौखिक आरोग्याबाबत येणाऱ्या समस्यांविषयी सविस्तर माहिती दिली.

# आश्वासनानंतर पेडगाव ग्रामस्थांचे आमरण उपोषण स्थगित

## अवैध गावठी दारूविक्री बंद करण्यासह वीजपुरवठा व रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

पेडगाव गावातील विविध प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोमवार, दि. २४ ऑगस्ट रोजी श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर करण्यात येणारे आमरण उपोषण प्रशासनाकडून सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासन मिळाल्यानंतर स्थगित करण्यात आले. संबंधित प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे आश्वासन मिळाल्याने सरपंच इरफान पिरजादे यांच्यासह ग्रामस्थांनी आंदोलनाचा मार्ग तूर्तास स्थगित करण्याचा निर्णय घेतला.

पेडगाव परिसरात शाळेच्या ५० मीटर परिसरासह गावातील विविध भागांत अवैध गावठी दारूविक्री सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या अवैध व्यवसायामुळे गावातील सामाजिक वातावरण बिघडण्याबरोबरच विद्यार्थी, महिला व सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यामुळे शाळा परिसरासह गावातील अवैध दारूविक्री तातडीने बंद करून संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आली आहे. शाळेच्या परिसरात अवैध धंदे सुरू असल्यास त्याचा विद्यार्थ्यांवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहावे, अशी मागणी करण्यात आली. अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर नियमितपणे कारवाई करून हा व्यवसाय कायमस्वरूपी बंद करण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी भूमिका ग्रामस्थांनी मांडली.

वीजपुरवठ्याचा प्रश्न गंभीर

पेडगाव परिसरातील अनेक वाड्या–वस्त्यांमध्ये वीजपुरवठ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. नागोबा वस्ती, इदगाह वस्ती, अधुरेवाडी क्रमांक २, भवानी माता परिसर आणि शंकरनगर येथे सिंगल फेज वीजपुरवठा सुरू करण्याची मागणी महावितरणकडे करण्यात आली आहे. वीजपुरवठ्याअभावी नागरिकांना दैनंदिन जीवनात अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने संबंधित विभागाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

श्रीगोंदा–पेडगाव रस्त्याचे काम सुरू करण्याची मागणी

MDR-62 श्रीगोंदा–पेडगाव रस्त्याचे बंद असलेले काम तातडीने सुरू करून पूर्ण करावे, अशीही प्रमुख मागणी ग्रामस्थांनी केली आहे. या रस्त्याचा वापर पेडगावसह परिसरातील नागरिक, विद्यार्थी, शेतकरी आणि वाहनचालक मोठ्या प्रमाणावर करतात. रस्त्याचे काम रखडल्यामुळे वाहतुकीस अडथळे निर्माण होत असून नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचे ग्रामस्थांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले.

या विविध प्रश्नांबाबत ग्रामपंचायतीच्या वतीने प्रशासनाकडे वेळोवेळी मागण्या करण्यात आल्या होत्या. मात्र, प्रश्न प्रलंबित राहिल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी निर्माण झाली होती. अखेर प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेण्यात आला.

दरम्यान, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर संबंधित प्रशासनाकडून ग्रामस्थांच्या मागण्यांबाबत सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आले. या आश्वासनानंतर ग्रामस्थांनी आमरण उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला. मात्र, केवळ आश्वासन न देता त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे आवश्यक असून, संबंधित विभागांनी तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.



ग्रामस्थांच्या प्रमुख मागण्या

शाळेच्या ५० मीटर परिसरासह गावातील अवैध गावठी दारूविक्री कायमस्वरूपी बंद करून संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाई करावी.

अवैध दारूविक्रीच्या ठिकाणी तातडीने धाडी टाकून संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत.

नागोबा वस्ती, इदगाह वस्ती, अधुरेवाडी क्र. २, भवानी माता परिसर आणि शंकरनगर येथे सिंगल फेज वीजपुरवठा तातडीने सुरू करावा.

चऊठ–६२ श्रीगोंदा–पेडगाव रस्त्याचे बंद असलेले काम तातडीने सुरू करून पूर्ण करावे.

प्रलंबित प्रश्नांवर संबंधित विभागांनी वेळेत कार्यवाही करून ग्रामस्थांना दिलासा द्यावा.

यावेळी आमदार राहुल जगताप, घनश्याम शेलार, राजेंद्र मस्के, सरपंच इरफान पिरजादे, सरपंच शिवप्रसाद उबाळे, उपसरपंच विनोद मस्के, हरदास शिर्के, प्रशांत दरेकर, राजेंद्र जगताप, बापूराव नागवडे, सतीश बोरुडे, पांडुरंग पोटे, ग्रामपंचायत सदस्य तसेच पेडगाव येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## ओंकार शुगर ग्रुपला ‘उद्योग उत्कृष्टता पुरस्कार’



श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

साखर उद्योगाच्या विकासातील उल्लेखनीय योगदान, व्यावसायिक उत्कृष्टता, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि शाश्वत विकासासाठी केलेल्या कार्याची दखल घेत ओंकार शुगर ग्रुपला ‘उद्योग उत्कृष्टता पुरस्कार’ देऊन गौरविण्यात आले.

नवी दिल्ली येथील भारतीय साखर तंत्रज्ञ संघटनेच्या वतीने गोवा येथे १८ ते २० ऑगस्टदरम्यान आयोजित करण्यात आलेल्या ८४ व्या वार्षिक अधिवेशन व आंतरराष्ट्रीय साखर प्रदर्शनात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण झाले. ओंकार शुगर ग्रुपच्या वतीने संचालक ओमराजे बोत्रेपाटील यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

इथेनॉल निर्मिती, जैवऊर्जा, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शाश्वत विकास तसेच उद्योगविस्ताराला प्राधान्य देत ओंकार शुगर ग्रुपने साखर उद्योगात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या कार्याची राष्ट्रीय पातळीवर दखल घेत संस्थेला हा सन्मान मिळाला.

या पुरस्काराबद्दल ओंकार शुगर ग्रुपचे अध्यक्ष बाबुराव बोत्रेपाटील, अधिकारी, कर्मचारी, कामगार तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी संचालक ओमराजे बोत्रेपाटील यांचे अभिनंदन केले.

## सुनीता शिंदे यांची भाजप महिला आघाडीच्या अहिल्यानगर दक्षिण जिल्हा सरचिटणीसपदी निवड

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)



बबनराव पाचपुते व आमदार विक्रमदादा पाचपुते यांच्या नेतृत्वाखाली पक्षसंघटन अधिक मजबूत होणार; सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव

: श्रीगोंदा नगर परिषदेच्या माजी नगराध्यक्ष तथा भाजप महिला आघाडीच्या श्रीगोंदा तालुकाध्यक्ष सुनीता मच्छिंद्र शिंदे यांची भारतीय जनता पक्षाच्या महिला आघाडीच्या अहिल्यानगर दक्षिण जिल्हा सरचिटणीसपदी निवड झाली आहे. त्यांच्या निवडीमुळे श्रीगोंदा तालुक्यासह अहिल्यानगर दक्षिण जिल्ह्यातील महिला संघटनेला अधिक बळ मिळणार असून पक्षाचे संघटनात्मक काम तळागाळापर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे.

सुनीता शिंदे यांनी नगराध्यक्ष तसेच तालुकाध्यक्ष पदाची जबाबदारी सांभाळताना शहर व ग्रामीण भागातील विविध लोकहिताच्या प्रश्नांसाठी प्रभावीपणे पाठपुरावा केला आहे. तसेच महिला सक्षमीकरण, सामाजिक उपक्रम आणि पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी त्यांनी सातत्याने काम केले आहे. त्यांच्या दांडग्या जनसंपर्काची, संघटन कौशल्याची आणि पक्षनिष्ठेची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर जिल्हास्तरीय महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे.

पक्ष संघटना अधिक तळागाळापर्यंत नेणार : सुनीता शिंदे : निवडीनंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना सुनीता शिंदे म्हणाल्या, वरिष्ठ नेतृत्वाने माझ्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी प्रामाणिकपणे काम करणार आहे. महिला संघटना अधिक बळकट करण्यासोबतच केंद्र व राज्य सरकारच्या विविध जनकल्याणकारी योजना तळागाळातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

## ओंकार साखर कारखान्याच्या नवीन मुख्य कार्यालयाचे उद्घाटन



पुणे (समर्थ गांवकरी)

ओंकार साखर कारखाना प्रा. लि.च्या नवीन मुख्य कार्यालयाचा उद्घाटन सोहळा रविवारी (दि. २३) पुणे येथील ओंकार ग्रुपच्या कार्यालयात उत्साहात पार पडला. केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री तथा पुणे लोकसभा मतदारसंघाचे खासदार मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते नवीन कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन तथा माजी आमदार जयंतभाई पाटील, साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांची प्रमुख उपस्थिती होती. ओंकार ग्रुपचे संचालक प्रशांत बोत्रेपाटील, ओमराजे बोत्रेपाटील, रेखाताई बोत्रेपाटील व गौरीताई बोत्रेपाटील यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी ओंकार ग्रुपचे चेअरमन बाबुराव बोत्रेपाटील यांच्या कार्याचे कौतुक केले. शेतकरी कुटुंबातून आलेल्या बोत्रेपाटील यांनी अल्पावधीत साखर उद्योगासह औद्योगिक क्षेत्राचा विस्तार, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, शेतकरी हिताला प्राधान्य तसेच रोजगारनिर्मितीच्या माध्यमातून उल्लेखनीय योगदान दिल्याचे गौरवोद्गार मान्यवरांनी काढले.

# श्री व्यंकटेश वरला कल्याणम सोहळा थाटात; सव्वा रुपयात एक जोडप्याचा सामुदायिक विवाह

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

श्रमिकनगर येथील श्री श्रमिक बालाजी मंदिराच्या ३३व्या वार्षिक महोत्सवानिमित्त श्री व्यंकटेश वरला कल्याणम अर्थात बालाजी विवाह सोहळा मोठ्या भक्तिभावाने आणि थाटामाटात पार पडला. श्री श्रमिक बालाजी सामाजिक संस्थेच्या वतीने सव्वा रुपयात एक जोडप्याचा सामुदायिक विवाह संपन्न झाला. आतापर्यंत संस्थेच्या माध्यमातून २१० सामुदायिक विवाह लावण्यात आले आहेत. या सोहळ्यास शहरातील प्रतिष्ठित नागरिकांसह जिल्ह्यातील तसेच राज्याबाहेरील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पहाटे पद्मशाली पुरोहित संघमच्या वतीने सुप्रभातम व जलघटाभिषेक करण्यात आला. त्यानंतर सत्यनारायण महापूजा, होमहवन व पूर्णाहुती विधी पार पडले.

विवाह सोहळ्यापूर्वी श्रमिकनगर परिसरातून भगवान बालाजींची पालखी अर्थात वरात वाद्यांच्या गजरात काढण्यात आली. महिला भजनी मंडळी टाळांच्या निनादात सहभागी झाल्या होत्या. ठिकठिकाणी पालखीचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

श्री व्यंकटेश वरला कल्याणम सोहळ्यात बालाजी कल्याणम चेतन सिरसुल, पद्मावती कल्याणम संजय रच्चा आणि लक्ष्मी कल्याणम व्यंकटेश अरकल यांनी सपत्नीक विधिवत पूजा करून बालाजी विवाहाचे धार्मिक विधी पार पाडले. यावेळी संपूर्ण मंदिर परिसर ‘श्रीमन व्यंकटरमणा गोविंदा... गोविंदा!’ या जयघोषाने दुमदुमून गेला. विवाह सोहळ्यासाठी जिल्ह्यासह राज्याबाहेरील भाविकही मोठ्या संख्येने उपस्थित होते. बालाजी मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. यावेळी आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योती गाडे,उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक मनोज दुल्लम, करन कराळे, आसाराम कावरे, पेशवाई किएशनचे अमोल येमूल, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रात संघचालक नानासाहेब जाधव , संभाजी कदम, विक्रम राठोड,नगरसेवक योगीराज गाडे,रविंद्र कटारीया,सतीश मुथ्था, क्लासिक व्हिलचे कुशल मुनोत, आदीसह सर्व बालाजी भक्तगण उपस्थित होते. विवाह सोहळ्यानंतर महाआरती करण्यात आली. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आणि भक्तिमय



वातावरणात वार्षिक महोत्सवाची सांगता झाली.

महोत्सव यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष विनोद म्याना, उपाध्यक्ष अशोक इप्पलपेल्ली, सचिव राजू येमूल, सहसचिव ज्ञानेश्वर सुंकी, दत्तात्रय कुंटला, राजू गड्डम, कैलास लक्कम, शंकर येमुल, संजय पेगड्याल, नारायण यन्नम, शाम बोगा, शंकर बत्तीन, लक्ष्मीकांत नल्ला, कांतीलाल पतिपाका, अशोक बिटला, कुमार कोलपेक, बळीराम कोलपेक, दत्तात्रय इराबत्तिन तसेच सामुदायिक विवाह समितीचे किसनराव बोमादंडी, गणेश येमूल,नाना मादास आदींसह श्री श्रमिक बालाजी सामाजिक संस्थेच्या सर्व विश्वस्तांनी परिश्रम घेतले.

# ग्रामीण भागातील पोस्टमास्तर ऋषिकेश फड यांचा उल्लेखनीय कामगिरीबद्दल पिंपळगाव रोठा ग्रामस्थांकडून विशेष सन्मान

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

पारनेर तालुक्यातील पिंपळगाव रोठा येथील शाखा डाक कार्यालयाचे पोस्टमास्तर श्री ऋषिकेश फड यांनी सन २०२३ ला भारतीय डाक विभागात पिंपळगाव रोठा येथे सेवेला रुजू होऊन प्रथमच सेवा प्रारंभ केला होता.ग्रामीण भागातील या शाखा डाक कार्यालयाचा कारभार पिंपळगाव रोठा,कारेगाव व अक्कलवाडी या गावांच्या करिता आहे.

सेवा आरंभ झाल्यापासून तीन वर्षाच्या कार्यकाळात पोस्टमास्तर श्री ऋषिकेश सोपान फड यांनी सदर तीन गावांचा जनतेसी सतत संपर्क साधून पोस्ट विभागातर्फे असलेल्या शासनाच्या योजनांची, सवलतींची, आर्थिक सुरक्षिततेची माहिती शेतकरी,शेतमजूर,ग्रामस्थांना समजावून जनतेमध्ये त्या योजना बद्दल गाव पातळीवर जागृती निर्माण केली.पोस्टाद्वारे आर्थिक व्यवहार व गुंतवणूक करावयाचे फायदे आणि सुरक्षिततेची खात्री देत ग्रामीण जनतेचा विश्वास संपादन करीत अखंड कर्तव्य करीत राहिले.

पहिल्यांदाच पोस्टाच्या सेवेत रुजू झालेले असताना देखील श्री फड साहेब यांनी कर्तव्याला प्रयत्नांची जोड देऊन पहिल्या दोन वर्षातच ७०० खाते दारांची बचत खाते आणि ४०० ऑनलाइन खाते पिंपळगाव रोठा पोस्टात सुरू केली.आज रोजीला या ग्रामीण भागातील पोस्ट कार्यालयात पासबुक धारक खातेदारांची संख्या दीड हजाराच्या पुढे असून एक नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे.श्री ऋषिकेश फड



या पोस्ट कार्यालयात येण्याअगोदर पोस्टल इन्शुरन्स बाबत ग्रामस्थांना फारशी माहिती नव्हती परंतु पोस्टमास्तर म्हणून पहिल्यांदाच नोकरीत आलेले आणि पिंपळगाव रोठा येथील पहिल्याच पोस्ट ऑफिसमध्ये नोकरीला सुरुवात करून कर्तवनिष्ठा, मेहनत, प्रामाणिकपणा,जिद्द, चिकाटी समाजसेवा, सांप्रदायिक भक्ती भाव, वारकरी विचारांचे संस्कार इत्यादी सर्व गुणांची सेवा कार्य करीत ग्रामीण भागातील जनतेला प्रोत्साहित करून तब्बल २ कोटी २२ लाखांचा लाइफ इन्शुरन्स पॉलिसी वितरित केले आहेत.

# ‘गोविंदा... गोविंदा’च्या जयघोषात बालाजी-पद्मावती-लक्ष्मी यांना सामुदायिक हळद

**सावेडीतील श्री श्रमिक बालाजी भगवंताचा ३३ वा वार्षिक ब्रह्मोत्सव भक्तिमय वातावरणात; आज श्री व्यंकटेश वरला कल्याणम सोहळा**

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

व्यंकटरमणा गोविंदा... गोविंदा...च्या गजराने सावेडी परिसर दुमदुमून गेला. भक्तिरसात न्हाऊन निघालेल्या वातावरणात श्री श्रमिक बालाजी भगवंताच्या ३३ व्या वार्षिक ब्रह्मोत्सवाला मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला आहे. श्री व्यंकटेश वरला कल्याणम अर्थात बालाजी लग्न सोहळ्यानिमित्त भगवान श्री बालाजी, पद्मावती व लक्ष्मी यांना सामुदायिक हळद लावण्याचा मंगलमय सोहळा मोठ्या भक्तिभावाने पार पडला.

हळदीच्या मंगल सोहळ्याने मंदिर परिसरात जणू विवाहाची लगबगच अनुभवास आली. महिला भक्तांच्या उपस्थितीने वातावरणात उत्साह, भक्ती आणि मांगल्याची त्रिवेणी निर्माण झाली होती. यावेळी महापौर ज्योती गाडे, माजी महापौर शिलाताई शिंदे, नगरसेविका आशा डागवाले , सुनिता कुलकर्णी,

रेखा दुलम, रेणुका शेराल, रत्ना बल्लाळ, सुरेखा विदये, जयश्री म्याना यांच्यासह श्री श्रमिक बालाजी महिला मंडळाच्या सदस्य व बालाजी महिला भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

ब्रह्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात विविध धार्मिक विधींची रेलचेल सुरू आहे. पहाटे सुप्रभातम व



मंगलासम, रुद्राभिषेकम, त्यानंतर वास्तुमंडलम पूजन, चतुष्टी योगिनी पूजन, षोडश मातृका पूजन, होमहवन, हरिपाठ व संध्यारती असे धार्मिक कार्यक्रम पार पडले. रात्री ह.भ.प. जनार्दन माळवदे महाराज यांच्या कीर्तनाने भक्तिमय वातावरण अधिकच रंगले. गुरुदत्त भजनी मंडळाचे भजन कार्यक्रमानेही भाविकांची मने जिंकली.

त्यावेळी दुपारी ११ वाजता भगवान श्री बालाजींची भव्य पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. होम हवनाच्या पूर्णाहुतीनंतर दुपारी १ वाजून १८ मिनिटांनी शुभमुहूर्तावर श्री व्यंकटेश वरला कल्याणम (बालाजी लग्न) सोहळा संपन्न होणार आहे. त्यानंतर सामुदायिक सव्वा रुपयात विवाह सोहळे पार पडणार असून महाप्रसादाने या भक्तिमय ब्रह्मोत्सवाची सांगता होईल.

# आई-वडील हेच जगातील अनमोल व्यक्तिमत्त्वे : ह.भ.प. कैलास महाराज केंदळे

**लिंपणगाव येथे अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात; भाविकांची मोठी उपस्थिती**

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

जगाच्या पाठीवर दोनच व्यक्ती अनमोल आणि सज्जन आहेत, त्या म्हणजे आई-वडील. जन्म देऊन सांभाळ करणाऱ्या आई-वडिलांची सेवा न करणाऱ्या व्यक्तीच्या जीवनाला खरा अर्थ नाही, असे भावनिक गौरवोद्गार ज्येष्ठ कीर्तनकार ह.भ.प. कैलास महाराज केंदळे यांनी काढले.

लिंपणगाव (ता. श्रीगोंदा) येथील ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराज मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त ह.भ.प. कैलास महाराज केंदळे यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ कीर्तनकार ह.भ.प. संजय महाराज गिरमकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या अखंड हरिनाम सप्ताहाचे हे ३२ वे वर्ष आहे. सप्ताहातील सहावे पुष्प गुंफताना केंदळे महाराज बोलत होते.

ते म्हणाले, आई-वडिलांचे नाते अत्यंत पवित्र आहे. मात्र, आजच्या तरुण पिढीला त्याचे महत्त्व विसरत चालले आहे. अनेक तरुण व्यसनाच्या आहारी जाऊन आपले आयुष्य उद्ध्वस्त करीत आहेत, ही दुर्दैवाची बाब आहे. जगात पैसा, संपत्ती आणि इतर अनेक गोष्टी मिळू शकतात; मात्र संतांची भेट आणि आई-वडिलांचे प्रेम पुन्हा मिळणे शक्य नाही. त्यामुळे प्रत्येकाने आई-वडिलांचे महत्त्व जाणून त्यांची सेवा करावी.

नीतीने वागा, सत्याने जगा, असा संदेश देताना



केंदळे महाराज यांनी धर्माचे आचरण, हरिनामस्मरण आणि सद्वर्तनाचे महत्त्व विशद केले. केवळ कोणाचे नाव घेतल्याने पुण्य मिळत नाही, तर मुखातून हरिनामाचा जप आणि आचरणातून धर्म जगणे आवश्यक आहे. संत हे देवाच्या अवतारांचे स्वरूप आहेत, त्यांचे विचार आत्मसात करण्याची गरज आहे, असेही त्यांनी सांगितले.

सत्याने वागणाऱ्या व्यक्तीला अनेकदा शत्रू अधिक असतात, तर अनीतीने वागणाऱ्यांना मित्र अधिक मिळतात, हीच कलियुगाची किमया असल्याचे सांगत केंदळे महाराज यांनी कीर्तनातून विविध दाखले व उदाहरणे दिली. त्यांच्या ओघवत्या वाणीतून उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले.

# अगस्ति महाविद्यालयात ’पारंपरिक पाककृती स्पर्धा’ उत्साहात; स्थानिक खाद्यसंस्कृती व भरडधान्यांचे महत्त्व अधोरेखित

अकोले (समर्थ गांवकरी)

स्थानिक जैवविविधतेचे संवर्धन आणि पारंपरिक पौष्टिक आहाराचा प्रचार करण्याच्या उद्देशाने, नौरोजी गोदरेज सेंटर फॉर प्लांट रिसर्च व अगस्ति महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ’पारंपरिक पाककृती स्पर्धा’ महाविद्यालयाच्या प्रांगणात अत्यंत उत्साहात व चुरशीच्या वातावरणात संपन्न झाली. या उपक्रमातून नव्या पिढीला समृद्ध पारंपरिक खाद्यसंस्कृतीची ओळख करून देण्यात आली.

स्पर्धेत अगस्ति महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसह अकोले तालुक्यातील विविध शाळांतील विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. यात प्रामुख्याने कन्या विद्या मंदिर, मॉडर्न हायस्कूल, अगस्ति




विद्यालय, अभिनव पब्लिक स्कूल, अंबिका विद्यालय, अंबड, श्री स्वामी समर्थ विद्यालय (राजूर) आदी शाळांचा समावेश होता. विद्यार्थिनींनी रानभाज्या, स्थानिक भरडधान्ये (ज्वारी, बाजरी, नाचणी, वरई), पारंपरिक कडधान्ये आणि नैसर्गिक घटकांचा वापर करून विविध चवदार व पौष्टिक पदार्थ सादर केले.

नौरोजी गोदरेज रिसर्च सेंटरच्या वरिष्ठ वैज्ञानिक क्रांती यार्डी, वरिष्ठ मार्गदर्शक डॉ. इरेच भारूचा, अर्चना कल्याणी आणि रेवती गिंडी यांनी परीक्षकाची जबाबदारी सांभाळली. त्यांनी प्रत्येक पदार्थाचे पौष्टिक मूल्य, घटक आणि सादरीकरणाची बारकाईने पाहणी करत विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

याप्रसंगी शिक्षण संस्थेचे विश्वस्त गिरजाजी जाधव, अध्यक्ष सुनील दातीर, मानद सचिव सुधाकर देशमुख आणि प्राचार्य डॉ. शिवाजी खेमनर, पर्यवेक्षक विवेककुमार वाकचौरे, दीपक जाधव यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करत त्यांना शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही प्रदर्शनाला भेट देऊन खाद्यसंस्कृतीचा आनंद घेतला.

# ओतूरच्या श्री कपर्दिकेश्वर मंदिरात दुसरा श्रावणी सोमवार भक्तिमय वातावरणात साजरा

ओतूर (समर्थ गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील ओतूर येथे मांडवी नदीच्या तीरावर असलेल्या पुरातन व ऐतिहासिक श्री कपर्दिकेश्वर मंदिरात सोमवार, दि. २४ ऑगस्ट रोजी दुसरा श्रावणी सोमवार मोठ्या भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. पहाटेपासूनच शिवभक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. ‘हर हर महादेव’च्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला.

दुसऱ्या श्रावणी सोमवारनिमित्त सकाळी सहा वाजता श्री. व सौ. स्वप्निल नलावडे, श्री. व सौ. संजय शेठ अनंता बुगडे, श्री. व सौ. गौरव नरेंद्र पाटील डुंबरे आणि श्री. व सौ. शंकरराव शेरकर यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी श्री कपर्दिकेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अनिलशेठ तांबे, सचिव महेंद्र (गांधी) पानसरे यांच्यासह देवस्थानचे पदाधिकारी व भाविक उपस्थित होते. महाआरतीनंतर मंदिर भाविकांसाठी दर्शनास खुले करण्यात आले.

यावेळी पुजारी गोविंदराव डुंबरे, अक्षय तांबे, सागर दाते, सचिन तांबे, यतीन शेटे, रघुनाथ अण्णा तांबे, राजेंद्र डुंबरे, जितेंद्र डुंबरे, अमोल काका डुंबरे, विश्वास पाटील डुंबरे, श्रेयस डुंबरे, प्रसाद डुंबरे, योगेश डुंबरे, तन्मय इस्कांडे, अक्षय ढमाले, तात्या ताजणे, नितीन तांबे आदी उपस्थित होते.

दुसऱ्या श्रावण सोमवारच्या यात्रेनिमित्त मंदिर परिसर विविध दुकानांनी सजला होता. हार, बेल, फुले, प्रसाद, पेढे, खाद्यपदार्थ, खेळणी, गृहपयोगी वस्तू तसेच मनोरंजनाची साधने व पाळणे यामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

भाविकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिसांचे नियोजन –

भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन ओतूर पोलिस यंत्रणेच्या वतीने सुरक्षिततेसाठी विशेष नियोजन करण्यात आले होते. मंदिर परिसर, दर्शन रांग, प्रमुख मार्ग तसेच यात्रा परिसरात पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. वाहतूक सुरळीत राहावी, गर्दीच्या ठिकाणी चेंगराचेंगरी होऊ नये तसेच भाविकांना सुरक्षितपणे दर्शन घेता यावे यासाठी पोलिसांकडून आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या. पोलिस कर्मचारी व स्वयंसेवकांच्या माध्यमातून गर्दीवर नियंत्रण ठेवण्यात येत असल्याचे ओतूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी सांगितले.

भजन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद –

दुसऱ्या श्रावणी सोमवारनिमित्त सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत पांढरी मारुतीच्या खुल्या व्यासपीठावर भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेतील प्रथम क्रमांकासाठी १६ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी १३ हजार रुपये, तृतीय क्रमांकासाठी ११ हजार रुपये तर उत्तेजनार्थ ७ हजार ७०० रुपये अशी बक्षिसे ठेवण्यात आली होती.

भजन स्पर्धेसाठी मंगेश कोंडार व संतोष झावरे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. यावेळी जी. आर. डुंबरे, रघुनाथ तांबे, रोहीहास घुले, अनिलशेठ तांबे, अनिल डुंबरे, शांताराम पानसरे, पांडुरंग ढोबळे, उत्तम गाढवे, छत्तायम डुंबरे, देविसस लांबे, गुलाब गाढवे, महादू मुरादे, अशोक डुंबरे, सिताराम लांबे, रेविदास भूले, भास्कर हुंबरे, आत्माराम



गाढवे, धनंजय हुंबरे, छबूराव जाने, आबा कावीर, संजय उंबरे, संदेश साळुंके, किता डुंबरे, अमोल डुंबरे, विश्वास डुंबरे, मारुती फनपरे, राजेंद्र व सांबर जाधव, भास्कर डुंबरे आदी उपस्थित होते.

भजन स्पर्धेसाठी जय बजरंग प्रतिष्ठान, ओतूर यांचे विशेष सहकार्य लाभले. सूत्रसंचालन संतोष कांबळे यांनी केले.

छायाचित्र : ओतूर ता. जुन्नर येथील श्री कपर्दिकेश्वर मंदिरात महाआरती करताना आरतीचे मानकरी, देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी व भाविक भक्त.